रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | रविवार | दि. २८ जून २०२६ | अंक २२ | पृष्ठे १० | किंमत ४ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

## दि.बांच्या नावासाठी पुन्हा रणशिंग

**चिरनेर :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या लढ्याला आता निर्णायक वळण देण्याची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी रविवारी, दि. २८ जून रोजी सकाळी १० वाजता जसाई गाव येथील लोकनेते दि.बा. पाटील मंगल कार्यालयात महत्त्वपूर्ण सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेमध्ये विविध संघटनांचे पदाधिकारी, भूमीपुत्र, प्रकल्पग्रस्त, शेतकरी, युवक तसेच सामाजिक कार्यकर्ते सहभागी पान २ वर

## वेधक

### विषप्रयोगाचा कट उधळला

**मुंबई :** भायखळा परिसरात मोहरमच्या मिरवणुकीदरम्यान औषधांच्या नावाखाली विषारी कॅप्सूल वाटप करण्याचा कथित कट मुंबई पोलिसांनी उधळून लावला. याप्रकरणी फैयाज प्रेमजी (मूळ रा. पुणे) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून सुमारे १४,९०० विषारी कॅप्सूल आणि ५० किलो झिंक फॉस्फाईड (उंदीर मारण्याचे विष) जप्त करण्यात आले आहे. एका व्यक्तीने कॅप्सूल घेतल्यानंतर उलट्या व अस्वस्थता जाणवल्याने हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांच्या प्राथमिक तपासात आरोपीने मोठ्या प्रमाणावर विषारी कॅप्सूल तयार केल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. आरोपीचा परदेश दौरा आणि या कटामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही पोलीस शोध घेत आहेत.

### ‘आमचा एकही खासदार फुटणार नाही’

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), समाजवादी पक्ष आणि आमचे एकही खासदार फुटणार नाहीत. भाजपला डिलिमिटेशनच्या राजकारणासाठी आणखी खासदारांची गरज असली तरी ऑपरेशन तुतारी यशस्वी होणार नाही, असा दावा आमदार रोहित पवार यांनी केला. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेल्या भेटीबाबत बोलताना, त्यांच्या मुलावर होत असलेल्या आरोपांच्या संदर्भात ते मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून फडणवीस यांना भेटले असतील, असे आ. रोहित पवार यांनी सांगितले.

### माऊलींच्या अश्वांचे आळंदीकडे प्रस्थान

**पुणे :** आषाढी वारीची लगबग सुरू झाली असून, ‘‘माऊली... माऊली...’’च्या अखंड नामगजरात पंढरीच्या वारीसाठी बेळगाव जिल्ह्यातील अंकली येथून श्रीमंत शितोळे सरकार यांच्या घराण्यातील मानाच्या अश्वांचे शनिवारी पारंपरिक विधीवत पूजन करून प्रस्थान झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात मोती व हिरा या मानाच्या अश्वांना आळंदीच्या दिशेने रवाना करण्यात आले.अंकली ते आळंदी असा सुमारे ३०० किलोमीटरचा हा पारंपरिक प्रवास असून, या मार्गावर मिरज, सांगलवाडी, ईश्वरपूर पेठनाका, वाठारगाव, भरतगाव, भुईंज, सारोळा आणि शिंदेवाडी येथे मुक्काम होणार आहे. ५ व ६ जुलै रोजी मानाचे अश्व आळंदीत दाखल होतील.

# एसटीची ‘स्मार्ट’ लूट ?

## शंभर रुपयांच्या रिचार्जसाठी २० ते ५० रुपये अधिक वसुली

## महिलांसह ज्येष्ठ नागरिकांची स्मार्ट कार्डातून आर्थिक फसवणूक?

**| प्रमोद जाधव |**
**| रायगड |**

एसटी महामंडळाने प्रवाशांसाठी सुरू केलेल्या एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड योजनेतून प्रवाशांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. महिलांसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे येत असताना, कार्ड नोंदणी आणि रिचार्जच्या नावाखाली अतिरिक्त रक्कम आकारली जात असल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शंभर रुपयांच्या रिचार्जवर जीएसटीच्या नावाने पाच रुपये वजा होत असतानाच काही एजन्सींकडून २० ते ५० रुपये अधिक वसूल केले जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

एसटी महामंडळाने कागदी ओळखपत्राच्या जागी २०१६ मध्ये स्मार्ट कार्ड योजना सुरू केली होती. मात्र, अवघ्या सात वर्षांत ती योजना बंद पडली. त्यानंतर आता प्रवासातील पारदर्शकता वाढविणे, डिजिटल व्यवहारांना चालना देणे आणि एसटी प्रवास कॅशलेस करण्याच्या उद्देशाने एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) योजना सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून एसटी महामंडळाने तंत्रज्ञानाचा वापर करून सेवा अधिक आधुनिक करण्याचा प्रयत्न केला आहे.






रायगड जिल्ह्यात एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेसाठी खासगी एजन्सींची नियुक्ती करण्यात आली असून, अलिबाग, पेण, पान २ वर

### जुन्या योजनेचे हजारो कार्ड आजही धूळ खात

एसटी महामंडळाने २०१६ मध्ये कागदी ओळखपत्राच्या जागी स्मार्ट कार्ड योजना सुरू केली होती. अवघ्या ५० रुपयांत मिळणारे हे कार्ड प्रवाशांसाठी वापरण्यास सोयीचे ठरत होते. हजारो प्रवासी आणि विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला होता. मात्र, आर्थिक कारणे पुढे करत संबंधित कंपनीने अवघ्या सात वर्षांत ही योजना बंद केली. परिणामी, जुन्या योजनेची हजारो स्मार्ट कार्डे आजही विविध एसटी बसस्थानकांमध्ये पडून असून, त्यांचा कोणताही उपयोग होत नसल्याचे चित्र आहे.

> एनसीएमसी कार्ड योजना रायगड विभागात सुरू करण्यात आली असून, २४ हून अधिक एजन्सीमार्फत नोंदणीचे काम सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ४० हजार जणांनी नोंदणी केली असून, २० हजार लाभार्थ्यांना कार्डांचे वितरण करण्यात आले आहे. एजन्सींना प्रवाशांकडून अतिरिक्त रक्कम आकारू नये, अशा तोंडी सूचना देण्यात आल्या आहेत. कोणतीही एजन्सी नियमबाह्य पद्धतीने जादा पैसे घेत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर निश्चितच कारवाई करण्यात येईल.
> – रोशन भोईर, एसटी महामंडळ, रायगड विभाग




## ‘गडद’ अंधारात तोडपाणी नक्की केली कोणी ?

■ रेवदंड्यात चर्चांचा धुरळा

**| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |**

२२ लाख रुपयांचा कथित गुटखा जप्त... त्यानंतर अचानक शांतता... आणि, आता पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा सुरू आहे की, कथित आर्थिक तोडपाणी नक्की केली कोणी? घेतलेले साडेसात लाख रुपये कोणाच्या खिशात पडले? आठ दिवसांपूर्वी पोलीस ठाण्याचे प्रभारी झालेले अधिकारी गप्प का? अशी चर्चा पोलिसांमध्येच दबक्या आवाजात सुरू आहे. जर रक्षकच भक्षक होत असतील, तर न्यायाची अपेक्षा तरी काय ठेवायची? आपले खिसे भरुन अवैध धद्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार झाला असेल, तर त्यावर पोलीस अधीक्षकांनी कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

रेवदंडा परिसरात काही दिवसांपूर्वी झालेल्या सुमारे २२ लाख रुपयांच्या कथित गुटखा जप्तीच्या पान २ वर

### संशयाचे धुके अद्याप कायम

रेवदंडा पोलीस ठाण्यातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी एकमेकांकडे संशयित नजरेने पाहात असल्याची चर्चा आहे. एवढी मोठी कारवाई होऊनसुद्धा जप्त मुद्देमालाचे पुढे काय झाले? संबंधितांवर कोणती कारवाई झाली? कथित तडजोडीच्या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे? याबाबत संशयाचे धुके कायम आहे.

### पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेकडे लक्ष

रेवदंड्यातील २२ लाख रुपयांच्या कथित गुटखा जप्तीच्या कारवाईनंतर सुरू झालेल्या चर्चांमुळे आता रायगडच्या पोलीस अधीक्षक आचल दलाल यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. कारवाईनंतरच्या प्रक्रियेबाबत अधिकृत खुलासा होणार का, कथित जप्त मुद्देमालाची पडताळणी, तपासाची सद्यःस्थिती आणि सुरू असलेल्या चर्चांमधील वस्तुस्थिती स्पष्ट केली जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. अवैध धंदेवाल्यांसाठी कर्दनकाळ ठरलेल्या आणि कामचुकार पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना कठोर कारवाईचा बडगा उगारणाऱ्या आचल दलाल यांच्या भूमिकेकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

# तात्पुरत्या बदल्यांमुळे रायगड पोलीस दलात संभ्रम

## ॥ १८ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश ॥ पोलीस दलात चर्चांना उधाण

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड पोलीस दलातील पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अशा १८ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश नुकतेच काढण्यात आले आहेत. मात्र, या बदल्या केवळ बंदोबस्ताच्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आल्याची माहिती समोर आल्याने संबंधित अधिकाऱ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. बदलीच्या ठिकाणी तातडीने हजर राहण्याचे आदेश देण्यात आले असले, तरी या नियुक्त्या कायमस्वरूपी नसल्याने अधिकाऱ्यांसमोर अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. त्यामुळे रायगड पोलीस दलात या बदल्यांबाबत सध्या जोरदार चर्चा रंगली आहे.

रायगड पोलीस दलाच्या अखत्यारित २८ पोलीस ठाण्यांसह जिल्हा विशेष शाखा, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,



दहशतवादविरोधी शाखा, बांगलादेशीविरोधी पथक, नियंत्रण कक्ष, वाचक शाखा तसेच इतर विविध विभाग कार्यरत आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली या सर्व विभागांचाकारभारचालतो. दरम्यान, जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू झाली असून, त्यामध्ये पाली, पेण, महाड तालुका, मुरूड, तळा, खालापूर, गोरेगाव, अलिबाग, माणगाव, मांडवा सागरी पोलीस ठाणे, जिल्हा वाहतूक शाखा आणि नियंत्रण कक्ष अशा एकूण १८ ठिकाणांवरील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात पान २ वर

### कर्मचाऱ्यांच्या बदल्यांकडे अजूनही दुर्लक्ष

रायगड जिल्हा पोलीस दलातील पोलीस ठाणे तसेच विविध शाखांमध्ये कार्यकाळ पूर्ण झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या दरवर्षी मे महिन्यापर्यंत केल्या जातात. मात्र, यंदा जून महिना संपत आला तरी अद्याप या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे हजारो पोलीस कर्मचारी बदलीच्या प्रतीक्षेत असून, त्यांच्या नियुक्तीबाबतही अनिश्चिततेचे वातावरण कायम आहे.

# परीक्षेआधीच पेपर फुटला

■ टीईटी परीक्षा रद्द; पेपरफुटीमुळे परीक्षार्थ्यांकडून संताप व्यक्त

■ पनवेलमध्ये दहा हजार उमेदवारांची तयारी वाया

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने रविवारी होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या प्रकारामुळे पुढील आदेशापर्यंत रद्द करण्यात आली. भिवंडी येथे एका व्यक्तीकडे टीईटी प्रश्नपत्रिकेतील प्रश्नसंच आढळल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो परीक्षार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

पनवेल तालुक्यात या परीक्षेसाठी सुमारे दहा हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यांच्यासाठी नऊ परीक्षा केंद्रांवर आसनव्यवस्था करण्यात आली होती. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सुमारे ३५० कर्मचारी आणि नऊ केंद्रप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली होती, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी साहू सतपाल यांनी दिली.

डी.एड. आणि बी.एड. पूर्ण केल्यानंतरही शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्य असल्याने उमेदवारांनी मोठी तयारी केली होती. मात्र, पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द झाल्याने त्यांचा मानसिक, आर्थिक आणि वेळेचा मोठा पान २ वर

### पेपरफुटीचा पर्दाफाश

रविवार, २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका दीड कोटी रुपयांना विकण्याचा कट भिवंडी पोलिसांनी उधळून लावला. कोनगाव परिसरातून राजीव शाह (रा. बिहार), आकाश कुमार सरोजकुमार (रा. बिहार) आणि धीरज बलराज सिंग (रा. हरियाणा) या तिघांना अटक करण्यात आली. आरोपींकडून टीईटी परीक्षेच्या मूळ प्रश्नपत्रिकेचे चार संच, मोबाईल आणि डेबिट कार्डे जप्त करण्यात आली असून, मुख्य सूत्रधार अद्याप फरार आहे.

# भाजपा म्हणजे पाकिस्तान जनता पार्टी

## उद्धव ठाकरेंची घणाघाती टीका

**| अमरावती | प्रतिनिधी |**

भाजपा ही आता भारतीय जनता पार्टी राहिलेली नाही तर पाकिस्तान जनता पार्टी झाली आहे. प्रभू श्रीरामांना भाजपाच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी भाजपा मुक्त राम आंदोलन छेडणार असून महाराष्ट्रातून त्याची सुरुवात होईल असा घणाघाती हल्ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज यवतमाळ येथे केला.



यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातील शिवसैनिकांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटात गेलेले खासदार संजय देशमुख यांच्यावर सडकून टीका केली.

सभेच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांचे आभार मानत भावनिक संवाद साधला. पावसाळ्यात झाडांवर नवी पालवी फुटते तसाच हा माझ्या आयुष्यातील पावसाळा आहे. काही सडलेली पान गळून गेली पण नव्या जोमाने उभे राहणारे कट्टर शिवसैनिक हीच शिवसेनेची खरी ताकद आहे, असं उद्धव पान २वर

# पुनिरमध्ये विहीर अचानक गायब

## सुदैवाने जीवितहानी टळली; ग्रामस्थांमध्ये संताप

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील मौजेपुनिर गावातील ग्रामस्थांच्या सार्वजनिक वापरातील विहीर शनिवारी पहाटे अचानक कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अनेक वर्षांपासून गावाच्या पाणीपुरवठ्याचा आधार असलेली ही विहीर पूर्णपणे खचल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



गेल्या काही दिवसांपासून विहिरीच्या आतील दगडी बांधकामातून दगड निखळत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले होते. विहीर धोकादायक अवस्थेत असल्याची कल्पना असूनही वेळेत दुरुस्ती किंवा सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. अखेर शनिवारी पहाटे विहिरीचा काठ आणि आतील दगडी बांधकाम एकाचवेळी कोसळल्याने संपूर्ण विहीर निकामी झाली.

घटना पहाटे पान २ वर

# आगरकोट किल्ल्याच्या बुरुजाला नवसंजीवनी



पुरातत्त्व विभागाकडून संवर्धनाचे काम हाती

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा आगरकोट किल्ल्याच्या उत्तर प्रवेशद्वारावरील ऐतिहासिक ‘वन बुरुज’ला अखेर नवसंजीवनी मिळत आहे. केंद्रीय पुरातत्त्व विभागाने या ऐतिहासिक वास्तूच्या शास्त्रोक्त संवर्धनाचे काम हाती घेतले असून, जीर्णावस्थेत पोहोचलेल्या बुरुजाचे दगडी बांधकाम, तटबंदी आणि कोरीव स्थापत्य घटकांचे जतन अत्यंत काळजीपूर्वक केले जात आहे. या उपक्रमामुळे पान २ वर

> रेवदंडा आगरकोट किल्ल्यावरील ‘वन बुरुज’चे संवर्धन पुरातत्त्वीय निकषांनुसार करण्यात येत आहे. मूळ दगडी बांधकाम, शिल्पकला आणि स्थापत्य वैशिष्ट्ये कायम ठेवत पारंपरिक साहित्याचा वापर केला जात आहे. या संवर्धनामुळे ही ऐतिहासिक वास्तू पुढील अनेक वर्षे सुरक्षित राहील आणि भावी पिढ्यांनाही हा वारसा अनुभवता येईल.
> – डॉ. अभिजित आंबेकर, अधीक्षक, केंद्रीय पुरातत्त्व विभाग, मुंबई मंडळ

३५३वा शिवराज्याभिषेक सोहळा दिमाखात | उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची प्रमुख उपस्थिती

# रायगडावर ‘जय भवानी...जय शिवाजी’चा गजर

**| महाड | प्रतिनिधी |**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार ३५३ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगड शनिवारी शिवमय झाला. वैदिक मंत्रोच्चार, ढोल-ताशांचा गजर, पोवाडे, शिवभक्तांच्या जयघोषाने आणि पारंपरिक विधींनी रायगड दुमदुमून गेला. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या ऐतिहासिक सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगडाच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.





सोहळ्याच्या प्रारंभी रायगड पोलीस दलाने छत्रपती शिवाजी महाराजांना शासकीय मानवंदना दिली. त्यानंतर वैदिक मंत्रोच्चारांच्या वातावरणात पालखी सोहळा राजसदरेवर दाखल झाला. मान्यवरांच्या हस्ते महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. ढोल-ताशांचा निनाद, पारंपरिक युद्धकला, पोवाडे, लोकनृत्ये आणि छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणांनी संपूर्ण रायगड परिसर शिवभक्तीने भारावून गेला.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगड किल्ल्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. रायगडावरील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेला तातडीने मंजुरी दिली जाईल, असे त्यांनी जाहीर केले. शेतकऱ्यांनाही दिलासा देताना, कमी पाऊस किंवा दुष्काळी परिस्थितीत महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे आश्वासन त्यांनी दिले. ‘‘शासकीय तिजोरीवर पहिला अधिकार अन्नदाता बळीराजाचाच आहे,’’ असे ठामपणे सांगत त्यांनी रायगडासह युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट झालेल्या पान २ वर

## हुक्का पार्लरवर धडक कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

तळोजा पोलिसांनी हुक्का पार्लरवर कारवाई करत दोघा जणांवर गुन्हा दाखल केला. डी आर मंकी हुक्का पार्लर, हॅप्पी होम बिल्डिंगसमोर, घोटगाव या ठिकाणी विनापरवाना हुक्का पार्लर चालवून ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी देत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी त्या ठिकाणाहून १३ हजार १९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान, मुकेश कुमार भागीरथमल खिचड (रा. रिद्धीसिद्धी सोसायटी, घोटकॅम्प) आणि तौहिद बबलू मंसूरी (रा. रिद्धीसिद्धी सोसायटी, घोटकॅम्प) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



# ‘अन्न-औषध’चा कारभार रामभरोसे!

## रायगडच्या १५ तालुक्यांसाठी केवळ ९ अधिकारी

## भेसळ, गुटखा आणि अस्वच्छ खाद्यपदार्थांवर कारवाईला अडथळा

। खरोशी । धनाजी घरत ।

रायगड जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणारे अन्न व औषध प्रशासन स्वतःच मनुष्यबळाच्या तीव्र तुटवड्याने ग्रासले आहे. १५ तालुक्यांचा कारभार अवघ्या ९ अधिकाऱ्यांवर सुरू असून, अनेक ठिकाणी लिपिक आणि शिपाईही नसल्याने अधिकाऱ्यांनाच कागदोपत्री कामे करावी लागत आहेत. परिणामी, भेसळयुक्त अन्नपदार्थ, गुटखा, मुदतबाह्य वस्तू आणि अस्वच्छ खाद्यव्यवसायांवर प्रभावी कारवाई करणे मोठे आव्हान ठरत आहे.

पेण येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाला भेट देऊन विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला असता ही धक्कादायक परिस्थिती समोर आली. वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अन्नभेसळ आणि बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले असले,



तरी रायगड जिल्ह्यात आवश्यक मनुष्यबळच उपलब्ध नसल्याने त्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करणे कठीण जात असल्याचे चित्र आहे.

नियमानुसार रायगड जिल्ह्यासाठी सात मुख्य पदे आणि दोन सहाय्यक आयुक्तांची आवश्यकता आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ तीन मुख्य अधिकारी कार्यरत असून, संपूर्ण जिल्ह्यात अवघे नऊ अधिकारी सेवा देत आहेत. अनेक कार्यालयांमध्ये लिपिक आणि शिपाई नसल्याने नोटिसा तयार करणे, पत्रव्यवहार, अहवाल आणि प्रशासकीय कागदपत्रांची जबाबदारीही अधिकाऱ्यांवरच येत आहे.

भेटीदरम्यान प्रतिनिधींनी जिल्ह्यातील अनेक हॉटेल, टपऱ्या, कँटीन आणि खाद्यविक्री केंद्रांमध्ये अस्वच्छ वातावरणात सुरू असलेल्या व्यवसायाचा मुद्दा उपस्थित केला. गुटखा, दुग्धजन्य पदार्थ, मटण, चिकन, मुदतबाह्य खाद्यपदार्थ आणि नियमबाह्य विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर अचानक धाड टाकून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यावर सहाय्यक आयुक्त मिलिंद महांगडे यांनी विभागाच्या कारवाईची माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत १८४ तपासण्या, १३८ अन्ननमुने, ९४ सर्व्हेलन्स प्रकरणे तपासण्यात आली आहेत. तसेच ३८५ प्रकरणांत २ लाख ६४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. गुटखा व पानमसाला प्रकरणांत ३० कारवायांमध्ये २ लाख ७५ हजार रुपयांचा अवैध साठा जप्त करण्यात आला असून, दुग्धजन्य पदार्थांच्या ५ प्रकरणांत ५५ हजार ४५६ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

मनुष्यबळाची कमतरता असली तरी नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही विभागाने दिली आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, अस्वच्छ हॉटेल, कँटीन किंवा नियमबाह्य खाद्यव्यवसाय आढळल्यास नागरिकांनी थेट अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहनही सहाय्यक आयुक्त मिलिंद महांगडे यांनी केले.

# कर्जतमध्ये अधिकाऱ्यांचा धाक?

**● व्यावसायिकांत भीतीचे वातावरण**

**● कारवाई की आर्थिक दबाव, चर्चांना उधाण**

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी अन्न सुरक्षा कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिल्यानंतर कर्जत तालुक्यात अन्न व औषध प्रशासनाच्या कारवायांचा वेग वाढला आहे. मात्र, या कारवायांच्या नावाखाली व्यावसायिकांना घाबरवून आर्थिक दबाव आणला जात असल्याच्या चर्चा आता जोर धरू लागल्या आहेत.

नेरळ येथे अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत शिंदे यांनी हॉटेल व्यावसायिकांची बैठक घेऊन अन्न सुरक्षा कायदा-२००६ अंतर्गत नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई तसेच मोठ्या दंडाची तरतूद असल्याचे सांगत, सुधारणा करण्यासाठी मर्यादित मुदत देण्यात आली.



● हॉटेल व्यावसायिकांच्या बैठकीत तावातावाने बोलणारे अधिकारी.

दरम्यान, गेल्या पंधरा दिवसांत कर्जत, नेरळ, डिकसळ, कशेळ आणि परिसरात अनेक ठिकाणी धाडी टाकल्याची चर्चा आहे. काही आस्थापनांवर कारवाई झाल्याचे सांगितले जात असले, तरी नेमकी किती प्रकरणे नोंदविण्यात आली, किती दुकाने किंवा हॉटेल्सवर अधिकृत कारवाई झाली, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या कारवायांबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

व्यावसायिकांमध्ये कारवाईच्या भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, काही ठिकाणी दुकाने काही दिवस बंद ठेवण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या धाडी केवळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आहेत की अन्य कारणांसाठी, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी होत आहे.

# उपजिल्हा रुग्णालयाविरोधातील उपोषण सोमवारपर्यंत स्थगित



(छायाचित्र : संजय गायकवाड)

## वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीनंतर निर्णय; चौकशीच्या मागण्यांवर सोमवारी होणार सुनावणी

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील कथित अनियमितता व मनमानी कारभाराच्या चौकशीच्या मागणीसाठी पोलीस मित्र संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी लोकमान्य टिळक चौकात सुरू केलेले उपोषण छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारपर्यंत स्थगित करण्यात आले.

उपोषणादरम्यान आरोग्य शिबिरातील औषध खरेदी व खर्च, शस्त्रक्रियांची माहिती, जेएसएसआर अंतर्गत झालेल्या खर्चाची चौकशी, वाहनांचे टेंडर व पेमेंट, एनआरसीमधील बालकांवरील उपचार, स्तनपान सल्ला केंद्रातील कामकाज, रुग्णालयातील औषधांचा कथित गैरवापर तसेच प्रसूतीदरम्यान झालेल्या आदिवासी महिलेच्या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय मस्कर यांनी छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. त्यानंतर उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या दालनात विशेष बैठक पार पडली. बैठकीला जिल्हा शल्यचिकित्सक तथा त्रिसदस्यीय चौकशी अधिकारी डॉ. किरण शिंदे, नगरसेवक राजाभाऊ कोठारी, रुग्ण समिती सदस्य सोमनाथ पालकर व राजाभाऊ कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी रमेश कदम यांनी तीन महिन्यांपूर्वी झालेल्या चौकशी अहवालात त्रुटी असल्याचे सांगत, सोमवारी उपसंचालक आरोग्य सेवा, मुंबई महामंडळ, ठाणेचे डॉ. अशोक नांदापूरकर तसेच रुग्ण समिती सदस्यांनी उपस्थित राहून मागण्यांवर खुलासा करावा, अशी मागणी केली. त्यानंतर डॉ. विजय मस्कर यांनी उपोषणस्थळी जाऊन लेखी विनंतीपत्र दिल्यानंतर रमेश कदम यांनी उपोषण सोमवारपर्यंत स्थगित करण्याची घोषणा केली.

# नगरपालिकेत घरपट्टी वसुलीचा महाघोटाळा?

। उरण । प्रतिनिधी ।

उरण नगरपालिकेतील घरपट्टी वसुली प्रक्रियेत गंभीर अनियमितता होत असल्याच्या चर्चा शहरात रंगू लागल्या आहेत. करदात्यांकडून वसूल करण्यात आलेली लाखो रुपयांची रक्कम तात्काळ नगरपालिकेच्या खात्यात जमा न होता काही काळ संबंधित कर्मचाऱ्यांकडेच राहात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या चर्चेमुळे नगरपालिकेच्या आर्थिक व्यवहारांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

नियमांनुसार घरपट्टी व इतर करांची वसुली झाल्यानंतर ती रक्कम निर्धारित कालावधीत नगरपालिकेच्या खात्यात जमा करणे बंधनकारक असते. मात्र, काही वसुली कर्मचाऱ्यांकडून करदात्यांकडून रक्कम स्वीकारल्यानंतर ती त्वरित जमा न करता अनेक दिवस स्वतःकडे ठेवली जात असल्याची चर्चा आहे. विशेषतः आर्थिक वर्षाच्या अखेरीस मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणावर रक्कम एकत्रितपणे खात्यात जमा होत असल्याचे बोलले जात आहे.यामुळे नागरिकांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे. करदात्यांनी भरलेली रक्कम प्रत्यक्षात नगरपालिकेच्या खात्यात नेमकी कोणत्या दिवशी जमा होते? वसुलीची तारीख आणि बँकेत भरणा झाल्याची तारीख यामध्ये मोठा फरक असल्यास त्यासाठी जबाबदार कोण? याचे स्पष्टीकरण प्रशासनाने देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. या प्रकरणातील आणखी एक गंभीर आरोप म्हणजे नवीन बांधकामांना घरपट्टी आकारणीसाठी काही ठिकाणी ठराविक रकमेची मागणी केली जात असल्याची चर्चा आहे.

# महावितरणचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर

**● सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त**

**● उपाययोजना करण्याची मागणी**

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील निजामपूर शहरासह पंचक्रोशीतील परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेच्या दिवसांमध्ये कमी दाबाचा वीजपुरवठा आणि सततची वीज खंडित होण्याची समस्या सहन करणाऱ्या नागरिकांना आता पावसाळा सुरू होताच आणखी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समस्येबाबत वीज मंडळाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असून, याविरोधात ज्येष्ठ नागरिक संघटना पुढे सरसावली आहे.

निजामपूर विभाग हा माणगाव तालुक्यातील संवेदनशील भाग म्हणून ओळखला जातो. या भागात कमी दाबाचा वीजपुरवठा आणि वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. काही दिवसांपूर्वी सुरू झालेल्या पावसामुळे ही समस्या आणखी तीव्र झाली असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढीस लागली आहे.



या पार्श्वभूमीवर निजामपूर ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वीज मंडळाच्या स्थानिक कार्यालयाला भेट देत लेखी निवेदन सादर केले. तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून कमी दाबाचा वीजपुरवठा आणि सततच्या खंडित वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली.

संघटनेतील अनेक पदाधिकारी हे विविध शासकीय विभागातील निवृत्त अधिकारी व कर्मचारी असून, प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांच्या निवेदनाची गांभीर्याने दखल न घेतल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष कासार गुरुजी, सचिव संतोष गुरव, सहसचिव धोंडीराम यादव, उपकार्यवाह जनार्धन तटकरे, सदस्य सुरेश जोशी, नथुराम शिर्के, भारत चांदोरकर, पांडे तसेच पत्रकार एकनाथ मानकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## ‘गडद’ अंधारात तोडपाणी कोणी केली?

कारवाईनंतर अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये कारवाईनंतर आर्थिक तडजोड झाल्याच्या चर्चा सुरू असून, संबंधित व्यक्ती निर्धास्तपणे फिरत असल्याचेही बोलले जात आहे. मात्र, या सर्व चर्चांना अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

स्थानिक पातळीवर अशीही चर्चा आहे की, कारवाईशी संबंधित काही घटकांमध्ये पैशांच्या कथित वाटपावरून अंतर्गत मतभेद निर्माण झाले. काही व्यक्तींनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर विविध दावे केल्याचे सांगितले जात असले, तरी त्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, याबाबत संभ्रम कायम आहे.

दरम्यान, रेवदंडा परिसरात अवैध गुटखा विक्री, अमली पदार्थांची कथित तस्करी आणि वाढत्या व्यसनाधीनतेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गांजा, एमडी आणि नशायुक्त गोळ्या सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा असून, युवक मोठ्या प्रमाणात व्यसनांच्या विळख्यात अडकत असल्याची भीती पालकांकडून व्यक्त केली जात आहे.काही युवकांमध्ये शरीरसौष्ठव वाढविण्यासाठी गांजाचे सेवन उपयुक्त असल्याचा गैरसमज पसरत असल्याचीही चर्चा आहे. या गैरसमजामुळे अनेक तरुण व्यसनाकडे वळत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. त्यामुळे व्यसनमुक्तीबरोबरच अवैध धंद्यांवर कठोर कारवाईची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

तक्रार करणाऱ्यांची माहिती संबंधितांपर्यंत पोहोचते, अशी भीती नागरिकांमध्ये असल्याने अनेकजण पुढे येण्यास धजावत नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई होण्याऐवजी त्यांचे मनोबल वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुजीत गडदे यांनी नुकताच पदभार स्वीकारला असून, त्यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांवर कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. मात्र, सध्या सुरू असलेल्या चर्चांमुळे गुटखा जप्ती प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती अधिकृतपणे समोर यावी, जप्त मुद्देमालाची पुढील कार्यवाही काय झाली, संबंधितांवर कोणती कारवाई झाली आणि सुरू असलेल्या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे, याचा खुलासा संबंधित यंत्रणांनी करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## परीक्षेआधीच पेपर फुटला

फटका बसल्याची भावना उमेदवारांनी व्यक्त केली.

दरम्यान, या प्रकारामुळे शिक्षण विभागाच्या परीक्षा व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून पेपरफुटीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी उमेदवारांकडून होत आहे. तसेच काही संघटना आणि उमेदवारांकडून या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात येत आहे.

## आगरकोट किल्ल्याच्या बुरुजाला नवसंजीवनी

रेवदंड्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाला मोठी चालना मिळणार आहे.

सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी उभारलेल्या आगरकोट किल्ल्याचा हा भव्य प्रवेशद्वार अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार राहिला आहे. मात्र, समुद्रकिनारी असलेल्या या वास्तूवर वर्षानुवर्षे पाऊस, खाऱ्या वाऱ्याचा परिणाम, नैसर्गिक झीज आणि झाडांच्या वाढीमुळे मोठा परिणाम झाला. प्रवेशद्वारावरील दगडी कमान, पोर्तुगीज सत्तेचे प्रतीक असलेले क्राऊन शिल्प, कोरीव नक्षीकाम तसेच तटबंदीचा काही भाग जीर्णावस्थेत पोहोचल्याने या वास्तूच्या तातडीच्या संवर्धनाची आवश्यकता निर्माण झाली होती.

रेवदंडा संरक्षण सहाय्यक बजरंग येळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या मुंबई मंडळाने या कामाला मंजुरी दिली. अधीक्षक डॉ. अभिजित आंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी संवर्धन तज्ज्ञांकडून हे काम शास्त्रोक्त पद्धतीने केले जात आहे.

सध्या बांबूच्या माचांच्या साहाय्याने बुरुजाच्या प्रत्येक भागाची तपासणी करून सैल झालेल्या दगडांना पारंपरिक चुन्याच्या मिश्रणाने मजबुती दिली जात आहे. तसेच मूळ स्थापत्यशैलीला धक्का न लावता दगडी कमानी, शिलालेख, कोरीव शिल्पकला आणि तटबंदीचे संवर्धन करण्यात येत आहे. पुरातत्त्वीय निकषांचे काटेकोर पालन करून हे काम सुरू असल्याने वास्तूचे मूळ ऐतिहासिक स्वरूप अबाधित राहणार आहे.

इतिहास अभ्यासकांच्या मते, किल्ल्यांचे प्रवेशद्वार हे केवळ दगडी बांधकाम नसून तत्कालीन लष्करी रणनीती, स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत. त्यामुळे अशा वारशाचे जतन करणे ही काळाची गरज असून, केंद्रीय पुरातत्त्व विभागाचा हा उपक्रम इतिहास संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर रेवदंडा आगरकोट किल्ल्याचा ‘वन बुरुज’ पुन्हा एकदा इतिहासप्रेमी, पर्यटक आणि संशोधकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार असून, रेवदंड्याच्या ऐतिहासिक ओळखीला नवसंजीवनी मिळणार आहे.

## पुनिरमध्ये विहीर अचानक गायब

घडल्याने त्या वेळी विहिरीवर पाणी भरण्यासाठी कोणीही नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. अन्यथा सकाळच्या गर्दीच्या वेळी ही घटना घडली असती तर जीवितहानीची शक्यता नाकारता आली नसती, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. विहिरीच्या परिसरात नागरिक, लहान मुले किंवा जनावरे पडून अपघात होऊ नये, यासाठी विहिरीभोवती तारेचे संरक्षक कुंपण उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

मात्र, केवळ कुंपण उभारून प्रश्न सुटणार नसल्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. ही विहीर गावातील अनेक कुटुंबांच्या दैनंदिन पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत होती. त्यामुळे तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता पर्यायी पाणीपुरवठ्याची त्वरित व्यवस्था करावी तसेच नवीन सार्वजनिक विहीर उभारण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यासोबतच विहीर कोसळण्यामागील नेमकी कारणे शोधण्यासाठी संबंधित विभागाने सखोल चौकशी करावी, तसेच तालुक्यातील इतर जुन्या सार्वजनिक विहिरींची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व सुरक्षेच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे पुनिर गावातील पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासन यावर किती तत्परतेने कायमस्वरूपी तोडगा काढते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## एसटीची ‘स्मार्ट’ लूट?

कर्जत, उरण, पनवेल, महाड, श्रीवर्धन, मुरूड, रोहा आणि माणगाव या ठिकाणी सुमारे ३० हून अधिक एजन्सीमार्फत नोंदणीचे काम सुरू आहे. रायगड विभागाच्या अखत्यारित २४ एजन्सी कार्यरत असून, आठ आगारांतील ११ बसस्थानकांमध्ये या सुविधा उपलब्ध आहेत. काही एजन्सी सकाळी ८ ते ११, तर काही सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत कार्यरत आहेत.

महिलांच्या मोफत प्रवास योजनेमुळे एनसीएमसी कार्डसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. बसस्थानकांसह खासगी एजन्सींमध्ये नोंदणीसाठी महिलांच्या रांगा लागत आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे ४० हजार महिलांनी या कार्डसाठी नोंदणी केली असून, त्यापैकी सुमारे २० हजार लाभार्थ्यांना कार्डांचे वितरण करण्यात आले आहे. मात्र, कार्ड नोंदणीपासून ते प्रत्यक्ष कार्ड मिळेपर्यंत प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

या कार्डासाठी अधिकृत शुल्क १९९ रुपये असताना अनेक ठिकाणी थेट २०० रुपये घेतले जात आहेत. त्यानंतर कार्ड सक्रिय करण्यासाठी शंभर रुपयांच्या रिचार्जवर १२० ते १५० रुपये आकारले जात असल्याची तक्रार आहे. यामध्ये शंभर रुपयांच्या रिचार्जमधून पाच रुपये जीएसटी म्हणून वजा केले जातात. त्यानंतर काही एजन्सींकडून २० ते ५० रुपये अतिरिक्त घेतले जात असल्याने लाखो रुपयांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकाराकडे एसटी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन दोषी एजन्सींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

## तात्पुरत्या बदल्यांमुळे रायगड पोलीस दलात संभ्रम

आल्या आहेत.मात्र, या बदल्या तात्पुरत्या स्वरूपातील असल्याचे समोर येत असल्याने अधिकारी संभ्रमात पडले आहेत. एका ठिकाणी रुजू झाल्यानंतर पुन्हा कधीही दुसऱ्या ठिकाणी बदली होऊ शकते, अशी शक्यता असल्याने कुटुंबासह स्थलांतर करावे की नाही, हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्तीमुळे राहण्याची व्यवस्था, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा मुक्काम याबाबत अनिश्चितता निर्माण झाली असून, या निर्णयामुळे अनेक अधिकारी मानसिक तणावात असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे.

बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ नवीन ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, या आदेशांमध्ये नियुक्तीचा कालावधी किंवा पुढील बदलीबाबत स्पष्टता नसल्याने संभ्रम अधिकच वाढला आहे. त्यामुळे या बदल्यांबाबत पोलीस मुख्यालयाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक अचाल दलाल यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तो होऊ शकला नाही.

**अजूनही साळेंच्याच नावाचा फलक**

अलिबाग पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या जागी नागपूर पोलीस दलातून प्रवीण पांडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी १५ जूनपासून अलिबाग पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या बदली आदेशांमध्ये प्रवीण पांडे यांचे नाव नसल्याने त्यांच्या नियुक्तीबाबतही संभ्रम कायम आहे. विशेष म्हणजे, त्यांनी पदभार स्वीकारून दहा दिवसांहून अधिक कालावधी उलटून गेला असतानाही पोलीस ठाण्यातील नावफलकावर अजूनही किशोर साळे यांचेच नाव कायम आहे. साळे सध्या जिल्हा विशेष शाखेत कार्यरत असून, त्यांच्या बदलीचे अधिकृत आदेशही अद्याप प्राप्त झाले नसल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे अलिबाग पोलीस ठाण्यातील पदस्थापनेबाबतही विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

## रायगडावर ‘जय भवानी... जय शिवाजी’चा गजर

महाराष्ट्रातील १२ गड-किल्ल्यांच्या जतन आणि संवर्धनासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी रायगड किल्ला आणि पायथ्यावरील ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पासाठी शासनाने मंजूर केलेल्या निधीचा उल्लेख करत या प्रकल्पास मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी व वाढीव निधी देण्याची आवश्यकता त्यांनी मांडली.

या सोहळ्यास रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष सुनील पवार, कोकण कडा मित्र मंडळाचे अध्यक्ष रोहित पवार, उपाध्यक्ष संकेत वडके यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि हजारो शिवभक्त उपस्थित होते.सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महावितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि विविध शासकीय यंत्रणांनी समन्वय साधत सुरक्षा, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, पार्किंग आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने दुर्गराज रायगडावर पुन्हा एकदा स्वराज्याचा इतिहास जिवंत झाल्याचा अनुभव प्रत्येक शिवभक्ताने घेतला.

## भाजपा म्हणजे पाकिस्तान जनता पार्टी

ठाकरे म्हणाले.खासदार संजय देशमुखयांचा नामोल्लेख टाळत उद्धव ठाकरे म्हणाले, ‘‘शिवसेना प्रमुखांचा चेहरा आणि माझ्या शब्दावर विश्वास ठेवून तुम्ही ज्याला निवडून दिलं त्यानेच गद्दारी केली. त्यामुळं सर्वप्रथम माझे कर्तव्य आहे की यवतमाळ वाशिमच्या जनतेची मी माफी मागावी. तुम्ही त्याच्या बोटावर मतदानाची शाई लावली पण त्यानं तुमच्या विश्वासालाच काळं फासलं.’’शिंदे गटावर निशाणा साधताना त्यांनी उपरोधिक भाषेत टीका केली. आधी आमदारांचा भाव ५० खोके होता मग खासदारांचा किती असेल निवडून यायचं, स्वतःचा भाव वाढवायचा आणि नंतर विकून जायचं हा त्यांचा उद्योग झाला, असा टोलादेखील उद्धव ठाकरे यांनी लगावला.

लोकसभा निवडणुकीचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले, मोदींची लाट असल्याचा दावा करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावं की, महाराष्ट्रानं भाजपाला रोखलं आणि शिवसेनेचे खासदार निवडून दिलं. जर मोदींच्याच नावावर निवडून येत असाल तर पक्षांतर करण्याची गरज काय होती? असा सवालदेखील उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

## दि.बांच्या नावासाठी पुन्हा रणशिंग


होणार असून, सरकारसमोर आंदोलन अधिक प्रभावीपणे कसे उभे करायचे याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. रायगड, उरण, पनवेल, नवी मुंबई आणि परिसरातील सर्व भूमीपुत्रांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकजुटीची ताकद दाखवावी, असे आवाहन केले आहे.

# पर्यटकांच्या जीवाशी खेळ?

## प्रतिबंधित सुळक्याचे रील एमटीडीसीच्या पेजवर; वन्यजीव अभ्यासकाची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पर्यटनाच्या नावाखाली शासकीय यंत्रणा कशा प्रकारे निष्काळजीपणा करू शकतात, याचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माणगाव जवळील कुंभे धबधब्याच्या प्रतिबंधित व धोकादायक सुळक्याचे आकर्षक रील एमटीडीसीच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवरून प्रसारित करण्यात आले आहे. याच ठिकाणी दोन वर्षांपूर्वी रील बनवताना प्रसिद्ध इन्फ्लुएन्सर आन्वी कामदार हिचा ३५० फूट खोल दरीत कोसळून मृत्यू झाला होता. त्यामुळे कोणत्याही सुरक्षा सूचनेशिवाय हे रील पोस्ट करून पर्यटकांच्या जिवाशी खेळ मांडल्याप्रकरणी आणि वस्तूस्थिती सांगणाऱ्या नागरिकांच्या कमेंट्स डिलीट केल्याबद्दल वन्यजीव अभ्यासक आनंद मोहिते यांनी एमटीडीसी प्रशासनाविरोधात थेट रायगड पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



एमटीडीसीने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर कुंभे धबधब्याचा असा भाग दाखवला जो पर्यटकांसाठी अत्यंत असुरक्षित आणि प्रतिबंधित मानला जातो. याच ठिकाणी दि. १६ जुलै २०२४ रोजी रील बनवताना आन्वी कामदार या तरुणीला आपला जीव गमवावा लागला होता. यावेळी सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था या रेस्क्यू टीमने आणि इतर जीव रक्षकांनी रेस्क्यू मोहीम केली होती. मात्र, आता प्रशासनाने त्याच जागेला पुन्हा ग्लॅमरस करून दाखवले आहे. दरम्यान, या रीलवर स्थानिक नागरिक, ट्रेकर्स आणि बचाव पथकांनी कमेंट्स करून हे ठिकाण धोकादायक असल्याची आणि तिथे न जाण्याची जनजागृती सुरू केली होती. मात्र, एमटीडीसीच्या सोशल मीडिया ॲडमीनने वस्तूस्थिती लपवण्यासाठी या सर्व सावध करणाऱ्या कमेंट्स थेट डिलीट करण्यास सुरुवात केली. शासकीय यंत्रणेने अशा प्रकारे लोकांच्या जिवाशी खेळणे आणि सत्य दडपून टाकणे अत्यंत निषेधार्ह आहे. त्यामुळे वन्यजीव अभ्यासक आनंद मोहिते यांनी या रीलचे स्क्रीनशॉट, आन्वी कामदार अपघाताचे वृत्तपत्रीय पुरावे आणि कमेंट्स डिलीट केल्याचे पुरावे जोडून थेट रायगड पोलीस अधीक्षकांकडे कारवाईची मागणी केली आहे.

> “पर्यटनाला प्रोत्साहन देताना पर्यटकांच्या जीवित सुरक्षेशी तडजोड करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. ही रील तत्काळ हटवण्यात यावी. संबंधित ठिकाण धोकादायक असल्याचा स्पष्ट इशारा देण्यात यावा. अन्यथा भविष्यात या ठिकाणी रिल्स पाहून कोणी पर्यटक गेल्यामुळे दुर्घटना, जीवितहानी किंवा बचावकार्याची वेळ आल्यास त्याची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी एमटिडीसीवर राहील. तसेच, अशा घटनांमुळे होणाऱ्या बचावकार्याचा खर्च, मनुष्यबळावरील ताण आणि जीवितहानीबाबत उत्तरदायित्व निश्चित हे पूर्णपणे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांची असेल.”
>
> – आनंद मोहिते, वन्यजीव अभ्यासक, मुंबई

# टोरंट कंपनीचा गावठाण जमीनीवर डोळा?



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

टोरेंट प्रकल्पासाठी कर्जत तालुक्यातील सावळे कोटींबे परिसरातील ९९ एकर सरकारी जमीन ३० वर्षांच्या भाडेकरारावर देण्यात आली आहे. आता वदप येथील ढाक गावठाण ही स्थानिक लोकांच्या गरजेसाठी राखीव असलेली जमीन हडपण्याच्या तयारीत दिसून येत आहे. या हालचालीनंतर पर्यावरण प्रेमी आक्रमक झाले असून, जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे यांनी थेट रायगड जिल्हा परिषदेकडे हरकत घेतली आहे.

कर्जत तालुक्यातील पाली-कोतवाल खलाटी परिसरात होणाऱ्या प्रस्तावित टोरेंट एनर्जी स्टोरेज सोल्युशन लिमिटेड प्रकल्पासाठी राज्य शासनाने सुमारे ९९ एकर महसुली जमीन ३० वर्षांच्या भाडेकरारावर टोरेंट कंपनीला दिली आहे. ढाक गावामध्ये महसूल विभागच्या रेकॉर्ड नुसार घरे, मंदिरे, वाडे, प्राथमिक शाळा आणि इतर बांधकामांची माहिती संकलित केली जात असल्याचे समोर आले आहे. गावठाण म्हणजे केवळ मोकळी जमीन नसून, गावाच्या भविष्यातील विस्ताराचा आधार असतो. वाढती लोकसंख्या, नवीन घरे, शाळा, आरोग्य सुविधा, समाजमंदिरे आणि सार्वजनिक उपयोगाच्या जागांसाठी गावठाण क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. असे असताना ढाक गावातील गावठाण जमिनीची मोजणी टोरंटकडून केली गेली असल्याचा माहिती समोर आली आहे. टोरंटच्या अधिकाऱ्यांकडून ही मोजणी केल्याने टोरंट कंपनी गावठाण बळकावणार असे दिसून येत आहे. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थ यांचे गावठाण क्षेत्र हिरावले जाणार असल्याचे स्थानिकांसह पर्यावर प्रेमींमधून बोलले जात आहे.

### पर्यावरण प्रेमी आक्रमक

# ग्राहकांच्या जीवाशी खेळू नका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

अन्न आणि औषध प्रशासनाने नेरळ आणि परिसरातील हॉटेल व्यवसायिकांसाठी एक महत्वाची बैठक घेतली. यावेळी, हॉटेलमध्ये मिळणारे अन्न हे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यासाठी पूर्णपणे सुरक्षित असावे, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आता कडक पावले उचलली आहेत असा इशारा देण्यात आला आहेत. तर अन्न आणि औषध प्रशासनाचे २००६ चे नियमावलीची अंमलबजावणी करा अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न आणि औषध प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार, नेरळ हद्दीतील सर्व छोट्या-मोठ्या हॉटेल व्यवसायिकांची एक तातडीची बैठक नुकतीच पार पडली. या



बैठकीत अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत शिंदे यांनी हॉटेल चालकांना नवीन नियमावली जाहीर करत थेट आणि कडक इशारा दिला आहे. जनतेच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड न करणाऱ्या आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या भूमिकेचे आणि स्वतः नेरळमध्ये येऊन हॉटेल चालकांना सोप्या भाषेत नियम अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत शिंदे यांनी समजावून सांगितले. अन्न सुरक्षा कायदा २००६ च्या तरतुदींचे पालन करणे आता नेरळमधील प्रत्येक हॉटेल चालकाला बंधनकारक असणार आहे. प्रशासनाने तब्बल २० पानांची कडक नियमावली जारी केली असून, यात अनेक महत्त्वाचे नियम सांगण्यात आले आहेत. ‘‘अधिकारी आले की दुकाने बंद करून पळून जाऊ नका, आम्ही लगेच कारवाई करत नाही, आधी चुका सुधारा. पण मानवी आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही,’’ असे खडे बोल अधिकारी प्रशांत शिंदे यांनी व्यवसायिकांना सुनावले. प्रशासनाने व्यवसायिकांना सुधारणा करण्यासाठी जरी १४ दिवसांचा अल्टीमेटम दिला असला, तरी येत्या सोमवारपासून नेरळमध्ये अचानक धाडी टाकण्यास सुरुवात होणार आहे, असा थेट इशारा देण्यात आला आहे. तसेच, नियम न पाळणाऱ्यांवर ५ लाख ते १० लाख रुपयांपर्यंतचा मोठा दंड लावण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

### ■ हॉटेल व्यावसायिकांना प्रशासनाचा इशारा

## पल्स पोलिओ लसीकरणाचे आयोजन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यात आज दि.२८ जुन रोजी पल्स पोलिओ लसीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे. ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व लाभार्थींना सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जवळच्या लसीकरण बुथवर पोलिओचे दोन डोस पाजण्यासाठी घेऊन जावे. हे लसीकरण बूथ आपल्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, ठराविक शाळा, बस डेपो, सार्वजनिक ठिकाणी, चेक पोस्ट व समुद्रकिनारा इत्यादी ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत. तरी या लसीकरण मोहीमेत सहभागी व्हा, असे आवाहन तालुका कृती दल समिती अध्यक्ष मुरुड तथा तहसीलदार मुरुड व सदस्य सचिव तालुका कृती दल समिती मुरुड तथा तालुका आरोग्य अधिकारी मुरुड यांनी केले आहे.



(छायाचित्र: संजय गायकवाड)

## उपोषणाला शरदचंद्र पवार पक्षाचा पाठिंबा

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी रश्मिता पोपेटा यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षानेही जाहीर पाठिंबा दिला आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवसापासूनच विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि दि.बा. पाटीलप्रेमी मोठ्या संख्येने उपोषणस्थळी उपस्थित राहत आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह चिंचपाडा येथील उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी सरकारने लोकभावनांचा आदर करून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष संतोष घरत, कर्जत शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे, उपाध्यक्ष राम देशमुख, सचिव दिलीप बुंदाटे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश वाघमारे तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लाथेने मारल्यानंतर आईची माफी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील नांदगाव येथील अंगणवाडीत अडीच वर्षांच्या मुलीला रडत असल्याच्या रागातून आईने आंगणवाडीच्या प्रवेशद्वारावरच लाथ मारल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल झाली होती. त्यानंतर संबंधित आईची चौकशी करण्यात आली असून, बालिकेची वैद्यकीय तपासणी करून तिला आईसह बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले आहे. या घटनेनंतर संबंधित महिलेने समाजमाध्यमांवर चित्रफीतीव्दारे आपली चूक मान्य करत माफी मागितली आहे. ही घटना गुरूवारच्या सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास घडली होती. अडीच वर्षांच्या मुलीला प्रथमच अंगणवाडीत आणल्यानंतर ती सतत रडत होती. तिचे रडणे पाहून वर्गातील इतर मुलेही रडू लागल्याने आईचा संयम सुटला. मुलीला बाहेर नेऊन शांत करण्याऐवजी तिने रागाच्या भरात तिच्या पोटच्या मुलीला लाथ मारल्याचे चित्रफीतीमध्ये दिसून आले.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

**मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६**

**बीएलओ गृहभेटी : ३० जून ते २९ जुलै २०२६**

✓ गृहभेटीपूर्वी शक्य झाल्यास *voters.eci.gov.in* / *ECINet App* वर मागील SIR मधील आपला किंवा आई-वडिलांचा तपशील (नाव, मतदारसंघ, यादी भाग क्र., अनु. क्र.) शोधून ठेवावा.

✓ गृहभेटीदरम्यान बीएलओने, आपणास दिलेल्या गणना अर्जात आवश्यक माहिती भरून व स्वाक्षरी करून त्याची एक प्रत बीएलओला द्यावी व पोच घेऊन एक प्रत स्वत: जवळ ठेवावी.

✓ आपले किंवा आई-वडिलांचे नाव मागील SIR मध्ये नसल्यास, खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवावे.

१) जन्माचा दाखला, २) पासपोर्ट, ३) इ. १० वी चे (मॅट्रिक) किंवा शैक्षणिक प्रमाणपत्र, ४) रहिवासी प्रमाणपत्र, ५) जात प्रमाणपत्र, ६) सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रम क्षेत्रातील कर्मचारी / निवृत्तीवेतन ओळखपत्र, ७) राज्य/स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, ८) शासनाने दिलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र, ९) वन हक्क प्रमाणपत्र, १०) राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा, ११) बँक, टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा सरकारने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र/प्रमाणपत्र,

तसेच १२) आधार कार्ड ओळखपत्र पुरावा म्हणून स्वीकारले जाईल

**गृहभेटींदरम्यान बीएलओंना सहकार्य करा**

**“कोणताही पात्र मतदार वंचित राहणार नाही, कोणताही अपात्र व्यक्ती समाविष्ट होणार नाही”**

२००२ च्या मतदार यादीत तपशील शोधा

ECINET APP डाऊनलोड करा

**मतदार मदत क्र. १८०० २२ १९५०**

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

## राज्य सरकारकडून जमीन देण्याचा निर्णय | स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण

# माथेरानमधील वाहनतळाची समस्या मार्गी

**। माथेरान- नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांसाठी याठिकाणी जागा कमी पडत होती. माथेरान नगरपरिषदेकडून सध्याच्या वाहनतळ जागेच्या बाजूला असलेला सरकारी भूखंड मिळावा यासाठी गेली २५ वर्षे प्रयत्न सुरू होते. अखेर राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत माथेरान नगरपरिषद साठी एमपी ९३ हा भूखंड देण्याचा निर्णय घेतला आहे.

माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना आपली वाहने दस्तुरी येथील वन विभागाच्या वाहनतळ येथे पार्किंग करावी लागतात. पर्यटन हंगामात आणि सुट्टीच्या काळात हा



वाहनतळ वाहनाच्या पार्किंगमुळे पुर्णपणे भरून जातो. ही बाब लक्षात घेऊन माथेरान नगरपरिषदेकडून २००९ पासून वाहनतळ ५ असलेल्या जागेचा बाजूचा भूखंड एम.पी. ९३ नगरपरिषदेला मिळावा, यासाठी प्रयत्न केले जात होते. शासनाकडून मागील दोन वर्षांत दोन वेळा या प्रस्तावाच्या विविध पूर्तता नगरपरिषद व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्याकरिता सातत्याने पाठपुरावा केला. सनियंत्रण समितीकडे सुद्धा मागील वर्षी हा प्रस्ताव पुन्हा पाठविण्यात आला होता. सनियंत्रण समितीकडून दिलेल्या आरक्षणासाठी भूखंड नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्यासंदर्भात मान्यता घेतली आणि अंतिमतः हा प्रस्ताव सर्व पूर्तता करून मागील वर्षी शासनाकडे मान्यतेसाठी ठेवण्यात आला. प्रस्ताव मंजुरीसाठी आ. महेंद्र थोरवे यांनी महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे.

### १९ वर्षांनंतर भूखंडाचे हस्तांतरण

२००७ साली मनोज खेडकर यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात एम.पी. ९३ हा प्लॉट शासन जमा करून माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्यासाठीचा ठराव करण्यात आला होता. हा भूखंड शासनाने एका खासगी ट्रस्टला भाडेपट्ट्याने दिलेला होता. त्यामुळे सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून हा भूखंड २००९ साली शासन जमा झाला. त्यानंतर हा भूखंड माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे पाठवण्यात आला. त्यानंतर या प्रस्तावाला म्हणावी तशी गती मिळाली नाही. मात्र, मागील दोन वर्षांत शासनाकडून दोन वेळा या प्रस्तावाच्या विविध पूर्तता नगरपरिषदेमार्फत व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्याकरिता सातत्याने पाठपुरावा केला गेला. अखेर १९ वर्षांनंतर हा भूखंड माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला.

**TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH**

TMV 105+ 1921

**105 years of shaping India’s finest minds**

**ADMISSIONS OPEN 2026-27**

- BAJMC | BJ — TV Journalism
- B.Sc. | M.Sc — Animation & VFX
- B.Sc. — Data Science & AI
- BCA — Data Science & Machine Learning / Cyber Security
- MCA
- B.Com | M.Com
- B.Com — Fintech
- BBA | MBA — AICTE
- BBA LLB
- LLB | LLM
- BA LLB
- B.Sc — Nursing
- D. Pharm
- B. Pharm
- M. Pharm
- BPT | MPT — Physiotherapy

**Skill & Entrepreneurship Development Programmes**

**TMV’s School Tilak Maharashtra Vidyalaya**

Affiliated to CBSE Delhi, Affiliation No. 1131381, School No. 31370

Sector 14, Plot Number 3, Near Raghunath Vihar, Kharghar, Navi Mumbai - 410210 | 7506038705 | www.tmv.edu.in

## निवडक



### संदीप शहा यांचा सन्मान

**पेण** : येथील संदीप शहा यांना पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बालगंधर्व परिवार ट्रस्ट महाराष्ट्र या संस्थेच्यावतीने प्रतिष्ठेचा ''बालगंधर्व पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. यावेळी संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल संदीप शहा यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गेल्या ३५ वर्षांच्या संगीत कारकिर्दीत त्यांनी आपल्या गायकीने रसिकांच्या मनावर वेगळी छाप उमटवली आहे. प्रसिद्ध पार्श्वगायक किशोर कुमार यांच्या आवाजाची जादू आपल्या गायकीतून जपणारे संदीप शहा हे 'व्हॉईस ऑफ किशोर' या नावाने प्रसिद्ध आहेत. या पुरस्कार सोहळ्यात पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजूषा नागपुरे, सुप्रसिद्ध पार्श्वगायक सुदेश भोसले, तसेच बालगंधर्व परिवार ट्रस्ट महाराष्ट्रचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या या सन्मानाबद्दल संगीतप्रेमी, कलाकार आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### शेतकरी-बागायतदार हवालदिल

**कोर्लई** : गेल्या दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा दडी मारल्याने मुरूडमधील शेतकरी व बागायतदारांच्या चिंतेत वाढ झाली असून, ते हवालदिल झाले आहेत. मागील चार दिवस मुरुडमध्ये पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता. रायगड जिल्ह्यात मुरुड तालुक्यात सर्वाधिक ३६२ मि.मी.पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे येथील शेतकरी व बागायतदारांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, गुरुवारी पडलेल्या पावसानंतर शुक्रवार आणि शनिवारी पावसाने दडी मारल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे त्याचा परिणाम भात पिकाच्या राबावर होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे मुरूडमधील शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.



### शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**उरण** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा शनिवारी (दि.२७) उरण शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उरण शहरातील विमला तलावामध्ये असलेल्या अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माजी आमदार मनोहर भोईर, नगराध्यक्ष भावना घाणेकर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर व माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिवादन करून जोरदारपणे जयघोष करण्यात आला. तसेच, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर यांच्या संपर्क कार्यालयामध्ये व शिवसेना उरण शहर शाखेमध्ये शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे, चेतन म्हात्रे, मंगेश कासारे, वंदना पवार, प्रार्थना म्हात्रे, प्रमिला पवार, ममता पाटील, विना तलरेजा, माधुरी चव्हाण, लता जाधव, सोनाली जाधव, निरंतर कदम, संतोष पवार, विजय जाधव, फते खान, सागर पाटील, सुशांत तांडेल, संदेश पाटील, इस्माईल शेख, सरपंच सि.के. गायकवाड व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नेत्रतपासणीला चांगला प्रतिसाद

**चौक** : शांतीलाल सांगवी आय इन्स्टिट्यूट मुंबई तर्फे नुकतेच चौक येथील श्री विठ्ठल मंदिर वारकरी संप्रदाय यांच्या पुढाकाराने डोळे तपासणी शिबीर पार पडले. यावेळी चौक परिसरातील रुग्णांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिरास प्रतिसाद दिला. यावेळी शांतीलाल सांगवी आय इन्स्टिट्यूट मुंबई येथील डॉ. जितेंद्र जाधव, डॉ. अमेय म्हात्रे व दहा जणांच्या टीमने १२१ रुग्णांची तपासणी केली. तसेच, १७ रुग्णांची मुंबई येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असून, त्यांना अल्प दरात चष्मे दिले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी वारकरी संप्रदायाचे गोपाळ पवार, सुधीर हनुमंते, प्रभाकर सालेकर, काळूराम मोरे, प्रकाश पवार, भिकू पवार, प्रमोद खाने, नेताजी पालकर मंडळाच्या नेताजी सेवक अनिल खंडागळे, अशोक मोरे, बाबुराव चौधरी, मुकुंद वागले, भूषण पिंगळे, अनिल भरतुक, अरुण घोडके, अनुप पोद्दार, रामचंद्र फाटे, तसेच ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. तर, आभार प्रदर्शन यशवंत सकपाळ यांनी केले.

### रास्त भाव धान्य दुकानदार अडचणीत

**पनवेल** : तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेत्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी पनवेल रास्त भाव धान्य दुकान व रॉकेल विक्रेते संघटनेने केली आहे. या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांना निवेदन देण्यात आले. मार्च २०२६ मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दुकानदारांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, जवळपास तीन महिने उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, बायोमेट्रिक प्रणालीतील अडचणींमुळे अनेक लाभार्थी धान्यापासून वंचित राहत आहेत. तसेच, धान्य व रॉकेल परवान्यांच्या नूतनीकरणास होणारा विलंब, वाहतूक ठेकेदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या धान्याच्या वजनातील तफावत, वेळेवर धान्य कोटा उपलब्ध न होणे आणि थकीत कमिशन यांसारख्या समस्यांमुळे दुकानदार आर्थिक संकटात सापडले आहेत.

# उरणकरांचे आरोग्य कचऱ्यात

## डेंग्यूसह साथीच्या आजारांचा फैलाव; ठेकेदाराचा हलगर्जीपणा, नागरिकांच्या जीवाशी खेळ

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाचा बेजबाबदार कारभार आणि कचरा ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे उरण शहरासह बोरी परिसरात अक्षरशः कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. येथील रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये, नाल्यांमध्ये आणि वस्ती परिसरात कचऱ्याचे ढीग साचल्याने संपूर्ण परिसर दुर्गंधीने वेढला आहे. त्यामुळे डास, माशा आणि घातक जंतूंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ सुरू असल्याचा संतप्त आरोप होत आहे.



उरण नगरपरिषद दरवर्षी कचरा संकलनासाठी लाखो रुपयांचा ठेका देते. परंतु, प्रत्यक्षात मात्र बोरीसह उरण शहरातील अनेक भागांत नियमित कचरा उचलला जात नसल्याने परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात अडकला आहे. पावसामुळे कुजलेल्या कचऱ्यातून असह्य दुर्गंधी पसरत असून नाले तुंबणे, सांडपाणी साचणे आणि डासांची पैदास होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. शहरातील डॉक्टरांच्या माहितीनुसार, अस्वच्छता आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे उरणमध्ये डेंग्यूसह विविध साथीच्या आजारांचा फैलाव वाढत आहे. अनेक नागरिक ताप, डेंग्यूसदृश लक्षणे आणि संसर्गजन्य आजारांनी त्रस्त असूनही नगरपालिकेचा आरोग्य विभाग आणि संबंधित यंत्रणा मात्र हातावर हात धरून बसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे, नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही आरोग्य विभाग आणि कचरा ठेकेदाराकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. कचरा उचलण्याचे वेळापत्रक पाळले जाते का, ठेकेदार करारातील अटींचे पालन करतो का, याची तपासणी होत नसल्याने संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही केवळ आश्वासनांची खैरात केली जाते; मात्र, प्रत्यक्षात कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. स्वच्छतेच्या घोषणा देणारे अधिकारी प्रत्यक्षात शहरातील कचऱ्याच्या साम्राज्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची टीका होत आहे. विशेष म्हणजे आरोग्य निरीक्षकच आजारी पडल्याचे समजते. उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून कचरा संकलनासाठी झालेल्या खर्चाचे विशेष लेखापरीक्षण करण्यात यावे, कचरा ठेकेदाराच्या कामाची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कठोर प्रशासकीय तसेच फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. करदात्यांच्या पैशातून स्वच्छतेवर लाखो रुपये खर्च होत असताना शहर कचऱ्याच्या विळख्यात अडकले आहे. त्यामुळे ''स्वच्छ उरण'' ही घोषणा केवळ फलकांवरच राहिली असून, नागरिकांना कचरा आणि साथीच्या आजारांच्या छायेत जगावे लागत आहे.

### राजेश पाटील यांचे निधन

**उरण** : करंजा कोंढरीपाडा गावचे रहिवासी तसेच चाणजे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच राजेश आत्माराम पाटील यांचे गुरुवारी (दि.२५) निधन झाले. त्यांच्या निधनाने करंजा-कोंढरीपाडा परिसरात शोककळा पसरली असून, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील एका सक्रिय कार्यकर्त्याला परिसर मुकल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. राजेश पाटील यांच्या पश्चात दोन मुले, बहीण तसेच पाटील परिवार असा मोठा आप्तपरिवार आहे.






### बालकांना साहित्याची मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत मधील दुर्गम भागातील आषाणेवाडी येथील अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या बालकांना शैक्षणिक साहित्य यांचे वाटप करण्यात आले.झुगरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रवी काजळे यांच्या प्रयत्नांतून डोंबिवली येथील रोटरी क्लब यांनी आशाणेवाडी येथे जाऊन या वस्तूंचे वाटप केले. या विद्यार्थ्यांना गणवेश व लंच सेट यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी रोटरी क्लब डोंबिवली सिटी टायटन प्रेसिडेंट सविता नाझरे, क्लब सेक्रेटरी मंदार भिसे, प्रेसिडेंट इलेक्ट प्रसाद खोत, रोटरीयन विजय नाझरे, तसेच अंगणवाडी शिक्षिका सुनीता घोडविदे, मदतनीस संगीता, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरोग्य शिबिरात १८७ रुग्णांची तपासणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील हॉटेल गुलशन येथे नेरळ येथील हार्मोनी फाऊंडेशनच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नेत्रचिकित्सा पासून अन्य आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी तब्बल १८७ रुग्णांनी तपासणी केली असून, हार्मोनी फाऊंडेशनच्या या सेवेबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. या शिबिरात नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, ईसीजी आणि हृदयरोग तपासणी, अँजिओग्राफी तपासणी, रोगनिदान आणि ओरिक्युलर, ऍक्युप्रेशर, ऍक्युपंक्चर,जपानी हाराडायगणोसिस उपचार, कोलेस्टेरॉल आणि थायरॉईड तपासणी व मेट्रोपोलिस तपासणी करण्यात आली. त्यामध्ये जवळपास २०० पेक्षाही अधिक जणांनी या शिबिराचा लाभ घेतला. त्यात पॅथॉलॉजीचे ४२ रुग्ण, थेरपिस्टचे ७६ रुग्ण, नेत्र तपासणी ५३ रुग्ण, मोतीबिंदू ४ रुग्ण व हृदयरोगाच्या १२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच, मोतीबिंदू शस्त्रक्रिया सुद्धा रायगड हॉस्पिटलमध्ये केली जाणार आहे, अशी माहिती संचालिका नम्रता कांदळगावकर यांनी दिली. यावेळी नम्रता कांदळगावकर, फाउंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर, संचालक सुभाष भोसले, नवी मुंबईतील सुश्रुषा हॉस्पिटलमधील डॉक्टर संजय, स्वप्नील यादव, सुनंदा वसवे, स्वाती पवार आदी उपस्थितीत होते. या शिबिरासाठी संकरा आय हॉस्पिटल पनवेल, सुश्रुषा हॉस्पिटल नेरुळ, मेट्रो पोलीस आणि मिलिंद पटवर्धन यांचे आरोग्य पथकाने रुग्णांची तपासणी केली.



### वलगन पकडण्यासाठी नद्यांवर झुंबड

**। तळा । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यात गावोगावी वलगनीचे मासे पकडण्याची लगबग सुरू झाली असून, हे मासे पकडण्यासाठी नद्यांवर तरुणांची झुंबड उडत असल्याचे चित्र सर्वत्र पहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने अखेर जिल्ह्यात दमदार हजेरी लावली आहे. या पहिल्याच मोठ्या पावसामुळे कोरडे पडलेले नदी, नाले, तलाव आणि धरणे पाण्याने भरले आहेत. पाऊस लांबल्याने चिंतेत असलेला बळीराजा सुखावला असतानाच, दुसरीकडे खवय्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. नदी नाल्यांना नवीन पाणी आल्यामुळे ग्रामीण भागात वलगणीचे (अंडी देण्यासाठी कमी पाण्यात येणारे) मासे पकडण्याची लगबग युद्धपातळीवर सुरू झाली आहे. १ जूनपासून समुद्रातील मासेमारी कायदेशीररीत्या बंद झाल्यामुळे खवय्यांचे डोळे गोड्या पाण्यातील मासळीकडे लागले होते. मात्र, जूनचा पंधरवडा उलटला तरी पाऊस नसल्याने जलस्रोत आटले होते आणि माशांची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. आता पावसाच्या आगमनाने चित्र बदलले असून बाजारात आणि नदी-नाल्यांच्या काठावर शेतात गोड्या पाण्यातील माशांची मोठी मेजवानी सुरू झाली आहे. सध्या चिवण्या, मळे, शिवडा, कटला, अरलय, वाम, कोलंबी, खवल आणि म्हऱ्या यांसारखे मासे सापडत आहेत. स्थानिक लोक रात्री-अपरात्री आणि पहाटेच्या वेळी खूप मेहनतीने हे मासे पकडत आहेत.काही नागरिक या माशांची विक्री करून त्यातून रोजगार उपलब्ध केला जातो.



### रामचंद्र पवार यांचे निधन

**कोलाड** : रोहा तालुक्यातील गोवे गावचे रहिवाशी रामचंद्र माळू पवार यांचे गुरुवारी (दि.२५) निधन झाले. निधनासमयी ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईकांसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन मुलगे, एक मुलगी, तीन सुना, जावई, नातवंडे व मोठा पवार परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार दि.४ जुलै, तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि.७ जुलै रोजी त्यांच्या राहत्या निवास्थानी होणार असल्याचे पवार कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.



### कृषी मेळाव्याचे यशस्वी आयोजन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील माळी समाज हॉलमध्ये तालुकास्तरीय कृषी मेळावा आणि मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. पंचायत समिती श्रीवर्धन आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री आ. आदिती तटकरे यांनी भूषविले होते. याप्रसंगी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या विशेष कृषी पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

या मेळाव्यात उपस्थित राहिलेल्या विविध कृषी तज्ज्ञांनी शेतीपूरक व्यवसाय, पिकांचे उत्तम नियोजन, खतांचे व्यवस्थापन आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक शेती पद्धती आणि शासकीय योजनांचा लाभ घेऊन तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपली प्रगती साधावी, असे आवाहन यावेळी मंत्री महोदयांनी केले. या कार्यक्रमाला अलिबाग कृषी सभापती वैकुंठ पाटील आणि श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती सचिन किर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, तहसीलदार महेंद्र वाकलेकर, वासंती गुणाजी, उपसभापती पूजा शिंदे, मंदार तोडणकर, मोहमद मेमन यांच्यासह विविध विभागांचे शासकीय अधिकारी व पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. या मार्गदर्शन शिबिरासाठी श्रीवर्धन तालुक्यातील शेतकरी बांधवांनी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

### पनवेलमध्ये महिलेचा मृतदेह आढळला

**पनवेल** : शहरात एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही महिला बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. तिचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून, ती सावळ्या वर्णाची आहे. अंगात फिकट रंगाची साडी व ब्लाऊज परिधान केलेले होते. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### पनवेलमध्ये सामाजिक न्यायाचा बुलंद संदेश

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच सामाजिक न्याय दिनाच्या औचित्याने पनवेल येथे आयोजित करण्यात आलेला ''समता मार्च'' विविध सामाजिक संघटनांच्या मोठ्या सहभागात यशस्वीरित्या पार पडला.




मागील चार वर्षांची यशस्वी परंपरा कायम राखत यंदाचा समता मार्च अधिक व्यापक आणि प्रभावी ठरला. सकाळच्या सुमारास उरण, सायन, अंबरनाथ, मुंबई (सीएसटी), कामोठे, खांदा कॉलनी आणि पनवेल परिसरातील विविध समविचारी संघटना, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सामाजिक न्याय, समता आणि बंधुभावाचा संदेश देण्यासाठी आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावर्षी अधिकाधिक समविचारी संघटनांना एकत्र आणण्याचा संकल्प यशस्वी झाला. महा. अंनिस पनवेल, संविधान प्रचारक, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, ग्राम स्वराज समिती महाराष्ट्र, यूथ फॉर्म, धम्मयान संस्था तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ, खांदा कॉलनी आदी संघटनांनी नियोजन, समन्वय, प्रशासनाच्या परवानग्या मिळविणे आणि उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मार्चला सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पनवेल मार्केट, बस स्थानकासमोरील सोनबा येलवे पाणपोई, वडाळे तलाव, धूतपापेश्वर कारखाना, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, कृष्णाळे तलाव, संत तुकाराम स्मारक आणि पनवेल बाजार मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मार्चचा समारोप करण्यात आला.

### पनवेलमध्ये काचेच्या बाटलीने मारहाण

**पनवेल** : मंगल राठोड हा पनवेलमधील आझाद नगर झोपडपट्टी येथे राहत असून, तो पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर साईबाबा रेल्वे पार्किंगमध्ये दुचाकी वाहने पार्क करण्याचे काम करत होता. यावेळी नितीन शिंदे आणि अजय शिंदे हे मद्यपान करून आले आणि मंगल याला मारहाण केली. यावेळी नितीन शिंदे याने काचेची बाटली त्याच्या डोक्यात मारली. त्यानंतर फुटलेल्या बाटलीने त्याला पुन्हा मारण्यासाठी आला असता मंगल याने डावा हात पुढे केला. यावेळी त्याच्या डाव्या हाताच्या दंडाला देखील दुखापत झाली.

**विकासाचा भाज्यांना मोठा फटका** | **पावसाळ्यातील उदरनिर्वाहावर गदा**

# खवय्यांना रानभाज्यांची प्रतीक्षा कायम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पावसाचा जोर अद्याप वाढलेला नाही. त्यामुळे पावसाळ्यात नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या आरोग्यवर्धक रानभाज्यांची प्रतीक्षा कायम आहे. गेल्या वर्षी मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने रानभाज्या आणि कंद लवकरच बाजारात विक्रीसाठी आले होते. मात्र, यावर्षी जून महिन्याची अखेर येऊनही पावसाच्या अभावामुळे रानभाज्या उगवलेल्या नाहीत.

उरण तालुका बहुतांश डोंगराळ आणि जंगलांनी वेढलेला असल्याने या तालुक्यात अनेक दुर्मिळ आणि औषधी वनस्पती फळे आणि रानभाज्या आढळून येत असतात. उन्हाळा संपून पावसाळ्याची चाहूल लागली की, या भागातील आदिवासी जंगल, डोंगर आणि रानमाळात उगवणारे करांदे, हळदे यासारखे कंद गोळा करून त्याची उरणसह पनवेल येथील बाजारात विक्री करून आपली उपजीविका करत असतात. तसेच शेवळा, टाकळा, कंटोली, कोरळा, यासारख्या रानभाज्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने, या भागातील बाजारपेठा या रानभाज्यांनी भरून जातात. दरवर्षी पावसाळ्यात या रानभाज्या मिळत असल्याने खवय्यांना देखील या भाज्यांचे वेध लागलेले असतात. पावसाळ्यात बहुतांश आदिवासींना रोजगार नसल्याने तालुक्यातील बहुतेक आदिवासी रानभाज्या गोळा करण्याचा आणि विकण्याचा व्यवसाय करतात आणि त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो.

गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा पावसाने खुप उशीरा सुरूवात केली असून, पाहीजे तसा जोर धरलेला नाही. त्यामुळे पावसाअभावी येथील जंगलात रानभाज्या उगवलेल्या नाहीत. त्यातस उरणमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या विकास कामांमुळे येथील डोंगर आणि जंगले नष्ट केली जात आहेत. त्यामुळे देखील रान भाज्यांचे अस्तित्त्व देखील संपुष्टात येण्याची भीती वर्तविली जात आहे. परिणामी पावसाळी हंगामातील आदिवासी जमातीचा उरनिर्वाह देखील धोक्याची येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

#### रानभाज्यांची औषधी गुणधर्म

पावसाळा सुरू झाला की, डोंगराळ भागात डोंगरमाथ्याला रानभाज्या तयार होतात. या भाज्या कोणतेही खते आणि कीटकनाशकांच्या वापराशिवाय मिळत असल्याने, या भाज्या पौष्टिक आणि औषधी असतात. त्यामुळे या भाज्यांच्या खरेदीकडे ग्राहकांचा अधिक कल असतो. त्यामध्ये कुलू, अंबाडी, शेवळा, टाकळा, भारंगी कंटोळे अशा रानभाज्यांचा समावेश आहे.

#### अधुनिककरणाचा परिणाम

गेल्या काही वर्षांपासून उरण तालुक्यात विकासाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात भरावाची कामे सुरू आहेत. त्यामुळे मातीसाठी या भागातील जंगले, डोंगर आणि माळराने पोखरली जात आहेत. त्याचा परिणाम येथील कंद, रानभाज्यांवर झाला आहे. जंगल, डोंगरातून मिळणाऱ्या रानभाज्या आणि कंदाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. त्यामुळे पूर्वी एक दोन तासात गोळा करता येणाऱ्या रानभाज्या गोळा करण्यासाठी आता पूर्ण दिवस लागत आहे. तसेच, निसर्ग वाचविण्यासाठी शासनाने या भागातील माती काढण्यास बंदी आणावी, अशी मागणी देखील येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ जून

१) श्री.विश्वनाथ दामोदर जोशी श्रीबाग-२ अलिबाग दि.२८-६-१९३३

२)प्रभाकर अनंत वेंगुर्लेकर मु.वाडगाव, अलिबाग दि.२८-६-१९४३

३)श्रीम.रूपा रघुनाथ कुलसंगे पोयनाड, अलिबाग दि.२८-६-१९५७

४)श्री.दिलीप दत्तात्रय प्रधान पिंपळभाट, अलिबाग दि.२८-६-१९५२

५)श्री.कमलाकर वेंकटेश स्वामी अलिबाग दि.२८-६-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

# उरणच्या बाजारात रानभाज्या दाखल

- आदिवासी महिलांना रोजगाराचे साधन
- भाजीपाल्याच्या तुलनेत स्वस्त

**| उरण | प्रतिनिधी |**



वर्षातून एकदा तरी रानभाजी खाण्याची खेडेगावातील परंपरा आहे. त्यामुळे ग्रामीण भागासह शहरी भागांमध्येही रानभाज्यांना मागणी असते. रानभाज्या फक्त एक ते दोन महिने जंगलात उगवतात. पाऊस जसजसा वाढत जाईल, तसतशा विविध रानभाज्या रानात मिळणार आहेत. बांधावरील रानभाज्या गायब झाल्या आहेत. त्यामुळे रानभाज्यांसाठी आदिवासी महिलांना वणवण करावी लागत आहे. सध्या उरण बाजारपेठेत अंबाडी, कुलू, भारंगी, टाकळा, अळू, शेवळा आदी रानभाज्या दाखल झाल्या आहेत. पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्या स्वस्त, औषधी असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. रानभाज्यांबद्दल नसलेली माहिती, करण्याच्या निराळ्या पध्दती, यामुळे रानभाज्यांची विक्री अतिशय कमी होते. परिणामी स्वस्त असूनही रानभाज्यांना सामान्यांच्या ताटात स्थान मिळत नाही. मात्र, आता सर्वसामान्यांना पावसाळी भाज्यांचा पर्याय उपलब्ध होऊ लागला आहे. सध्या उरण शहरातील आनंद नगर, उरण राजपाल नाका, महाराष्ट्र स्वीट जवळ आदी ठिकाणी आदिवासी महिला रानभाजी विकताना दिसत आहेत. सध्या उरण बाजारात अळू विक्रीसाठी आले आहेत. मात्र, मागील वर्षी १० रुपयांना मिळणारा पाच अळूचा वाटा, यावर्षी २० रुपयांना मिळत आहे.

टाकळा गुणाने उष्ण असल्याने शरीरातील वात आणि कफदोष कमी होण्यास मदत होते. वरचेवर टाकळा भाजी खाल्ल्याने अंगातील अतिरिक्त मेद झडतो. तसेच त्वचाविकार कमी होतात. लहान मुलांच्या पोटातील कृमी बाहेर पडण्यासही या भाजीचा उपयोग होतो. शेवळा औषधीयुक्त भाजी आहे.

शेवळाची एक जुडी ३० ते ४० रुपयांपर्यंत विकली जाते. अंबाडी, कुलू, भारंगी, टाकला आदी भाजांची जुडी १० रुपयांना मिळते. अंबाडी आता दुर्मीळ होत असून, दिसेनाशी होत आहे. आंबट चवीची अंबाडीची भाजी चविष्ट असते. याशिवाय अनेक पोषकतत्त्वांनीही परिपूर्ण असते. अंबाडी मध्ये आयर्न (लोह), व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी ६, कॅल्शियम, झिंक यांसारखी अनेक पोषकतत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. रानभाज्या या इतर भाजीपाल्याच्या तुलनेत स्वस्त असतात. रानभाज्या खायलाही पौष्टिक आणि फायदेशीर असतात. आदिवासी स्त्रिया रानावनात फिरुन रानभाज्या मिळवितात. रानभाज्या विकून आदिवासी महिलांना रोजगार मिळत असून, रानभाज्या त्यांना आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देत आहेत.

या रानभाज्या शोधून तसेच अथक परिश्रम घेत त्यांची खुडणी करून आदिवासी समाजबांधव व महिला ठिकठिकाणी बाजारपेठेत बसून त्यांची विक्री करून दैनंदिन

## रविंद्र पारखे यांनी स्वीकारला पदभार

**नागोठणे :** जिल्ह्यातील मध्यवर्ती आणि महत्वाचे पोलीस ठाणे असलेल्या नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक रविंद्र पारखे यांनी बुधवारी (दि.२४) पदभार स्वीकारला. यावेळी नागोठणे पोलीस ठाण्यातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांची अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात बदली झाल्याने सपोनि रविंद्र पारखे यांनी नागोठणे पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्याने नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सपोनि रविंद्र पारखे यांची भेट घेऊन त्यांना येथील चांगल्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.






# तांबाटी ग्रामपंचायतीत अभ्यासिका केंद्र सुरू

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील मुलांनी स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करून अधिकारी बनले पाहिजेत. हे उदिष्ट डोळ्यासमोर ठेवून तांबाटी ग्रामपंचायतीने गोदरेज एंटरप्राईजेस ग्रुपच्या सामाजिक दायित्व उपक्रमातर्गंत गावात अभ्यासिका आणि वाचनालय केंद्राचे गुरुवारी (दि.२५) जून रोजी उद्घाटन करण्यात आले. तांबाटी ग्रामपंचायत स्पर्धा परिक्षा अभ्यासिका केंद्र सुरू करणारी जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

याप्रसंगी कृष्णा पारंगे, भाई शिंदे, सचिन पवार, संतोष बैलमारे, प्रमिला पाटील, आर.बी. गायकवाड, महेश पाटील, ज्ञानेश्वर सुतार, भाग्यश्री सावंत, जितेंद्र सकपाळ, अविनाश आमले, प्रशांत कदम, अरुणा सावंत, नितीन कदम, संतोष दळवी, हरिभाऊ जाधव, रितेश मोरे, सुरेश पवार, प्राजक्ता पाटील, सुगंधा जाधव, अस्मिता कदम, शितल पाटील, कविता मिरकुटे आदी उपस्थित होते.

# चरफळवाडीत एकोप्याने वृक्ष लागवड

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**



गावातील एकोप्याचे उत्तम दर्शन घडवत चरफळवाडी ग्रामस्थांनी मंगळवारी (दि.२३) जून रोजी गावाच्या गुरचरण क्षेत्रात ७५० रोपे लावून वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम यशस्वी केला. गावात कार्यरत असलेल्या दी प्राइड इंडिया या संस्थेने मे महिन्यात ही ७५० रोपे गावकऱ्यांना उपलब्ध करून दिली होती. मात्र, यंदा पाऊस उशिरा सुरू झाल्याने ग्रामस्थांनी या रोपांचे जून अखेरपर्यंत काळजीपूर्वक जतन केले. २२ जून रोजी पावसाला सुरुवात होताच, गावातील प्रत्येक घरातील एका सदस्याच्या उपस्थितीत हा वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमात फळझाडे व फुलझाडांची लागवड करण्यात आली. या वृक्षांचे फायदे पुढच्या पिढीला व्हावेत आणि गावातील मुलांना ताजी फळे-फुले मिळावीत, हा यामागचा मुख्य हेतू आहे, असे ग्रामस्थांनी सांगितले. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन करणे आवश्यक आहे, ही जाणीव गावकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.गावाचा एकोपा सांभाळून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत अध्यक्ष जानू बांगारे, वसंत बांगारे, दामोदर निरगुडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

गुरचरणामध्ये लावलेल्या झाडांमुळे गाव समृद्ध होईल. असेच उपक्रम प्रत्येक गावात राबवावेत, असे आवाहन चेरफळवाडीचे शिक्षक राजू बांगारे यांनी केले. चरफळवाडीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## फणसांची आवक वाढली

**चिरनेर :** महिलांच्या सौभाग्याचे प्रतीक मानणाऱ्या वटपौर्णिमेचा सण अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला असून, पनवेल भाजी मार्केट यार्डसह पनवेल बाजारात फणस दाखल झाला आहे. सध्या चाळीस रुपये किलो दराने फणसाची विक्री केली जात, असल्याचे व्यापारी रमेश मोहकर यांनी सांगितले.

## शोभना गाढे यांना देवाज्ञा

**पाली /बेणस :** शोभना गाढे (रा. रिस, खालापूर) यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक व सामाजिक वर्तुळात तीव्र शोक व्यक्त केला. पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांवर सुसंस्कार रुजविण्यावर त्यांचा विशेष भर होता. पुण्यानुमोदन व शोकसभा कार्यक्रमाप्रसंगी राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थितांनी शोभना गाढे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना अश्रूपूर्ण नयनांनी श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, दोन मुली, जावई व नातवंडे असा मोठा उच्चशिक्षित परिवार आहे.

# दुबार पेरणीचे संकट टळले

**शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित**

**| उरण | प्रतिनिधी |**



जून महिन्याचा शेवटचा आठवडा आला तरी मान्सूनच्या पावसाचे आगमन लांब चालले असल्याने बळीराजाची काळजी वाढत चालली होती. दरम्यान, जिल्ह्यात गुरुवारपासून दमदार पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट टळले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांनी मशागतीची कामे आटोपून पेरणीची लगबग सुरू केली होती. पाऊस वेळेवर येईल या आशेने अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू केल्या. पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंतेत होते. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले होते. या आठवड्यात पावसाने हजेरी लावली.

सर्वदूर झालेल्या पावसामुळे भात उत्पादक शेतकऱ्याना मोठा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार सोमवारी दुपारनंतर तालुक्यात विविध भागांत पावसाने दमदार हजेरी लावली. तब्बल १५ ते २० दिवस उशिराने पावसाचे आगमन झाले असले तरी त्याने शेतकर्यांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. काही ठिकाणी रोपे उगवूनही आली होती. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने ही रोपे करपण्याची भीती निर्माण झाली होती. दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्गात मोठी चिंता होती. पावसामुळे शेतातील पिकांना जीवदान मिळाले असून भात लागवडीच्या कामांनाही वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २८ जून ते ०४ जुलै २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## जुन्या आठवणींना उजाळा मिळेल

**मेष :** हा साप्ताह मेषराशीधारकांना थोडा निवांतपणाचा जाणार आहे. दुसऱ्यांना मदत करण्याची संधी सोडू नका. यामुळे तुमचा भविष्यात फायदा होऊ शकेल. आपल्या जोडीदाराला मदत करावी लागेल, त्यामुळे घरातील वातवर चांगले ठेवता येईल. मित्रपरिवारा सोबत गाठभेट झाल्याने जुन्या आठवणीना उजाळा मिळेल. आपल्या कामात बदल करण्याचे विचार डोक्यात चालू असतील तर त्याला सध्याच्या स्थितीमध्ये हवा देऊ नका. वातवरण चांगले नाही त्यामुळे नुकासन होऊ शकते. शांतपणे विचारपूर्वक घेतलेले निर्णय हे आपल्याला भविष्यासाठी उपयोगी पडणार आहेत. विशेषता भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णया बाबत चूक होण्याची शक्यता राहील. मनस्थिती चांगली ठेवण्यासाठी विचारापासून लांब राहा. उद्योगधंद्यात हळूहळू कामांना गती प्राप्त होईल. नोकरदारांनी मात्र थोडी सावध भूमिका घेण्याची गरज आहे. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेऊन काम करावे. **महिलांना :** महिलावर्गाने तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी. जागरण व अतिताण धोकादायक ठरू शकतो. **शुभ दिनांक :** २९, ३०.

## कामाचा ताण वाढेल

**वृषभ :** हा साप्ताह वृषभराशीसाठी कटकटी निर्माण करणारा ठरू शकतो. कामाचा ताण, स्वरूप बदलणार आहे. मात्र, त्याकडे संधी म्हणून पाहिलेत तर योग्यवेळी त्याचे पडसाद आपल्याला मिळणार आहेत. पैसे मिळवण्यात अडचणी येतील त्यामुळे निराश होऊ नका. थोडा संयम या कलावधीत गरजेचा आहे. हळूहळू वातवरण सुधारत जाईल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेण्याची गरज आहे. त्याच्या नियमित औषध उपचाराकडे दुर्लक्ष करू नका. या राशीच्या व्यक्तींनी आपला प्रवास सावधान पुर्वक करावा प्रवासाला निघताना नियोजण करणे आवश्यक आहे, त्यामुळे आपला होणारा त्रास वाचू शकेल. वहान चालवणाऱ्यांनी वाहनाच्या वेगा बाबत पूर्ण सावधानता पाळावी. आपली महत्वाची कागदपत्रे गहाळ होणार नाहीत याची काळजी घ्या. व्यापारीवर्गाने जास्त गुंतवणूक करण्याच्या भानगडीत पडू नका. घरात आपण शांत राहाण योग्य होईल नाहीतर कारण नसताना वातवरण बिघडेल त्याच्या परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. **महिलांना :** महिलावर्गाचा हा कालवधी सणसमारंभात व्यस्त होणार आहे. घरात नवीन वस्तूची खरेदी करताना लक्षपूर्वक घ्या. **शुभ दिनांक :** ०१,०३.

## मनमोकळ्या स्वभावाला मुरड घाला

**मिथुन :** हा साप्ताह मिथुनराशीसाठी अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक पाऊल सावधानपूर्वक उचलण्याची गरज आहे. ताक देखील फुकून पिण्याचा कालावधी आहे. कोणतीही गोष्ट घाईत करू नका, तसेच गरज नसणाऱ्या गोष्टीचा अतिविचार करू नका. आपले विरोधक आपल्यावर कुरघोडी करू शकतात. कामावर थोडा तणाव अनुभवाल आर्थिक अडचण दूर करण्यासाठी बुधवारी मोनपाळणे फायद्याचे ठरेल. कोणतही महत्वाचे काम योग्य सल्ल्याशिवाय करू नका. थोडे थांबा वाट पाहा मार्ग मिळेल. राजकारणी व्यक्तींनी या कालावधीत सावध राहावे आपल्यावर आरोप होऊ शकतात. आपल्या मनमोकळ्या स्वभावाला थोडा मुरड घाला. आपल्याकडे असलेल्या दूरदृष्टीचा योग्य उपयोग करून घ्या. व्यसनापासून जितके दूर राहाता येईल तितके दूर राहणे आवश्यक आहे. आता जे श्रम कराल त्याचा फायदा नंतर आपल्याला होणार आहे. **महिलांना :** महिलावर्गाने या कालवधीत शाकाहारी होणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. घरात एकादी गोड बातमी मिळण्याचा संभव आहे. सकाळी मुंग्यांना थोडी साखर घालावी. **शुभ दिनांक :** ०२,०४.

## नकारात्मक विचारानपासून दूर राहा

**कर्क :** हा साप्ताह कर्कराशीसाठी अडचणी दूर करणारा आहे. जी कामे अडकली असतील तिला चालना देण्यास हरकत नाही. जमिनीच्या व्यवहारात काम करणाऱ्या व्यक्तींना फायदा संभवतो. भावनेच्या भरात वहात जाणारा स्वभावावर नियत्रण मिळवू शकलात तर कोणतेही कठीण काम या सप्ताहात पूर्ण करू शकाल. शत्रूने आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला तरी या कालावधीत आपल्या हितचिंतकानमुळे आपल्याला साह्य मिळणार आहे. त्यामुळे या गोष्ट मनावर घेत बसू नका. नकारात्मक विचारानपासून दूर राहणे आपल्या हिताचे आहे. घरातील कामासाठी थोडा अधिक वेळ देणे आपल्यासाठी चांगले ठरेल. आपल्याला कार्यात यश मिळण्याचा मार्गमोकळा असल्यामुळे नव्या कार्याला सुरुवात करण्यास हरकत नाही. कामामधून आपल्या कार्याला वाव देणाऱ्या घटना घडणार आहेत, अशावेळी पाठ फिरवू नका. सोभोवताली आनंदी वातारण राहील. प्रवासाचा बेत सध्या टाळा. **महिलांना :** कोणाचेही बोलणे मनाला लाऊन घेऊ नका. त्यात आपली शक्ती वाया जाते हे लक्षात ठेवा. आपल्या कामात गुंतून राहा. **शुभ दिनांक :** २८,२९.

## खर्चावर नियंत्रण ठेवा

**सिंह :** हा साप्ताह सिंहराशीसाठी धनाचा मार्ग मोकळा करणारी असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण होणार आहे. आता केलेली बचतच पुढे उपयोगी पडू शकते. त्याबरोबर हा कालावधी थोड गंभीरतेने घेण्याचा सुद्धा आहे. कोणतीही गोष्ट हलक्या फुलक्या रीतीने घेऊ नका. दुसऱ्यांच्या कामाकडे यावेळी लक्ष न देता स्वतः च्या कामाकडे लक्ष देण हे आपल्याला हितकारक आहे. उगाचच दुसऱ्याच्या भानगडीत नाक घुसवून आपण अडचणीत येऊ नका. आपले दुख कोणाला न सांगता मनात दाबून ठेवणे हे तब्बेतीच्या दृष्टीने त्रासदायक ठरू शकते. नोकरदारवर्गाला मनाजोगत्या बदलीसाठी वरिष्ठांना बोलण्यास हरकत नाही. मात्र, कामावर वाद-विवादापासून लांब रहाणे चांगले होईल. व्यापारीवर्गाने एकद्या नवीन व्यवहारात भाग घेण्यास हरकत नाही. साठवणुकीच्या भानगडीत पडू नये. **महिलांना :** आपण भले आपले काम भले अस धोरण ठेवणे फायद्याचे राहील, नवीन कपडा, दागिने याची खरेदी संभवते. **शुभ दिनांक :** ०१,०४.

## पैशाचा व्यवहार लक्षपूर्वक करा

**कन्या :** हा साप्ताह कन्याराशीसाठी सावधानता बाळगणारा असणार आहे. कोणत्याही वादविवादापासून लांब राहा. विशेषता तरुणांनी या कालावधीत मोबाईल, इंटरनेट ही गोष्ट पूर्ण सावधानतेनेच वापराव्यात ज्यांना शक्य असेल त्यांनी या पासूनलांब राहणे चांगले ठरेल. कोणताही पैशाचा व्यवहार करताना लक्षपूर्वक करावा महत्वाची कागदपत्रे कितीही जवळची व्यक्ती असली तरी पूर्ण वाचूनच त्यावर सही करावी. अनोळखी व्यक्तीशी व्यवहार टाळणे योग्य होऊ शकते पण त्यात ही व्यवहार आवश्यक असेल तर तो हा कालावधी संपल्यानंतर करणे उत्तम राहील. नोकदार व्यवसायीकांनी सध्या कोणताही मोठा बदल करू नका. मानसिक आरोग्य हीच शारीरिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे हे विसरू नका. साहित्यक्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मान मिळण्याची संधी आहे त्यांनी प्रयत्न करण्यास हरकत नाही कुंडलीत राजयोग असेल तर हा कालावधी राजकारण्यासाठी चांगली बातमी देणारा ठरू शकतो. **महिलांना :** महिलावर्गाने या कलावधीत कर्ज, उधारी या भानगडीत पडू नये. घरात स्वयंपाक करताना योग्य काळजी घ्या. **शुभ दिनांक :** २९,०३.

## नवीन आर्थिक स्तोत्र मिळतील

**तुळ :** हा साप्ताह तुलराशीसाठी शुभयोग घेऊन आलेला आहे. जे काही कराल त्यात यश सहज मिळू शकेल असा कालावधी असला तरीपण डोक्यात हवा जाऊन देऊ नका. आपल्याला एखादे नवीन आर्थिक स्तोत्रही मिळण्याचा संभव आहे. मात्र, अशावेळी आपली सदविवेकबुद्धी जागृत ठेवणे महत्वाचे ठरेल. गैरमार्गाचा पैसा नको, तो त्रास उत्पन्न करतो नाहीतर आपले जीवन नको त्या दिशेला घेऊन जातो. एखादा जवळचा मित्र आपल्या शब्दामुळे दूर जाणार नाही याची काळजी घ्या. कालावधी चांगला आहे. या कालावधीत आपण चांगल्या योजना कार्यन्वित करू शकाल. आता केलेले सामाजिक काम आपल्याला भविष्यात उपयोगी पडणार आहे. नोकदारवर्गाला आपल्या कामामुळे प्रशंसा अनुभवण्यास मिळेल वरिष्ठ खुश असतील तेव्हा आपल्या पदोन्नतीचा प्रस्ताव त्यांना देण्यास हरकत नाही. मुलांचे अभ्यासात मन लागणार कलावधी आहे, त्यांनी भविष्याच्या दृष्टीकोनातून हालचाल करण्यास हरकत नाही. स्पर्धा परीक्षाच्या दृष्टीकोनातून आपली तयारी करा, यश मिळेल. **महिलांना :** महिलांच्या हातात पैसा खेळता राहणार आहे. एखादे धार्मिककार्याची तयारी कराल. **शुभ दिनांक :** ०१,०२.

## घरात शुभकार्य होण्याची शक्यता

**वृश्चिक :** हा साप्ताह वृश्चिकराशीसाठी खूपच आशादायक जाणार आहे. एखादे नवीन उत्पन्नाचे साधन आपल्याला गवसणार आहे. एखादी चांगली सुरुवात आपल्याला लाभ देणारी ठरू शकेल. आपण कार्यरत असलेल्या कार्यक्षेत्रातही वाढ होणार असल्यने, त्याचा फायदा आपल्याला मिळेल. आपल्या सर्वश्रेष्ठ कार्याची सुरुवातही असू शकते. बेरोजगारांनी नोकरीसाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. अनुभवी कलाकारांना एखादी मोठी संधी चालून येईल. मोठा सन्मान प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू होईल. आत्मविश्वास वाढणाऱ्या घटना घडतील. घरात शुभकार्य करण्याच्या दृष्टीने तयारी कराल. लहान मोठे खर्च होतील पण पैशाचा मार्ग ही आपल्याकडे वळणार असल्याने त्या खर्चाची गणिते जुळतील. आपली कोणतीही मेहनत वाया जाणार नाही. विद्यार्थीवर्गाने थोडी अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. **महिलांना :** महिलावर्गाने आपल्या तोंडावर नियंत्रण ठेवणे हे हितकारक आहे नाहीतर ही गोष्ट भांडणाला कारणीभूत होऊन यशाच्या मार्गात अडथला येऊ शकता. **शुभ दिनांक :** ०३,०४.

## पैशांचे योग्य नियोजन करा

**धनु :** हा साप्ताह धनुराशीसाठी अनावश्यक खर्च वाढवणारा असू शकतो, त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे हिताचे आहे. आपल्याकडे येणाऱ्या पैशात वाढ संभवते आहे. नवीन व्यवसाय चालू करण्यास हरकत नाही. वहान, जागा खरेदीची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल चालू होईल. आपण बऱ्याच दिवसाची एखादी अपूर्ण इच्छा पूर्ण करू शकाल. कामगारवर्गाच्या कामात सुधारणा झाल्याने या क्षेत्रात आपले वलय वाढेल. राजकरणात यश मिळेल. घरातील ज्येष्ठ व्यक्ती न विषयी चिंता वाढेल थोड त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वेळेवर औषध उपचार केल्यास आजारपण लांब ठेवता येईल. चैनीवर खर्च करू नका, आपल्याकडे आलेल्या पैशाचे योग्य नियोजन आवकश्यक आहे. घरघुती आर्थिक प्रश्नमार्गी लागू शकतील. **महिलांना :** महिलावर्गाने जास्त ताण न घेता घरातील वातावरण हलक फुलक करण्याचा प्रयत्न करा. नोकरदार स्त्रियांना कामात बदल करण्याचे मनात असेल तर येणारा कालावधी मंदीचा असल्याने जोखीम घेऊ नका. नंतर संधी मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. **शुभ दिनांक :** २९,३०.

## धनलाभ होण्याची शक्यता

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी भौतिक सुखसुविधांचा लाभ देणारा आहे. आपले विरोधक ही विचारात पडतील असे कार्य आपल्याकडून घडणार आहे. आपले कौतुक होण्याचा कालावधी आहे. आपल्या नातेवाईकांचे आपल्याला साह्य मिळेल. नवीन जागा घेण्या बाबत हालचाल करण्यास हरकत नाही त्याला चांगले रूप देऊ शकाल. फक्त देईल हरी खाटल्यावरी असे धोरण टाळा. ससंर्गजन्य आजारापासून काळजी घेण्याची गरज आहे. थोड तापासारखे वाटेल घाबरून जाऊ नका हे व्हायरल असणार आहे. जेवण वेळेवर करत जा. विद्यार्थीवर्गाचे मन पुन्हा अभ्यासाकडे वळेल. व्यवसायीकांनी नवीन प्रस्ताव स्वीकारण्यास हरकत नाही. आठडवड्याच्या शेवटी धनलाभ संभवतो आहे. फक्त लॉटरी, सट्टा हा मार्ग मात्र टाळा. घरात खास मेजवानीचा बेत केला जाईल. अडकलेले कामम ार्गी लागेल. **महिलांना :** आपण भले की आपले काम भले असे धोरण आपल्याला हितकारक ठरणार आहे. घरात अचानक आलेल्या पाहुण्यांमुळे आपली धावपळ होणार आहे. मात्र, अतिथि देवभव प्रमाणे आपल्याला आशीर्वाद मिळणार आहेत. **शुभ दिनांक :** २,३.

## नवीन वस्तूची खरेदी कराल

**कुंभ :** या साप्ताहात आपण एकट राहणे पसंद करा. आपण एकट राहून स्वतःबद्दल केलेला विचार आपल्या प्रगतीसाठी उपयोगी पडणार आहे. एकट राहण्याने आपल्याला आंतरिक बल ही मिळणार आहे. ताजे तवाने होऊन आपण पुन्हा कामाला लागू शकाल. आपल्या सुदैवाने हा साप्ताह कुंभराशीसाठी ढगाळवातावरण बदलवणारा ठरणार आहे. फक्त निराश असाल तर त्या अस्वस्थेतून बाहेरपडा यश आपल्या जवळ आहे. आपल्या मार्गातील अडचणी दूर होतील. आपल्या प्रयत्नांना विरोधकही अडवू शकणार नाहीत. आपण निर्णय घेऊ शकाल त्या निर्णयाचे पडसाद सकारत्मक असतील. मन प्रसन्न करणाऱ्या घटना घडतील. वाद विवादात यश मिळेल. महत्वाच्या नवीन वस्तूची खरेदी कराल. कामात थोडे कमी जास्त होऊ शकते त्यामुळे महेनतीला प्राधान्य ध्या. आपल्या श्रमाचे चीज होणार आहे. कोणतीही गोस्त फुकट जात नाही त्यासाठी वेळ यावी लागते. **महिलांना :** आपल्या संबधीतामध्ये लढाई, झगडा होऊ शकतो त्यामुळे आपला व्यवहार सरळसोट ठेबा. संसारिक आयुष्यात थोडा अशांतपणा जाणवला तरी नवीन सप्ताहात आपल्याला दिलासा मिळणार आहे. **शुभ दिनांक :** २८,३०.

## घरातील वातवरण आनंदी राहील

**मीन :** हा साप्ताह मीनराशीसाठी कामाचा ओघ वाढवणारा आहे. घेतलेले कार्य पूर्ण करू शकाल. या कालावधीत आपले एखादे खास काम होणार आहे. आपल्या सुख-सुविधानमध्ये वाढ होईल. मित्रामध्ये सोलोखा वाढेल. घरातील वातवरण आनंदी राहील. आपलेले अडकलेले पैसे मिळण्यासाठी या कलावधीत विशेष प्रयत्न करा. कर्ज घेण्यापासून जामीन राहण्यापासून लांब राहा. विद्यार्थीवर्गाने जास्त मेहनत घेण्याची गरज आहे. मेहनतीमुळे आपल्यात ऊर्जा वाढणार आहे, तिचा योग्य वापर करा. अविवाहितांसाठी एखादा चांगला प्रस्ताव येईल तो विचारपूर्वक स्वीकारण्यास हरकत नाही, तरूणांनी तब्बेतीची काळजी घ्यावी. चरबी वाढणारे पदार्थ घाऊ नये. नोकरीत आनंद मिळेल, प्रवासात काळजी घेण्याची गरज आहे, तसेच दुकानदारांनी साठेबाजीच्या भानगडीपासून लांब राहवे. **महिलांना :** लांबच्या प्रवासाचा बेत केला जाईल. त्या संदर्भात नियोजन केले जाईल. मुली, मुलांना चांगले स्थळ येणार आहे. महिलांनी आपले मन वाचनात रमवावे, सप्ताहाच्या शेवटी दिलासा देणाऱ्या घटना घडणार आहेत. **शुभ दिनांक :** २९,३०

# नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी संकुलात चोरी

## सिमेंटचे पत्रे फोडून भुरट्या चोरट्यांचा दुकानात प्रवेश ; १५ ते २० हजारांचा मुद्देमाल लंपास



। नागोठणे । प्रतिनिधी ।

विभागातील शेतकऱ्यांची सर्वात मोठी सहकारी संस्था असलेल्या नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी या संस्थेने आपल्या स्वतःच्या जागेत उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मुंबई गोवा महामार्गाच्या सर्व्हिस रोड लगत बांधलेल्या व्यावसायिक दुकान गाळ्यांत शुक्रवारी (२६) रात्री चोरीची घटना घडली आहे.

अज्ञात चोरट्यांनी तीन दुकान गाळ्यांच्या वरील छताचा सिमेंटचा पत्रा फोडून आतमध्ये प्रवेश करून ही चोरी केली आहे. या चोरीत चोरट्यांच्या हाताला फार काही लागले नसले तरी महामार्गालगत घडलेल्या या चोरीच्या घटनेने व्यापारी वर्गात व नागरिकांत घबराट पसरली आहे.

नागोठणे विभाग सहकारी भातगिरीच्या या व्यावसायिक गाळ्यातील एकविरा स्टोअर नावाने असलेल्या पहिल्या गाळ्यात प्रवेश करून दुकानाच्या गल्ल्यातील ४०० ते ५०० रुपयांची तसेच सिगारेटची पाकिटे लंपास केली आहेत. या दुकान गाळ्याळगतच्या बाजूला असलेल्या दुसऱ्या ऑईलवाला डॉटकॉम या दुकान गळ्यातील महागडे ऑईल लंपास केले आहे. तसेच भातगिरणीच्या या व्यवसायिक गाळ्यांतील शेवटी असलेले एक छोटे हॉटेलही चोरट्यांनी फोडूने २ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. तिन्ही दुकानातील मिळून सुमारे १५ ते २० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला आहे.

या तिन्ही दुकान गाळ्यांवरील छताचे पत्रे फोडलेला पत्रा हा लहान आकारात फोडून प्रवेश केल्याचे दिसून येत असून चोरीचे हे काम एकट्याचे नसून छोटी शरीरयष्टी असलेल्या तरुण मुलाने छोट्या आकारात पत्रा फोडून त्याने आपल्या सहकाऱ्यांसोबत ही दुकानदोडी केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

दरम्यान सपोनि रविंद्र पारखे यांनी नागोठणे पोलिस ठाण्याचा प्रभारी कार्यभार घेऊन दोन-तीन दिवस होत नाही तोच ही चोरीची घटना घडल्याने या भुरट्या चोरट्यांचा छडा लावून त्यांना जेरबंद करण्याचे आवाहन नागोठणे पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

# छ.संभाजी महाराजांची जयंती साजरी



। तळा । प्रतिनिधी ।

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, तळा येथे छत्रपती संभाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची संयुक्ती जयंती नुकतीच अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून दोन्ही युगपुरुषांच्या महान कार्याला उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक महादेव लोकरे यांनी भूषविले, तर पर्यवेक्षिका जयश्री मचे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना रोहित भागवत, प्रा कसबे पी. पी., प्रा सर्जे व्ही. बी. व मुख्याध्यापक महादेव लोकरे यांनी दोन्ही छत्रपतींच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. छत्रपती संभाजी महाराजांचे स्वराज्य रक्षण, त्यांचे अजोड शौर्य आणि राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी घेतलेले क्रांतिकारी निर्णय, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा याविषयी वक्त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आजच्या तरुण पिढीने या दोन्ही महापुरुषांचे विचार आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सीताबाई काठावले यांचे निधन



। रसायनी । प्रतिनिधी ।

सिताबाई काठावले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले मृत्यूसमयी त्या ९८ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर भाताण येथील स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रियाविधी मंगळवार दि. ३० जून रोजी होणार आहे. उत्तरकार्य शनिवार दि.०४ जुलै रोजी भाताण येथील राहत्या घरी होणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगी, तीन मुले, सुना, नातंवडे, पाथवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निवासस्थानी बारा दिवस गरुड पुराण तसेच भजनाचा कार्यक्रम आयोजित असून उत्तरकार्य दिनी शिवचरित्रकार प्रवचन होणार आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. महेंद्र भरत चौधरी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| २४ | २/ब | ४-६१-०० | २-१४ |

**वरील जमिन मिळकती मधील खाते क्रमांक २३७ मधील एकूण क्षेत्र १-२०-० हे. आर. पॉ यापैकी जमिन मालक यांचे मालकीचे असलेले अविभक्त हिस्साचे क्षेत्र ०-३०-० हे आर. पॉ विकत देत आहेत.**

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: २८/०६/२०२६

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफिस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२




# लोखंडे विद्यालयात उत्कृष्ट वाचक पुरस्कार प्रदान

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात आज राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या जयंतीचे औचित्य साधून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळेच्या ग्रंथालयातून ज्या विद्यार्थ्याने जास्तीत जास्त पुस्तके वाचली त्या शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट वाचक पुरस्कारमध्ये प्रथम क्रमांक इयत्ता पाचवीमधील विद्यार्थीनी रुची मोडक हिला प्राप्त झाला. तर द्वितीय क्रमांक नैतिक महाजन, तृतीय क्रमांक रुद्र शिंदे याला प्राप्त झाला. तर उत्तेजनार्थ क्रीतिका साळवी व कृष्णाई पांढरकामे यांना देण्यात आला. या सर्व पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे चेअरमन गणपत जगताप, मुख्याध्यापक अकील मुलाणी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास अरुण खुळपे, सुप्रिया रेडीज, संजय ठमके, सुखदेव सवइसर्जे, नीलम गोळे, संदीप इंगावले, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी, दीपक भोसले व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पिरबाबांचा मोहरम उत्साहात



। श्रीगाव । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील पिरबाबांचा मोहरम सण दि. २६ जून रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. मेढेखार गावात २०० वर्षांपासून परंपरेनुसार एकही मुस्लिम बांधव नसताना हिंदू बांधव हा पिरबाबांचा मोहरम सण उत्साहात साजरा करतात. हा सण ११ दिवस चालतो, पहिल्या दिवशी कुदळ मारणे, सातव्या दिवशी आल्याभोवती ढोल ताशांच्या गजरात पिरबाबांची स्वारी फिरते आठव्या दिवशी सुनरात नवव्या दिवशी अर्ध्या मेढेखार गावात ढोल ताशांच्या गजरात पिरबाबांची स्वारी फिरते दहाव्या दिवशी पिरबाबांचे दर्शन घेऊन नवसाची सैली बांधण्यासाठी मेढेखार गावांसह परीसरातील हिंदू आणि मुस्लिम बांधव येतात. रात्रौ १२ वाजता पिरबाबांची स्वारी संपूर्ण गावात फिरते. अकराव्या दिवशी सकाळी ९ वाजल्यापासून पिरबाबांचे दर्शन घेण्यासाठी पिरभक्तांची अलोट गर्दी केली होती.


### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा सूचना**

उप मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून **आयआरईपीएस** पोर्टलवर ई-निविदेद्वारे एकल बोली प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव : कोंकण रेल्वे विहार, सीवुड्स (पश्चिम), नेरुळ, नवी मुंबई येथील कर्मचारी व अधिकारी निवासस्थानांमधील डाउनटेक ड्रेनेज पाईप्सच्या दुरुस्तीचे काम. निविदा सूचना क्रमांक : केआर-डब्ल्यू-09-2026-03. अंदाजित किंमत:** रु.14,27,526/- (जीएसटी वगळून) **समाप्ती दिनांक/वेळ: 20.07.2026 रोजी 15:00 वा.** पर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी. **काम पूर्ण करण्याचा कालावधी : मान्सूनसह तीन महिने.** मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशीलवार माहिती/सहभागासाठी कृपया **https://ireps.gov.in** ही वेबसाइट पहा. शुद्धीपत्रक/परिशिष्ट केवळ याच वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात येईल.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी पुढे नमूद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक तौफिक अब्दुल सत्तार नागोठणेकर यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरवले होते व त्याबाबत विद्यमान मालक व आमचे अशिलांमध्ये बोलणी चालू होती. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| अनु. क्र. | गावाचे नाव | भूमापन क्र. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोर्लई ता. | ५७/१ | ३३.००.०० | ६६०.०० |
| २ | मुरूड | ५७/२ | २६.००.०० | ५२०.०० |

सदरहू मिळकतींबाबत विद्यमान मालकांचे मालकी हक्काबाबत खातरजमा करण्यासाठी आमचे अशिलांनी दै. कृषीवल या वृत्तपत्रात दि. ०४.१२.२०२६ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती व हरकती मागवल्या होत्या. परंतु आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमधील व्यवहार पूर्णत्वास गेलेला नसून आमचे अशिलांनी सदरहू मिळकतींचा व्यवहार रद्द केला आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २७.०६.२०२६

श्री. अमित महेश्वर देशमुख
ॲडव्होकेट आणि नोटरी
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

दि. २८/०६/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक अनंत लक्ष्मण सावंत यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| तलवडे ता.अलिबाग | १८१ | जिरायत ०-१०-४०<br>वरकस ०-३१-००<br>एकूण ०-४१-४० | ४.०३ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. हे कळावे.

सही/-
ॲड. मानस सुधाकर पाटील
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ७७४३८०९६५३



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतिचे विद्यमान मालक भगवान नामदेव पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह क्काड्रा लीगल वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-पोयनाड, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित खालील नमूद भूमापन क्रमांक व उपविभागः

| क्र. | भूमापन क्रमांक | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. | १२३/१ | ००.६६.१० | ०१.९३/- |
| २. | १२७/१ | ००.३९.५० | ३.६३/- |
| ३. | १२७/२ | ००.१९.७० | ३.३७/- |
| ४. | १२७/३ | ००.१०.६० | ०.२२/- |
| ५. | १२८/१ | ००.५९.७० | ८.६९/- |
| ६. | १२८/२ | ००.११.४० | ०.३९/- |
| ७. | १२९ | ००.१२.०० | ०.१९/- |
| ८. | १३० | ००.६७.८० | ६.४४/- |
| ९. | १३१/१ | ००.४७.०० | ०.८६/- |
| १०. | १३३/१ | ०१.७६.०० | २८.१२/- |
| ११. | १३७/३/अ/१ | ०१.७५.०० | ३.१९/- |
| १२. | १३७/३/अ/६ | ००.२०.०० | ०.५०/- |
| १३. | १३७/३/अ/७ | ०१.८९.०० | ३.१९/- |
| १४. | १३७/३/ब/२ | ०३.१७.०० | ५.०८/- |
| १५. | १३७/६ | ००.०२.०० | ०.०५/- |
| १६. | १३७/७ | ००.०१.०० | ०.०२/- |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २८/०६/२०२६

**क्काड्रा लीगल**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक मनुबाई बारकू देशमुख वगैरे यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत.**

| गट नं/हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| १६/३ | ०-३८-९०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकुण ०-४१-२० | ६.८७ |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकतीमध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०८ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल,
तारीख: २८/०६/२०२६

सही/-
ADV. PRATIKSHA BHASE
B.L.S; LL.B.
A/4, Jai Nagar Society,
Opp. Kinara Society,
52 Bunglow, Court Road,
Old Panvel, Dist Raigad 410206
Phone: 9370930781
Email: pratikshabhaseadv@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत व त्या निवासी सदनिकेचे मालक / कब्जेदार सौ.रेश्मा रविंद्र ढक्षीकर रा.६०९, रानवडे हॉस्पिटल जवळ, चेंढरे अलिबाग यांच्याकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे व सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरोसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे -चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग २२/२४, २२/२५, २२/२६, २२/२७ या बिनशेती मिळकतीवरील ओमकार रेसिडेंन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विद्यानगर (पूर्व) चेंढरे या इमारतीतील ए विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील मिळकत क्रमांक १७१९/७, सदनिका क्रमांक ७, क्षेत्र ५६५ चौ.फुट (५२.५१ चौ.मी.) ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग ही निवासी सदनिका मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.**

वर नमुद केलेल्या सदर निवासी सदनिकेवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे.

अलिबाग,
तारीख : २८/०६/२०२६

ॲड. सागर विजय पाटील
पत्ता - मु. घर नं.१६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड



### जाहीर शुद्धीपत्रकाला उत्तर

ॲड. संजीव अनिल घरत, मु. खंडाळे यांनी मंगळवार दि. २३/०६/२०२६ रोजीच्या दै. कृषिवल या वर्तमानपत्रामध्ये पान नं. ७ वर गट नं.३१/१ या मिळकतीमधून ६ मीटर रूंद व ४० मीटर लांब असा वहीवाटीचा रस्ता असल्याबाबत वाचावे असे म्हटले आहे. आमचे अशिल श्री. विकास अनंत विचारे व त्यांचे सह हिस्सेदारांनी कधीही त्यांच्या मिळकतीमधून ६ मीटर रूंद व ४० मीटर लांब असा वहीवाटीचा रस्ता कधीही दिपम जयंतीभाई पटेल यांना दिला नव्हता व नाही. तसेच असा रस्त्याबाबत कोणताही रजिस्टर करार आमचे अशिलांनी किंवा त्यांच्या सह-हिस्सेदारांनी गट नं. ३१/१ बाबत केलेला नाही. त्यामुळे दिपम जयंतीभाई पटेल यांचेकडे त्याबाबत कोणतेही कागदपत्र असतील तर ते त्यांनी आमचे अशिलास किंवा आम्हास दाखवावेत. अन्यथा ॲड. संजीव अनिल घरत यांचे अशिलांनी सदरचा व्यवहार. करू नये हे सर्वांस कळावे.

अलिबाग :
ता. २८/०६/२०२६

सही/-
ॲड. शिरीष प.लेले
अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्वाना या नोटीसने असे कळविणेंत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव नागांव येथील श्री प्रविण रघुनाथ राऊत, श्री. सुनाभ विजय परुळकर, श्रीमती तेजश्री अजय सरदेसाई, सौ.पूनम ओंकार आगाशे, श्री. कौशिक अजय सरदेसाई वगैरे यांचे समाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकत असून, सदर मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | १ | ०-५०-६०<br>पैकी ०-४१-० | २०=८४ |

सदर ०-४१-०० हे.आर.पॉ. मिळकतीपैकी क्षेत्र ०-२२-९८ हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकत

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| २३५९ | २ | ०-४४-००<br>पैकी ०-३३-६० | १७=१० |

सदर ०-३३-६० हे.आर.पॉ. मिळकतीपैकी क्षेत्र ०-०५-२३ हे.आर.पॉ. क्षेत्राची मिळकत

सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतींत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : २७/०६/२०२६

सही /
ॲड. संजय माधव आचार्य
मु.पो.चौल
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या दुकानी गाळ्याचे विद्यमान मालक शुभदिनी सुधीर गावंड व श्री. स्वामी सुधीर गावंड दोघे रा. वसंत व्हीला, टिळक रोड, मयुर बेकरीजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेला दुकानी गाळामाझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे स्नेही यांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या स्नेही यांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपालिका परिषदेचे हद्दीतील सि.स.नं.६४३, के/१, ६४३/१, ६४३/२, ६४४ के/१, ६४४, ६४४/१ (स.नं.१६८, हि.नं.१७) यावरील त्रिमूर्ती प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., अलिबाग, बिल्डींग अ, तळमजला, दुकान गाळा क्र. ११, क्षेत्र १७५ चौ. फूट बिल्टअप (१६.२६ चौ.मी.) या दुकानी गाळ्याबाबत.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०६/२०२६

सही /-
शेखर विष्णू मगर
पत्ता : - दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड.



### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- रखवालदार/सफाईकामगार पाहिजे संपर्क-८७८८०२१५१०
- ड्रायव्हर पाहिजे संपर्क - ९४२२६९४२०३
- ऑफिस स्टाफ आवश्यक, Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८
- मंगल ग्रेन स्टोअर्स बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मुल व मुली पाहिजेत. संपर्क : ७८७५९९००९२
- प्रशस्त ३००० चौरस फूट खुला हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क - ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाकांक्षी योजना साकार होतील. प्राप्तीचं प्रमाण वाढेल. स्थावर प्रश्नात लाभ प्राप्त होऊ शकेल.
- **वृषभ** : गृहसजावटीच्या क्षेत्रात संधी लाभतील. इतरांच्या नाराजीची दखल घ्या. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मिथुन** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. योग्य मार्गदर्शनातून लाभ होईल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कर्क** : आजचा दिवस धावपळीचा राहील. धार्मिक उपक्रमात सहभागी व्हाल. कर्ज प्रकरण प्रलंबित राहील.
- **सिंह** : प्रापंचिक प्रश्नांचा ताण राहील. आपापल्या क्षेत्रात प्रगती साधता येईल. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **कन्या** : स्वतमाग्रह टाळायला हवा. हितशत्रूंच्या कारवाया वाढीस लागतील. जमा-खर्चाचा मेळ घालावा.
- **तूळ** : महत्त्वाच्या भेटी होतील. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. आर्थिक कराराबाबत सल्ला घ्यायला हवा.
- **वृश्चिक** : कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. दिलासादायक घटना घडतील. कायदेशीर बाबींची काळजी घ्या.
- **धनु** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. चैनीकडे अधिक ओढा राहील. जुनी दुखणी पुन्हा उदभवतील.
- **मकर** : छोट्या उद्योजकांना दिलासा मिळेल. मित्र-आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील. बाकी चिंता करू नये.
- **कुंभ** : भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. उत्कर्षाच्या संधी लाभणार आहेत. सध्या तडजोड श्रेयस्कर ठरेल.
- **मीन** : मनाजोग्या घटना घडतील. स्थापत्य, अभियांत्रिकी क्षेत्रात संधी लाभतील. समाधानी रहाल.

## दिनविशेष
### २८ जून

**२००२** : लोकसभा, विधानसभेसाठी उमेदवारांनी संपत्ती, शिक्षण, गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती देणं बंधनकारक करण्यात आलं.
**२०१३** : लेफ्टनंट जनीव लालजी या लष्करातील पहिल्या महिला सहाय्यक सैनिक अधिकारी ठरल्या.
**२०१७** : कुख्यात मुस्तफा डोसा याचं हृदयविकाराच्या धक्क्याने निधन.
**२०१८** : मुंबईत घाटकोपर पश्चिममध्ये इमारतीवर चार्टर्ड विमान कोसळून दोन वैमानिकांसह पाच जणांचा मृत्यू.

## आरोग्यमंत्र
### गुणकारी तुती

आपल्या दैनंदिन आहारात विविध फळांचा समावेश असतो. मात्र तुतीचं फळ सहसा खाण्यात येत नाही. अर्थातच ही मोठी चूक ठरते कारण पांढरी, काळी आणि लाल रंगाची ही फळं पोटॅशियम, व्हिटॅमिन ए आणि फॉस्फरस या उपयुक्त घटकांनी समृद्ध असतात. म्हणूनच या फळांचं सेवन उपकारक ठरतं. याविषयी...

* औषधी गुणांनी युक्त तुतीच्या सेवनाने दृष्टी चांगली राहते. डोळ्यांच्या आरोग्याचं जतन होतं. * तुती थंड गुणधर्माचं फळ आहे.



तुतीच्या रसात साखरेचा पाक घालून तयार केलेलं पेय घेण्याचा फायदा होतो. हे सरबत उष्णतेपासून शरीराचा बचाव करतं. * तुतीच्या सरबतात कर्करोग नियंत्रित ठेवणारे औषधी गुणधर्म आहेत.* सर्दी-खोकल्यावर उत्तम उपचार म्हणूनही तुतीचं सरबत प्यायलं जातं.* हृदयरोगींसाठी तुतीचं सरबत उपयुक्त सिद्ध होतं. या सरबताने कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित होत असल्यामुळे रुग्णांना फायदा मिळतो.* तुतीच्या सेवनाने यकृताशी संबंधित व्याधींचा सामना करणाऱ्या रुग्णांनाही बरेच लाभ मिळतात.* किडनीच्या आजाराने ग्रस्त असणाऱ्या रुग्णांनीही तुतीची फळं खायला हवीत. * शारीरिक थकव्यावर मात करण्यासाठी एनर्जी फूड म्हणून तुतीच्या फळांचं सेवन गुणकारी ठरतं. * तुतीच्या वृक्षाची साल आणि लिंबाची साल एकत्र वाटून तयार होणारं मिश्रण लेप स्वरुपात चेहऱ्यावर लावल्यास मुरुमांचा त्रास कमी होतो.

## स्मार्ट टॉक
### ॲप्समुळे लागतील चांगल्या सवयी

दोस्तांनो, आपण चांगल्या सवयी लावून घ्यायला हव्यात. या सवयींमुळे आपण आयुष्यात खूप पुढे जाऊ शकतो. तुम्ही आरोग्याकडे लक्ष द्यायला हवं. भरपूर अभ्यास करायला हवा. मुख्य म्हणजे शाळेत नीट लक्ष द्यायला हवं. पुरेशी झोप घ्यायला हवी. आई-बाबा तुम्हाला चांगल्या सवयी लावत असतील. पण काही ॲप्सही तुमची मदत करू शकतात. अशाच काही ॲप्सची ओळख करून घेऊ.

* अंगी शिस्त बाणवण्यासोबतच सतत कार्यरत रहायचं असेल तर तुम्ही हॅबिटिका हे ॲप डाउनलोड करा. या ॲपमध्ये फँटसी गेम आहे. या गेममधल्या चांगल्या सवयी तुम्ही अंगी बाणवू शकता. त्यानुसार तुम्हाला काही पॉईंट्स आणि कॉइन्स मिळतील. यात तुम्ही कॅरेक्टर्सची निवड करायची आहे. चांगल्या सवयी लावायचं ठरवलं की त्यानुसार पॉईंट्स मिळत जातील.

* भरपूर पाणी प्यायला हवं हा सल्ला तुम्हाला मिळत असेल. दररोज आठ ते दहा ग्लास पाणी प्यायल्यामुळे आपलं आरोग्य चांगलं रहातं. प्लांट नॅनी हे ॲप डाउनलोड करून तुम्ही पाणी पिण्याचं नियोजन करू शकता. **(क्रमश:)**

## ब्युटी टॉक
### मेक अप टिकवण्याची त्रिसूत्री

मेक अप केल्यानंतर काही वेळानंतर तो पुसट दिसू लागतो किंवा निघून जातो. मेक अपचा प्रभाव दिवसभर टिकवून ठेवण्यासाठी तुम्हाला काही टिप्स फॉलो कराव्या लागतील.

* मेक अप टिकवण्यासाठी तुम्हाला मॉईश्चर, प्राईम आणि सेट या त्रिसूत्रीचा अवलंब करावा लागेल.

* चेहऱ्यासाठी चांगल्या दर्जाचा मॉईश्चरायझर वापरा. आपल्या त्वचेतल्या ओलाव्याचं प्रमाण दिवसभरात सतत बदलत रहातं. त्यामुळे त्वचेचा ओलावा टिकवून ठेवणारा मॉईश्चरायझर वापरणं गरजेचं आहे.

* प्रायमरचा वापर करा. प्रायमरमुळे मॉईश्चरायझर चेहऱ्यावर टिकून रहातो आणि चेहऱ्याची त्वचा नितळ राहिल्याने मेक अप अधिक प्रभावी ठरतो. यामुळे मेक अप अधिक काळ टिकून रहायला मदत होते.

* मेक अप केल्यानंतर पावडरचा थर द्यायला हवा. यामुळे मेक अप छान सेट होतो.

## पंचांग

**रविवार, २८ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
निज ज्येष्ठ शु. १४, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : शुभ,
सूर्योदय ६.०६ सूर्यास्त ७.१८

## फॉरवर्डस

**ज़िन्दग़ी क़िस्मत सें चलतीं हैं ज़नाब...**

**दिमाग़ सें चलतीं तों बिरबल बादशाह होतां...!**

## भटकंती

सिल्व्हासा ही दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी. इथे पाहण्यासारखी बरीच ठिकाणं आहे. गुजरात आणि महाराष्ट्र या दोन राज्यांच्यामध्ये हे ठिकाण आहे. एकेकाळी सिल्व्हासा पोर्तुगिजांच्या ताब्यात होतं. पश्चिम घाट आणि पर्वतरांगांमुळे इथला निसर्ग खूप सुंदर दिसतो. निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी इथे यायला हरकत नाही.

सिल्व्हासामध्ये वारली संस्कृती अनुभवता येते. वॉटर स्पोर्टसचा मनमुराद आनंद लुटण्यासाठीही तुम्ही इथे येऊ शकता. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### अनेकविध संधी...

साचेबद्ध अभ्यासक्रम पूर्ण करुन पदवी घ्यायची आणि नंतर मनाजोगी नोकरी मिळत नाही म्हणून निराश व्हायचं यापेक्षा काही हटके अभ्यासक्रम पूर्ण करुन चांगल्या संधी मिळवणं केव्हाही चांगलं. याविषयी...

* रीअॅल्टीच्या क्षेत्रात गुंतवणुकीचं प्रमाण बरंच जास्त आहे. म्हणून रीअॅल्टी कन्सल्टंटची मागणी वाढली आहे. त्यामुळे या क्षेत्रातील शिक्षण घेता येईल. * आजकाल विविध बाबींना



इव्हेंटचं स्वरूप प्राप्त झालं आहे. म्हणूनच इव्हेंट मॅनेजर्स किंवा पार्टी प्लानर्सना खूप संधी आहेत. इव्हेंट मॅनेजमेंटचा कोर्स करून या क्षेत्रात पुढे जाता येतं. कलात्मकता आणि कल्पकतेच्या बळावर तुम्ही बाजी मारू शकता. * सध्याच्या काळात व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला जात आहे. त्यामुळे सौंदर्याच्या क्षेत्रात मुला-मुलींना चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत. विविध अॅकेडमीजमधून सौंदर्यविषयक प्रशिक्षण घेऊन ब्युटी एक्सपर्ट म्हणून काम करता येईल. * सध्याच्या धकाधकीच्या काळात फिटनेस ट्रेनरला खूप वाव आहे. डाएट, न्यूट्रिशन, योगाचे अभ्यासक्रम पूर्ण करून फिटनेस ट्रेनर, न्यूट्रिशन एक्सपर्ट म्हणून काम करता येतं. या संधींचा अवश्य विचार करायला हवा.

## खेचाखेची
### होळीचा प्लॅन

आपले मित्र विचारतात, 'होळीचा काय प्लॅन आहे?'
.
.
.
.
.
.
तेव्हा त्यात रंग, पिचकारी, पाणी यांचा काहीही संबंध नसतो.

## वेगळं काही

सायबेरियाच्या पूर्व भागात 'मिरनी माईन' ही जगातली सर्वात मोठी हिऱ्याची खाण आहे. ही खाण १७२२ फूट खोल आणि ३९०० फूट रुंद आहे. रशियन भूगर्भशास्त्रज्ञांनी १३ जून १९५५ या दिवशी या खाणीचा शोध लावला. या शोधासाठी युवी खबरदीन या शास्त्रज्ञाला १९५७ मध्ये लेनिन पुरस्काराने गौरवण्यात आलं. कामाला १९५७ पासून सुरूवात झाली. वर्षातला बराच काळ या भागातलं वातावरण खराब असतं. हिवाळ्यात तर इथल्या गाड्यांमधलं इंधनही गोठलेलं असतं. या खाणीच्या खोदकामात जेट इंजिन आणि डायनामाइट्सचा वापर केला होता. या खाणीच्या शोधानंतर हिरे उत्पादनात रशिया तिसऱ्या स्थानी आला. ही खाण खूप मोठी आणि खोल आहे.

## कुटुंबकबिला
### काय झालं, बाळ रडतंय?

मुलं बोलायला लागत नाहीत तोपर्यंत त्यांना नेमकं काय होतंय हे समजत नाही. आपणच बाळाच्या रडण्यामागची कारणं समजून घेऊन त्यावर उपाय योजावे लागतात. खालील काही कारणांमुळे रात्रीच्या वेळी बाळ रडू शकतं.

* मूल ज्या परिस्थितीत झोपतं तशी परिस्थिती नंतर असतेच असं नाही. म्हणजे मांडीवर झोपवलं की बाळाला शांत झोप लागते. पण नंतर तुम्ही त्याला



पलंगावर ठेवता. त्यामुळे आधीसारखं वातावरण न मिळाल्याने बाळ रडू लागतं. * डायपर बदलल्यामुळे अथवा मोठं भावंड बाळाजवळ झोपत असल्यास त्याच्या हालचालीमुळेही बाळ रात्री उठून रडू शकतं. कोणत्याही प्रकारचा आवाज झाल्यास किंवा गाडीचा हॉर्न वाजल्यास दचकून बाळ रडू शकतं. * आई बाळाला जास्त काळ दूध पाजत असेल तर भूक लागल्याने ते जागं होऊ शकतं. भुकेची जाणीव त्याची झोपमोड करते आणि दूध प्यायला मिळेल या अपेक्षेने बाळ रडतं. याखेरीज बाळाच्या रडण्यामागे काही वैद्यकीय कारणंही असू शकतात. खोकल्यामुळे जाग येत असेल तर याचा संबंध अस्थमाशी असू शकतो पोटदुखीमुळेही बाळ रडू लागतं.

## सुडोकू १२१


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | ३ | | ८ | | |
| | ४ | | ९ | | | | | |
| ३ | | | २ | | ८ | | | ४ |
| ८ | | | ७ | | | ५ | ४ | |
| | १ | ४ | | ५ | | ७ | ८ | |
| | ५ | ७ | | | १ | | | ३ |
| ७ | | | ६ | | ३ | | | ९ |
| | | | | | ९ | | २ | |
| | | २ | | ४ | | | | ८ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९ | ८ | ३ | ५ | ७ | ४ | ६ | २ |
| ७ | ३ | ६ | १ | ४ | २ | ५ | ९ | ८ |
| ४ | ५ | २ | ६ | ८ | ९ | १ | ७ | ३ |
| ९ | ७ | ३ | ५ | ६ | १ | २ | ८ | ४ |
| ८ | २ | ५ | ७ | ९ | ४ | ६ | ३ | १ |
| ६ | १ | ४ | ८ | २ | ३ | ९ | ५ | ७ |
| ३ | ४ | १ | ९ | ७ | ६ | ८ | २ | ५ |
| २ | ८ | ९ | ४ | ३ | ५ | ७ | १ | ६ |
| ५ | ६ | ७ | २ | १ | ८ | ३ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १२१




**आडवे शब्द :-**
१) आपला आवाका पाहून त्याप्रमाणे काम करावे या अर्थाची म्हण
९) दाट, सैलच्या विरुद्ध
१०) वजनदार
११) चर्चा
१२) कमी महत्वाचे
१३) प्राणान्तिक वेदना
१५) दृष्टी
१८) साखर
१९) नोकर
२०) दरवाजा
२२) आश्चर्याची गोष्ट
२४) दिवस
२६) मत्स्य
२७) लिहिलेले वाचणारा
२९) शरीर
३१) संधी, वाव
३३) प्रभात होणे
३५) गव्हाचे पीठ
३७) अरण्यवास
३९) पाठोपाठ
४१) मयूर
४२) गर्दी, भीड
४४) हिस्सा
४५) वृद्धत्व, थोडे
४७) फसविणारा
४८) नजरबंदी, जादू
५०) फणसाचा एक प्रकार
५१) जीवन किंवा संग्राम यातून पळून जाण्याची वृत्ती
५३) तोंडाने तोडलेला पदार्थाचा मोठा तुकडा
५४) विपत्तीची कहाणी
५५) बशीचा जोडीदार
५६) रुग्णालय
५७) मनाचे रंजन करणे
५९) संगीतातील कल्याणरागाचा एक प्रकार
६१) टपाल
६२) भाजी
६३) गोमाता
६४) तात्काळ मिळणारी लोकप्रियता
६५) उदा. मेष, वृषभ इ.
६६) शोभा, सौंदर्य
६९) अतिशय किमतीचे, अमोल
७१) धनुष्यबाण
७३) गळणारा, ठिबकणारा
७४) बारा महिने
७६) एकरुप, रममाण
७९) जरब
८०) मनावर आलेला दाब, भार, वजन
८२) द्रव पदार्थ
८३) पुन्हा पुन्हा
८४) पक्षांचा समूह

**उभे शब्द :-**
१) सुरमा लावण्याची धातूची कांडी
२) नदीचा काठ, तीर
३) पाहुण्यांचे स्वागत
४) अलीकडचा, ताजा
५) मृत्युदाता
६) उथळ आकार
७) मनाला टोचणारे दु:ख
८) रत्न
९) मोठा हातोडा
१२) सन्मान
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) एक तिबेटी केसाळ प्राणी
१६) निर्माता, वडील
१७) मोहरी
२०) प्रतिकूल गोष्ट घडणे (वा.प्र.)
२१) दरवाजा
२३) पेरणी, एक गीत प्रकार
२५) सातूचे पीक
२८) हरभरा
३०) अनंतकालपर्यंत, सूर्य चंद्र जोवर आहेत तो पर्यंत
३२) आजच्या आधीचा दिवस
३४) जागृती
३५) काळी मैना नावाने ओळखले जाणारे बोरफळ
३६) सुवर्णचाफा
३८) सदोदित, नेहमी
४०) पणजीचे राज्य
४३) टीका करणारा
४५) ** *** जय किसान
४६) अरण्य
४९) स्त्री, बाई
५२) लिहिलेले वाचण्याची क्रिया
५४) सूर्याचे एक नाव
५५) दर्भासन
५६) अवस्था
५८) राजगादी, तख्त
६०) माजलेला, गर्विष्ठ
६५) श्रीरामाची चरित्रगाथा
६७) शहर
६८) शिखराचे टोक
७०) त्वरित
७२) उणीव, वाळवी
७५) केसाचा भांग पाडण्याचे दातेरी साधन
७७) चामखीळ
७८) नवऱ्याचा भाऊ
७९) जोराचा श्वास
८१) फिकीर, काळजी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ‘प्रेम’ की वासनेचा खेळ?

## कर्माचा अटळ सिद्धांत आणि आजची भरकटलेली तरुणाई..!

**श्री. धनंजय शेटये**

आजकाल समाजात वावरताना मन सुन्न होते आणि मनात एकच प्रश्न निर्माण होतो ज्या प्रेमाला आपण ईश्वराचे रूप मानले, ते आज इतके स्वार्थी, कपटी आणि रक्तपिपासू कधीपासून झाले? खरे ‘प्रेम’ तर त्यागात असते, समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर निखळ आनंद फुलवण्यात असते. भूतकाळात आपण एकमेकांसाठी जीवाला जीव देणारी, ‘जीवापाड’ प्रेम करणारी अनेक युगल पाहिली आहेत. पण आज त्या पवित्र भावनेची जागा एका भयानक विकृतीने घेतली आहे. जुने लोक म्हणून गेले आहेत की, ‘स्त्रीचे मन आणि पुरुषाचे भविष्य’ कोणालाच कधी ओळखता येत नाही. एक पुरुष कष्टाच्या जोरावर ‘रावाचा रंक’ आणि नशिबाच्या साथीने ‘रंकाचा राव’ही होऊ शकतो. पण स्त्रीच्या मनातील गुपितांचे काय?

महाभारतातील महान योद्धा कर्णाचे जीवन याचे उत्तम उदाहरण आहे. केवळ एका अनैतिक जन्माच्या शिक्क्यामुळे त्याला आयुष्यभर उपेक्षा आणि वेदना सहन कराव्या लागल्या. जेव्हा त्याच्या जन्माचे हे कटू सत्य स्वतः मातेने कुंतीने त्याच्यासमोर उघड केले, तेव्हा तो मनाने पूर्णपणे खचून गेला. त्या उद्विग्न आणि उबळलेल्या मनःस्थितीत त्याने कुंतीला विचारले, ‘माझ्या जीवनाचे हे रहस्य एवढे दिवस तू मनात का लपवून ठेवलेस?’ सत्य खूप उशिरा समोर आले होते. याच संतापातून कर्णाने समस्त स्त्री जातीला एक भयंकर शाप दिला की, ‘यापुढे कोणत्याही स्त्रीच्या पोटात कोणतेही गुपीत कधीच लपून राहणार नाही.’

**स्वातंत्र्याचा स्वैराचार**

पण आजच्या आधुनिक युगात स्त्रीच्या मनातील रहस्ये जेव्हा एखाद्याच्या



जीवावर उठतात, तेव्हा कर्माचा सिद्धांत अधिक गडद होतो. अगदी कालपरवा घडलेली लोहगड किल्ल्यावरील ती कथित प्रेमकहाणी ऐकली आणि अंगावर काटा आला. आजच्या तरुणाईची मानसिकता कोणत्या टोकाला गेली आहे, याचे हे एक विदारक आणि भयंकर उदाहरण आहे. एका बाजूला सुखवस्तू, उच्चभ्रू, गर्भश्रीमंत कुटुंबातील तरुणाशी ठरलेले लग्न... आणि दुसऱ्या बाजूला प्रियकराच्या साथीने त्याच ठरलेल्या नवऱ्याचा काटा काढण्यासाठी रचलेले क्रूर षडयंत्र! जर ते लग्न मनासारखे नव्हते, तो मुलगा पसंत नव्हता, तर स्वतःच्या आई-वडिलांना विश्वासात घेऊन स्पष्ट नकार देणे ही त्या मुलीची पहिली जबाबदारी होती. पण तसे न करता, लोहगडाच्या कड्यावरून ढकलून देऊन, एका हसत्या-खेळत्या कुटुंबातील निरपराध तरुणाचा जीव घेऊन या विकृत मानसिकतेने नक्की काय मिळवले?

माणसाच्या क्रूर कर्माची फळे याच जन्मी, याच मातीत भोगावी लागतात. ‘कर्म’ कधीच आपला मार्ग चुकत नाही. आपण स्वतःला कितीही शहाणे किंवा ‘शातीर’ समजत असलो, तरी आपले अंतर्मन आपले पाप कधीच लपवून ठेवू शकत नाही. नियती कधीच कोणाची पाठ सोडत नाही.

आता आयुष्यभरासाठी ‘गुन्हेगार’ हा कलंक कपाळावर लावून तुरुंगाची हवा खायची की फासाच्या दोरावर लटकून स्वतःचे आयुष्य संपवायचे, हे येणारा काळच ठरवेल. पण एका जीवापाड प्रेम करणाऱ्या व्यक्तीचा असा क्रूरपणे बळी घेणाऱ्या त्या ‘रक्तपिपासू वृत्तीला’ काय म्हणावे? एखादा कसाईसुद्धा प्राण्यांची हत्या करताना क्षणभर विचार करत असेल, पण या स्वार्थी प्रेमत्रिकोणात अडकलेल्या प्रियसीचे कृत्य ऐकून मानवतेची मान शरमेने खाली गेली आहे. या घटनेमुळे आज समाजात वावरणारे सच्चे प्रेमी युगलसुद्धा आपल्या प्रेमाच्या भविष्याबद्दल क्षणभर विचार करायला प्रवृत्त झाले असतील. या सडत चाललेल्या मानसिकतेचे मूळ शोधायचे झाले तर आजच्या समाजातील पालकांचे वयात येणाऱ्या मुलांकडे होणारे दुर्लक्ष हेच प्रमुख कारण आहे. ‘व्यक्ती स्वातंत्र्याच्या’ नावाखाली आज स्वातंत्र्याचा निव्वळ स्वैराचार माजला आहे. तरुणाईला हक्कांची जाणीव आहे, पण कर्तव्यांची आणि संस्कारांची पूर्णपणे विसर पडली आहे. आजची पाश्चात्य धर्तीवर चाललेली शिक्षणपद्धती, कुटुंबातील वाढते ताणतणाव आणि समाजातील खोटी प्रतिष्ठा (मानापमान) यांमुळे आजची पिढी गुन्हेगारी जगताच्या छायेत वेगाने गुरफटत चालली आहे.

**प्रेम डोळस असावे, आंधळे नव्हे!**

मग प्रश्न पडतो, प्रेम करणे पाप आहे का? तर मुळीच नाही! पण प्रेम हे नेहमी ‘डोळस’ असायला हवे. ‘प्रेम आंधळे असते’ असे म्हणून आपण ज्या विकृतीचे उदात्तीकरण करतो, त्याच आंधळेपणाच्या आडोश्याने आज विश्वासाचा मोठा घात होत आहे. मुळात, प्रेम कधीच अटी ठेवून किंवा ठरवून केले जात नाही, ते तर दोन जीवांमध्ये आपसूकच अंकुरत असते. जे ठरवून केले जाते, त्याला प्रेम म्हणत नाहीत, तो केवळ एक ‘व्यवहार’ असतो! आणि अशा व्यवहारात नेहमी पैसा, संपत्ती, स्वार्थ आणि शारीरिक आकर्षण दडलेले असते. खऱ्या प्रेमात या गोष्टींना थारा नसतो. म्हणूनच शहाणपण यातच आहे की, आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्या मागे धावण्यापेक्षा, ‘जी व्यक्ती आपल्यावर जीवापाड प्रेम करते’ तिच्यासोबत आपले आयुष्य व्यतीत करावे. कारण, कधी कधी आपण ज्याच्यावर अपार प्रेम करतो, त्याला आपल्या प्रेमाचे ‘अजीर्ण’ होते; त्याला आपल्या भावनांची खरी किंमत कधीच कळत नाही. पण जे आपल्यावर निस्सीम प्रेम करतात, ते मात्र आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत प्रेम, जिव्हाळा आणि आत्मीयता जपत सावलीसारखे सोबत राहतात. **

# देवभूमी हिमाचल



**सफर**
**वर्षा कुवळेकर**
**८७६६५६९१३६**

तीर्थन नदीच्या खोऱ्यात शिरलो. समुद्रसपाटीपासून रोज आम्ही वरवर चढत होतो. तितके तापमान कमीकमी होत होते. अर्थात हलका स्वेटर आणि डोक्याला तिथेच घेतलेला स्कार्फ पुरे होत होते. रात्री जास्त गार व्हायचे. आम्ही जितक्या ठिकाणी होम स्टे मधे राहिलो तिथे जाड जाड स्वच्छ पांघरुणांची सोय होती. या भागात एसी सोडा, रूममध्ये पंखेही नाहीत, म्हणजे गरजच पडत नाही. त्या गरम दुलया पांघरून झोपण्याची एक और मजा होती.

आज पाच सहा तासांचा अवघड प्रवास करून आम्ही बंजार तालुक्यात पोहोचलो. तीर्थन नदीच्या काठावरील गुशैनी गावात आमचा मुक्काम असणार होता. हिमाचल मध्ये सगळेच प्रवास अवघड. एका मागोमाग एक पर्वत आपण चढत असतो. चढ उतार, उंच पर्वत रांगा, पोटात खड्डे पाडणाऱ्या दऱ्या हे सततचे दृश्य. वरून खाली पाहताना आपण हा असा मार्ग पार करून आलो ? असा स्वतः लाच अचंबित करणारा रोजचा प्रश्न. अर्थातच हवासुद्धा लहरी. अचानक काळे ढग अवतरत आणि बरसून जात. लगेच हवा आणखी थंड व्हायची. हा खेळ सारखाच सुरू असायचा.

आज गुशैनी गावात शिरताना असाच मौसम बदलला. आमचा ड्रायव्हर पार्किंग शोधत असताना पावसाची एक जोरदार सर आली. एका बाजूला डोंगरकडा आणि दुसऱ्या बाजूला तीर्थन नदीचा वेगवान प्रवाह. ठायी ठायी हॉटेल्स. एकीकडे हे सगळे नजरेत साठवत असताना मन रेनकोट काढायला हवा याही घालमेलीत अडकले होते. तेवढ्यात पावसाचा जोर कमीच झाला आणि ‘‘चला, चला, सामान सोडा, आणतील त्यांची माणसे तुम्ही सगळे पटकन चालायला सुरुवात करा,’’अशी सौरभची घाई सुरू झाली.

त्याच्या मागे निघालो. तो आपला नदीकडे वळला. आश्चर्याने पाहिले समोर तर अक्षरशः नदीच्या पात्रात सुद्धा हॉटेल्स होती. यातल्या कोणत्या तरी स्टे मधे जायचे असावे असा विचार करून निघालो. गाडी लांब उभी, मुख्य रस्त्यावरून दगडगोट्यांच्या पायऱ्या उतरून एका लोखंडी पुलावर चढलो. पाऊस होताच त्यामुळे नदीचा आनंद घ्यायला थांबण्याचा प्रश्नच नव्हता. पूल संपल्यावर फक्त लहानमोठे गोटे होते त्यांच्यावरून तोल सांभाळत पुढे गेलो मग एक लाकडी पूल लागला. देखणा होता परंतु या अजब रस्त्यावरून करत असलेल्या कसरतींमधे आम्ही इतक्या गडबडून गेलो की विचारूच नका. लाकडी पूल गेला मग पुन्हा दगड मातीचा चढ. वास्तविक नदीच्या पात्रातून आम्ही वाटचाल करत होतो, एका बाजूला या पात्रात असलेले मोठमोठे दगड खुणावत होते पण त्याचा आनंद आम्ही नंतर घेतला. प्रथम तर हैराण होत, थंडीने कुडकुडत आणि पावसात घसरण्याची भीती मनात घेऊन आम्ही कधी हॉटेल गाठतो अशा फिकीरीत होतो. नदी पार करून इतर वाटेतील हॉटेल्स पार करत सर्वात उंचावर आमचे होम स्टे होते. न बांधलेल्या अस्ताव्यस्त दगडमातीच्या पायऱ्या चढताना हाताने धरायला बाजूने काहीच नसताना मुक्कामी पोहोचताना आमची पार वाट लागली. पावसाने माती निसरडी झाली होती. त्यावरून पडण्याची प्रचंड भीती वाटली. दीपा आमचा खंबीर आधार झाली. तिचा हात धरून मेटाकुटीने आम्ही मुक्काम गाठला आणि तिथेच आधी खुर्च्यांमधे हुश्श करून बसलो. दीपा एकेकीला छान हात देऊन खेचून घेत होती.

अशा प्रकारे आल्यामुळे आम्ही आधी तर सौरभवर भडिमार सुरू केला. ‘‘अरे कसं रे हे हॉटेल निवडलेस तू?’’ आम्ही सगळ्याच सिनिअर सिटीझन्स असताना सोपे ठिकाण हवे होते ना? वगैरे वगैरे.

एकदा दम निवाला मग आपापल्या खोलीतून बाहेर पाहू लागलो. बाल्कनीत गेलो. आणि आपण आहोत त्या ठिकाणचे सौंदर्य नजरेत भरलेच. दोन पर्वतांच्या मध्ये आम्ही होतो. खोलीच्या मागे असलेला पर्वत तर सहज चढायला लागावे इतक्या जवळ. थोडेसे चढून गेलोसुद्धा. हॉटेलमधील पोरं तर धावत जाऊन वरून काही घेऊन येत होती. काय आणतोस रे विचारल्यावर ‘‘धनिया’’ म्हणाला. खोलीच्या समोरच्या बाजूला वेगवान वाहणारी नदी, तिच्यापलिकडे रस्ता आणि त्याला लागून पर्वत. काय देखावा होता सांगू!!

आणखी एक आनंद आमचे लक्ष जाण्याची वाट पाहत होता. आवारात एका कडेने अगदी आम्ही चढून आलो तिथेही प्लम, सफरचंद आणि अक्रोडाची भरपूर झाडे होती. आम्ही हरखूनच गेलो. कोवळी फळे लगडली होती. एकेका झाडाची, फळांची दखल घेत तिथेच रमून गेलो. बाजूला बऱ्याच वनस्पती होत्या. त्यांचे वेगळपण नोंदवल्यावर समजले ती गांज्याची



रोपे होती. इथे येणार हिमाचलमध्ये कळल्यावर याविषयी कोणीतरी बोलले होते. आयुष्यात पहिल्यांदा गांज्याची उत्पत्ती बघायला मिळाली.

अशा आम्ही खुश झालेल्या पाहून सौरभ म्हणाला, ‘‘आता जागेविषयी तक्रार नाही ना? काल पावसाने गोंधळ केला सगळा. नाहीतर तो सगळा मार्ग फोटो घेत, नदीचा आनंद घेत शांतपणे आलो असतो तर इतका कठीण नसता वाटला.’’

जागा, परिसर आवडला निश्चित, मात्र तो रस्ता आमच्यासाठी नक्कीच खूप कठीण होता. दोन दिवसाच्या आमच्या मुक्कामात जितक्या वेळा तो पार केला, प्रत्येक वेळी प्राण कंठाशी आल्यासारखेच वाटले बाई. असो.

संध्याकाळ बागेत मनमुराद फिरणे आणि नंतर येथील सुग्रास जेवणाचा आस्वाद घेत गेली. इथेही गुलाबाचे ताटवे होतेच त्याशिवाय शुभ्र डेलिया अपरंपार फुलला होता. हे सान्निध्य नेहमीच सुखकर असतं.

निवांत होतो, जेवायला जाण्याआधी सौरभच्या बाल्कनीत महफिल जमली. गप्पा, अनुभवांची देवघेव, सुंदर गाणी, स्वालिखित वाचन ..... वेळ धावत निघून गेली. जेवणानंतर उद्याच्या कार्यक्रमाची रूपरेषा ऐकून आजच्या दिवसाची सांगता झाली.

●क्रमशः

# नवी क्षितिजं


**सुनील गवळी**

आज आपण ज्या काळात जगत आहोत, तो बदलांचा काळ आहे. प्रत्येक क्षेत्रात नवनवीन संधी निर्माण होत आहेत. परंतु या संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी पारंपरिक विचारसरणीतून बाहेर पडणे आवश्यक आहे. कारण आज केवळ पदवी मिळवून चालत नाही, तर कौशल्याधारित शिक्षण ही काळाची गरज बनली आहे.

पूर्वी करिअर म्हणजे डॉक्टर, इंजिनिअर किंवा सरकारी नोकरी इतक्याच मर्यादित संकल्पना होत्या. पण आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. बँकिंग, फायनान्स आणि विमा, डिजिटल टेक्नॉलॉजी, डेटा ॲनालिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, तसेच ग्रीन एनर्जी यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या नव्या क्षेत्रांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे.

विशेषतः क्षेत्राकडे पाहिले, तर देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीसोबत या क्षेत्राचा विस्तार झपाट्याने होत आहे. बँकिंग सेवा, विमा योजना, गुंतवणूक सल्ला, डिजिटल पेमेंट्स यांसारख्या अनेक विभागांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज वाढत आहे. त्यामुळे योग्य प्रशिक्षण आणि कौशल्ये आत्मसात केल्यास या क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडवता येऊ शकते.

तसेच, सौर ऊर्जा आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान हेही उद्याचे महत्त्वाचे क्षेत्र ठरत आहे. वाढती ऊर्जा गरज आणि पर्यावरणाचे संरक्षण यामुळे सोलर पॅनल, ऊर्जा व्यवस्थापन आणि संबंधित तंत्रज्ञानात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या



क्षेत्रातही करिअरचा विचार करणे गरजेचे आहे.

या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी केवळ अभ्यासावर भर न देता, संवाद कौशल्य, तांत्रिक ज्ञान, समस्या सोडवण्याची क्षमता आणि आत्मविश्वास या गुणांचा विकास करणे गरजेचे आहे. इंटर्नशिप, ऑनलाईन कोर्सेस आणि प्रत्यक्ष अनुभव यांद्वारे स्वतःची तयारी अधिक भक्कम करता येते.

पालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या आवडी-निवडी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे, नव्या क्षेत्रांची माहिती देणे आणि अपयश आले तरी त्यांना प्रोत्साहन देणे ही त्यांची जबाबदारी आहे. कारण योग्य वेळी दिलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवू शकते.

शेवटी, एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. बदल हा निसर्गाचा नियम आहे. जो बदल स्वीकारतो, तोच पुढे जातो. त्यामुळे भीती न बाळगता, आत्मविश्वासाने आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून विद्यार्थ्यांनी पुढे जाणे आवश्यक आहे.

नवे बदल स्वीकारा, नवी कौशल्ये आत्मसात करा आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी आशा निर्माण करा. **



# लाडकी बहीण योजना हवीशी!

**निलेश साठे**

महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही केवळ आर्थिक मदतीची योजना नसून राज्यातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरली आहे. या योजनेमुळे लाखो महिलांना दरमहा मिळणारी आर्थिक मदत त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्य खर्चासाठी आणि घरगुती गरजांसाठी मोठा आधार ठरली आहे. कित्येक भगिनींचा विमा हप्ता याच पैशातून जात आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चा हप्ता एका ठराविक तारखेला देण्याची तरतूद शासनाने केली पाहिजे. त्यामध्ये विसंगती आढळते. अनेकदा सोशल मीडियावर किंवा राजकीय चर्चांमध्ये ‘‘लाडकी बहीण योजना बंद होणार’’ अशा अफवा पसरवल्या जातात. मात्र,



कोणतीही लोककल्याणकारी योजना सरकार एका दिवसात किंवा कोणत्याही प्रक्रियेशिवाय बंद करू शकत नाही. अशा योजनांबाबत शासनाला आर्थिक, कायदेशीर, सामाजिक आणि राजकीय अशा अनेक पैलूंचा विचार करावा लागतो.

आजही समाजातील अनेक महिला आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून आहेत. अशा महिलांना नियमित आर्थिक मदत मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. छोट्या-मोठ्या गरजा पूर्ण करण्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची वेळ कमी झाली आहे. अनेक महिलांनी या पैशातून बचत करण्यास सुरुवात केली, तर काहींनी लघुउद्योग किंवा घरगुती व्यवसायालाही चालना दिली आहे.

या योजनेचा परिणाम केवळ आर्थिक नाही तर सामाजिकदेखील आहे. महिलांचा घरातील निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला आहे. त्यांच्या मताला महत्त्व मिळू लागले आहे. आर्थिक मदतीमुळे महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून त्यांच्या सन्मानात भर पडली आहे. योजना बंद करणे इतके सोपे नाही. एकदा एखादी योजना लाखो लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली की ती बंद करण्याचा निर्णय कोणत्याही सरकारसाठी अत्यंत संवेदनशील ठरतो. कारण अशा निर्णयाचा थेट परिणाम लाखो कुटुंबांवर होतो.

त्यामुळे कोणतेही सरकार योजना बंद करण्याऐवजी तिच्यात सुधारणा करणे, पात्रता निकष बदलणे किंवा अंमलबजावणी अधिक प्रभावी करणे असे पर्याय अधिक पसंत करते. लोकशाही व्यवस्थेत जनतेचे मत अत्यंत महत्त्वाचे असते. लाखो महिला या योजनेच्या लाभार्थी असल्यामुळे त्यांच्या भावना आणि अपेक्षांचा विचार शासनाला करावाच लागतो. त्यामुळे अशा योजनेबाबत कोणताही मोठा निर्णय घेताना व्यापक विचार आणि प्रक्रिया आवश्यक असते. महिलांच्या हातात नियमित पैसा आल्याने स्थानिक बाजारपेठेत खरेदी वाढते. किराणा दुकाने, औषधांची दुकाने, लहान व्यावसायिक आणि स्थानिक सेवा क्षेत्रालाही त्याचा फायदा होतो. म्हणजेच या योजनेचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवरही दिसून येतो.सोशल मीडियावर अनेकदा आधार नसलेल्या पोस्ट, व्हिडिओ किंवा संदेश व्हायरल होतात. ‘‘योजना बंद झाली’’, ‘‘पैसे बंद होणार’’, ‘‘नवीन नियम आले’’ अशा बातम्यांवर विश्वास ठेवण्यापूर्वी शासनाच्या अधिकृत घोषणांची खात्री करणे आवश्यक आहे. अफवांमुळे लाभार्थ्यांमध्ये अनावश्यक संभ्रम निर्माण होतो.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही केवळ आर्थिक सहाय्य योजना नसून महिला सक्षमीकरण, सामाजिक सुरक्षा आणि लोककल्याणाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे कोणतेही सरकार अशी योजना कोणतीही प्रक्रिया न करता अचानक बंद करू शकत नाही. भविष्यात योजनेत बदल, सुधारणा किंवा पात्रतेचे निकष बदलू शकतात, परंतु योजना बंद करण्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यावर अधिकृत सरकारी घोषणा होईपर्यंत विश्वास ठेवू नये. आणि विशेष म्हणजे ही योजना सरकारने स्वतःहून आणलेली आहे. कोणतीही लाडकी बहीण मुख्यमंत्र्यांकडे जाऊन अशा प्रकारची योजना सुरू करा अशी म्हटलेली नाही. त्यामुळे जोपर्यंत या सरकारला सत्तेमध्ये राहायचं आहे तोपर्यंत ही योजना चालूच राहिली पाहिजे. भविष्यात एखादे नवीन सरकार आले तर ते ठरवेल की ही योजना चालू ठेवायची की बंद करायची. योजना बंद केली तर त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील. **

# केवल‘वाणी’तरी असावी ‘केविलवाणी’नको



आपल्या राज्यातील एक महत्वपूर्ण शाळेत पाहुणे म्हणून गेल्यावर आलेला अनुभव आणि एक डोळ्यादेखत घडलेले उद्‌बोधन लिखित स्वरूपात देत आहोत. तसे या शाळेत वर्षातून तीन चार कार्यक्रम होत असतातच पण संस्थाचालकांना पुढच्या वेळेला येऊ असे सांगत असायचो. यावेळेला शाळेच्या पहिल्या दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला होता. संस्थाचालकांनी आदल्या दिवशीच चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. आम्ही शाळेच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाला आग्रह झाल्यामुळे हजर राहण्याचे ठरवले. शाळेच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो. सर्व शिस्तबद्ध होते. संस्थाचालकांनी अगोदरच अन्य शिक्षक आणि पदाधिकारी यांना हजर राहण्याचे सक्तीचे केले होते. विद्यार्थी तर बिच्चारे त्यांना निवड करण्याचे स्वातंत्र्य नव्हते. शाळेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात कार्यक्रमाने झाली. वंदेमातरम आणि राष्ट्रवंदना झाली, सरस्वती स्तवन झाले. का कोण गाणे आमच्या बाजूला उपस्थित असलेल्या मुख्याध्यापक, राष्ट्रवंदना मध्येच पुटपुटताना दिसले. एकतर त्यांना पूर्ण येत नसेल किंवा ते विसरले असावेत. पण अन्य मात्र आपल्या नियंत्रित आवाजात आमच्यासकट राष्ट्रगान सरस्वती गायन स्तवन करत होते. या कार्यक्रमानंतर आम्ही सगळे स्थानापन्न झालो. आमच्या बाजूला संस्थाचालक त्यांच्या बाजूला मुख्याध्यापक व त्यांच्या बाजूला अन्य पदाधिकारी होते. आम्ही खुर्चीवर बसताना आमच्या मागच्या फलकांवर ‘मराठी असे आमुची मातृभाषा, अभिमान असे आम्हाला याचा’ असा सुविचार सारखे गौरव वाक्य होते. ते वाचताना आम्हाला खूप अभिमान वाटला, आनंद झाला.



डॉ.विलास ज. पवार

कार्यक्रमाला सुरूवात तर झाली होती आणि बोधपर?भाषणे झाली. मुख्य पाहुणे म्हणून आमचे भाषण होणार आहे असे अगोदरच जाहीर झाले होते. मुख्याध्यापकांच्या भाषण सुरू झाले त्यांनी भाषण सुरू करण्याअगोदर कर्मचारी शिक्षक संस्था पदाधिकारी यांच्याबाबत दिवंगत झालेले आहेत त्याबाबत शोक व्यक्त केले. त्यांच्या शोकपर भाषणात इंग्रजीतला शॉक बसण्यासारखे होत होते. मुख्याध्यापक वाचून भाषण करत होते. परंतु ते वाचत असलेल्या भाषणांतून मराठी भाषेची शोकमग्न झाली आहे असे वाटत होते. त्यांनी भाषणात उच्चारलेल्या अनेक शब्दांतून भाषेची हत्या कशी केली जाते असेच सांगितले जात होते. एक दोन महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकांची नावे सुद्धा महागुरूजींनी योग्य पद्धतीने घेतली नाही. फार काही बदल केला नाही पण दयाळनाच नाव घ्यायच्या ऐवजी दयाळूनाच असा उल्लेख करणे पारलौकिकच्या ऐवजी परलौकिक असा उल्लेख करणे इ. ते शब्द होते. हे भाषण वाचताना करताना मुख्याध्यापकांना वेगळे काही वाटत असल्याचे दिसत नव्हते. भाषण लिहितांना किंवा कोणीतरी लिहून दिले असले तरी त्याबाबत वाचताना ती जाणीव व्हायला पाहिजे होती. ती जाणीव मुख्याध्यापकांना समोरच्या असलेल्या अन्य शिक्षकांच्या हावभावांवरून झाली असावी. त्यांच्याबाजूचे संस्थाचालकांची चुळबूळ सुद्धा त्यांना सूचक वाटली असावी. पण त्यांनी‘चालू’ असलेले भाषण वाचून संपवले. आता एवढे भाषेचा छळवाद केल्यानंतर आम्ही काय बोलावे असा प्रश्नच होता. मघाशी मागच्या फलकांवरील भाषा गौरव वाक्याने उर भरून आला होता. आता उर पिटवावे का असा प्रसंग होता. आम्ही संस्थाचालकांचे आभार मानले आणि मुख्याध्यापकांना आमच्या संवेदना पोहचवल्या. एव्हाना मुख्याध्यापकांच्या लक्षात आले होते की मराठी भाषेचे आपले अज्ञान उघडे पडले आहे. आम्ही भाषेचा मुद्दा भाषणात न राहून मांडलाच. महत्वपूर्ण शाळांची जबाबदारी मोठी आहे. भाषेचा उपमर्द करणाऱ्यांना शिकवायची पण इथे भाषेचा अपमान शाळा आणि मुख्याध्यापकांनी केला तर कोणाकडे दाद मागायची या आमच्या वाक्यावर समोर असलेल्या शिक्षकांतून उत्स्फूर्त प्रतिक्रिया उमटली त्यांनी मुख्याध्यापकांकडे नाराजी व्यक्त केली. काहींनी ही नाराजी थोडी घाबरत घाबरत व्यक्त केली. मुख्याध्यापकांना राग येणार नाही याची खात्री करतच मुख्याध्यापकांना राग आला आणि त्यांनी निलंबित केले तर! या सर्वांचा विचार नाराजी नोंदवणाऱ्यांनी केला. त्यातल्या एकाने तर महागुरूजी भाषाप्रेमी आहेत. साधी भेळ मागवली तरी त्या भेळ गुंडाळलेल्या पेपर सुद्धा वाचतात. त्यांना भेळ साहित्यापेक्षा ते पेपरसाहित्य प्रिय वाटते. काहींनी संमिश्र प्रतिक्रिया दिल्या. आम्ही आमचे भाषण आटपत घेतले. मुख्याध्यापकांना आपण शिकवू शकत नाही याचे भान आम्हाला होतेच पण भाषेबाबत कोणीही असे करू नये. एवढा निषेध नोंदवला. संस्थाचालकांना नमस्कार करून आम्ही त्यांची संमती घेऊन कार्यक्रमातून निघून गेलो. आभाराचे कार्यक्रम चालू असताना मुख्य गुरूजींनी माईकचा ताबा घेत भाषण वाचत असतानाची चूक मान्य केली आणि भाषण लिहून देणाऱ्या शिक्षकांनी अशुद्ध लेखन केले. नावे चुकीची झाली त्यामुळे असे वाचले गेले. याबाबत दिलगिरी व्यक्त केली. हे आम्हाला नंतर कळाले. मुख्याध्यापकांना हे असे मराठी लिहून देणाऱ्याचा शोध घेण्यासाठी एखादी समिती नेमावी का? याबाबत चिंतन चर्चा चालू आहे. ही सुद्धा माहिती आत्ताच कळाली आहे.

आता प्रश्न एवढाच आहे. मातृभाषा केवळ‘वाणी’ म्हणून तरी वापरावी. त्याला‘केविलवाणी’ करू नये. **

# जीवनानुभव उलगडणारा...

## बहावा




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

बहावा, हा शुभदा अभ्यंकर यांचा काव्यसंग्रह पुण्याच्या बीज पब्लिकेशन्सने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहाला ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिका संजीवनी बोकील यांची प्रस्तावना लाभली आहे. ‘‘बहावा : स्त्री जीवनाचा एक लोलक’’ या शीर्षकान्वये यांनी शुभदा अभ्यंकर यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आणि त्यांच्या बहरणाऱ्या काव्याचे सविस्तर विवेचन केले आहे. त्यांच्या मते,

‘बहावा’ या शीर्षकातूनच कवयित्रीचे सौंदर्यलोलुप, निसर्गवेधी व्यक्तिमत्त्व जाणवू लागते. या कवितासंग्रहातील बहुसंख्य कविता या तिच्या अंतर्मनात चाललेल्या कोलाहलाचे प्रतिध्वनी आहेत. एका सुविद्य आधुनिक स्त्रीच्या मनात चाललेल्या उलघालीचा आवाज यातून स्पष्ट ऐकू येत आहे. शुभदा अभ्यंकर यांच्या काव्याची वैशिष्ट्ये संजीवनी बोकील यांनी सविस्तरपणे, सोदाहरण स्पष्ट करून शेवटी शुभदा यांना दिव्यांच्या प्रकाशवाटेसाठी अनेक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. शुभदा अभ्यंकर यांनी आपले ‘मनोगत’ व्यक्त केले आहे. त्यांच्यामते, आयुष्याच्या कोणत्याही वळणावर, कोणत्याही वयात आपल्या स्वप्नांचा मागोवा घेता येतो. मात्र त्यासाठी लागते इच्छाशक्ती आणि कष्टाची तयारी. वाढत्या वयात आई-वडिलांचा परिसस्पर्श झाल्याने मला स्वप्ने बघण्याची आणि धडपडण्याची उमेद प्राप्त झाली. मात्र आता त्यांची उणीव त्यांना तीव्रतेने जाणवते आहे. या काव्यसंग्रहात एकूण ६२ कविता समाविष्ट आहेत. अप्रतिम मुखपृष्ठ आणि पुस्तक मांडणी एम.एस. एंटरप्रायझेस, पुणे यांची आहे.

परीस या पहिल्या कवितेत कवयित्रीने आठवणींचा कप्पा उघडला आहे. कवितेची जुनी पुराणी वही सापडली आहे. आपल्यावर बाबांमुळे काय परिणाम झाला ते शेवटी कवयित्री सांगते आहे.

**कवितेचे आंदण पदरात देऊन**
**तुम्ही रिते झालात**
**शब्दांना माझ्या बाबा, असा**
**सोनस्पर्श देऊन गेलात...**

बहावा या अप्रतिम कवितेत शेवटी कवयित्री म्हणते.

**किती शिकवतो सहजपणाने**
**फुलणारा हा पीत तरु**
**दु:ख वेदना असोत लाखो**
**तरी जीवनी रंग भरू!!**

‘‘जेन झी’’ या कवितेत कवयित्रीने (जी शिक्षिकाही आहे) आपल्या कवितेतून युवा पिढीच्या इंग्रजीमिश्रित मराठी भाषेची छान ओळख करून दिली आहे. त्यांच्याकडूनही काही नवीन शिकू असे शेवटी म्हटले आहे. आतला दिवा, या कवितेत आयुष्याविषयीचे चिंतन आहे.

**प्रवासाचा आनंद**
**घेत सदा पुढे जाता यावं**
**माणूस म्हणून**
**जगताना मोठंही होता**
**यावं ....**

पान, ऋतू या कविता निसर्गाचे अप्रतिम वर्णन ऐकतानाच रसिकाला अंतर्मुख करतात. कविते, या कवितेत कवयित्री कवितेची म्हणजेच प्रतिभेची प्रतीक्षा करीत आहे म्हणून शेवटी ती म्हणते ..

**प्रतीक्षा करीन तुझी,**
**पण इतके दिवस लावू नको..**
**कविते तू येण्यासाठी जन्म**
**अवघा घेऊ नको ...**

सामान्यपणे वयाची चाळिशी ओलांडली की चष्मा लागतो. हा चष्मा घेतल्यामुळे किंवा नंतर नंबर बदलल्याने, चष्मा बदलला की दृष्टी सुधारते, पण दृष्टिकोनाचे काय? असा सार्थ प्रश्न कवयित्री विचारते. म्हणून शेवटी नेमकेपणाने म्हणते,

**चष्म्यातून पाहिल्यानंतर,**
**आपली दृष्टी होते नितळ!**
**तसा माणसांकडे पाहायला**
**हवा दृष्टिकोन निर्मळ!** ...अनामिक

..कोणी.. ही कविता, विज्ञानाची उपासना करणारी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली कवयित्री श्रद्धा-अंधश्रद्धा यांच्या बाजाराचे नेमके वर्णन करते आणि देव संकल्पनेविषयीचे आपले मनोगत या दीर्घ कवितेत मांडते आहे. ही कविता निश्चितच अंतर्मुख करणारी आहे. द्वंद्व या कवितेमध्ये कवयित्रीने देव कसा आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ‘‘दोन तारे’’ या कवितेमध्ये कवयित्रीने आपल्यावर नितांत प्रेम करणाऱ्या आणि एक सक्षम काव्यप्रेमी व्यक्ती घडवणाऱ्या, आपल्या आई-बाबांविषयी, मात्र जे आता हयात नाहीत, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

वयात येणाऱ्या, सुंदर स्त्रीच्या जीवनात ‘तो’ येत असतो. मात्र काही वेळेला चूकभूलही होण्याची शक्यता असते. हे स्पष्ट करणाऱ्या दोन कविता, ‘‘चुकलेले वळण’’ आणि ‘‘तो’’ या कवितासंग्रहात समाविष्ट आहेत. ‘सखा’ सापडल्यावर, मग कवयित्रीची स्थिती अशी होते,

**देहात वसते मी।**
**नाममात्र आता।**
**सोडविता त्राता।**
**सखा माझा॥...**

वर्तुळ, यांत्रिक, डबकं या उत्तम, चिंतनप्रवृत्त करणाऱ्या, मार्गदर्शक कविता आहेत. खिडकी, कवितेत खिडकीत बसून छान पुस्तक वाचताना, बाहेर दिसणाऱ्या आणि अन्य विचारांचा मागोवा कवयित्री घेत आहे. चाळिशी ओलांडलेल्या स्त्री-पुरुषांच्या जीवनात, समाजमाध्यमांच्या अधीन झाल्याने, त्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लावण्याची शक्यता निर्माण होते, हे नेमकेपणाने कवयित्रीने ‘‘डोपामिनचे वारे’’ या कवितेत स्पष्ट केले आहे. लेकीची आई आणि तूच माझी परी या कवितांमध्ये शुभदा यांनी आपल्या मुलींच्या जन्मानंतर, काय वाटले, ते सुंदर शब्दांत व्यक्त केले आहे.

वड, नातं, उद्देश, कवाडं, तळघर या कविता अप्रतिम आहेत आणि रसिक वाचकाला अंतर्मुख करतात. कवयित्री शुभदा अभ्यंकर यांना विज्ञानामुळे मिळालेली तार्किकता आणि काव्यप्रेमातून लाभलेली संवेदनशीलता यांच्यातील सुयोग्य समन्वयामुळे, त्यांच्या कविता रसिक वाचकाला अंतर्मुख करतात आणि त्यांच्या आणखी कविता वाचण्याची इच्छाही निर्माण होते. कवयित्री शुभदा अभ्यंकर यांचा सचित्र परिचय पुस्तकात शेवटी दिला आहे. **

पुस्तकाचे नाव: बहावा
कवयित्री : शुभदा अभ्यंकर
प्रकाशक : बीज पब्लिकेशन्स, पुणे-५१
संपर्क : कोलंबस पब्लिशिंग अँड सर्विसेस, +९१ ८३०८८४१२७१
प्रथमावृत्ती : ५ नोव्हेंबर २०२५
पृष्ठे : ८४, किंमत : रू. २००/-

# पाऊस दाखल, आता सजगता हवी...

**संतांनी पाण्याला तीर्थ मानले. तीर्थ जसे आपण आदराने आणि मर्यादित प्रमाणात प्राशन करतो तसेच पाणीही आदराने वापरले पाहिजे, ही संतांची शिकवण आपण विसरलो आहोत. त्याचीच शिक्षा आपल्याला दुष्काळाच्या रूपाने मिळते. आता पावसाळा सुरु झाला आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने त्याच्या निराकरणार्थ योगदान द्यायला हवे. पाण्याचा अपव्यय टाळणे ही यातील पहिली पायरी असायला हवी.**

अजय तिवारी



एव्हाना पाऊस बरसू लागला असला तरी निसर्गाचा लहरीपणा, आटते जलस्रोत आणि दुष्काळाचे सावट यामुळे आपला देश नेहमीच गंभीर वळणावर उभा असतो. चालू वर्षाच्या सुरुवातीला हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज आणि केरळमध्ये पावसाचे वेळेवर झालेले आगमन यामुळे अवघ्या देशाच्या, विशेषतः बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. रखरखत्या उन्हाच्या झळा सोसल्यानंतर, मृगाच्या पावसाने वेळेत हजेरी लावल्यामुळे या वर्षी तरी सुकाळ होईल, अशी चिन्हे दिसत होती; मात्र निसर्गाच्या मनात काही तरी वेगळेच होते. केरळची सीमा ओलांडून पुढे सरकलेला मॉन्सून कर्नाटक आणि गोव्याच्या किनारपट्टीवर अचानक रेंगाळला, अडकला आणि जणू तिथेच थबकला. त्यानंतरची परिस्थिती आणखी धक्कादायक ठरली. उपग्रहाने घेतलेल्या छायाचित्रांमध्ये आणि देशाच्या हवामानशास्त्रीय नकाशावरून पावसाचे ढगच गायब झाले. पाऊस आज येईल, उद्या येईल या आशेवर डोळे लावून बसलेल्या चातकासारख्या जनतेच्या पदरी घोर निराशा पडते आहे. गेल्या वर्षी देशाच्या अनेक भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. त्यामुळे आधीच जलसाठे चिंतेच्या पातळीवर होते. यंदाच्या कडक उन्हाळ्यामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली. देशातील प्रमुख धरणांमधील, नद्यांमधील आणि विहिरींमधील पाण्याचे साठे गेल्या वर्षाच्या तुलनेत कमालीचे घटले आहेत. अनेक मोठी धरणे आजमितीला तळ गाठत आली आहेत. यात भर घातली आहे ती वाढत्या जागतिक तापमानवाढीने.

यंदा तापमान सतत चाळीस अंशाच्या पार राहिल्यामुळे जलाशयांमधील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत राहिले. म्हणजे धरणांमध्ये शिल्लक असलेले थोडेथोडके पाणी सूर्याची प्रखर किरणे शोषून घेत आहेत. पाऊस लांबल्यामुळे जमिनीतील ओलावा संपला आहे आणि भूजल पातळी कमालीची खाली गेली आहे. हे केवळ एका राज्याचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे भीषण वास्तव आहे. पाणीटंचाईचे सर्वात विदारक चित्र ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये पहायला मिळत आहे. विहिरी कोरड्या ठाक पडल्या आहेत आणि हातपंप फक्त हवा ओकत आहेत. अशा परिस्थितीत गावोगावी, वाड्या-वस्त्यांवर टँकरची संख्या झपाट्याने वाढत आहे. आज अनेक जिल्ह्यांमध्ये टँकरची जणू दिंडीच सुरू असल्याचे चित्र आहे. पाण्याच्या या तीव्र टंचाईमुळे टँकर लॉबी सक्रिय झाली असून पाण्याचे अर्थकारण सर्वसामान्यांचे कंबरडे मोडत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागणाऱ्या महिलांचे कष्ट, पाण्यासाठी होणारी भांडणे आणि पाशवी उन्हात पाण्यासाठी रांगेत उभे राहणारे वृद्ध-बालके हे चित्र आधुनिक भारताच्या प्रगतीच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. मॉन्सून आणखी काही दिवस असाच रुसून राहिला, तर केवळ पिण्याच्या पाण्याचाच नव्हे, तर चारा छावण्या सुरू करण्याचा आणि जनावरांना जगवण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे.



भारताला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. आपल्या संतांनी शेकडो वर्षांपूर्वीच निसर्गाचे महत्त्व, पर्यावरणाचा समतोल आणि पाण्याची किंमत ओळखली होती. आजच्या या जलसंकटाच्या काळात संतांचे ते विचार केवळ पुस्तकात ठेवण्यासारखे नसून आचरणात आणण्याची नितांत गरज आहे. संत तुकाराम महाराजांनी पाण्याचे महत्त्व सांगताना म्हटले, ‘तुका म्हणे अंबा पाणी, तयां नाव जाणा दोन्ही!’ म्हणजेच त्यांनी पाणी हेच जीवन असल्याचे सांगितले आहे. त्यांनी निसर्गाला, झाडा-पाडांना आपले सोयरे मानले होते. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे असे म्हणणारे संत तुकाराम महाराज माणसाला निसर्गाशी नाते जोडायला शिकवतात. निसर्गाला आपले मानले नाही, तर आपल्याला निसर्गाचा कोप सहन करावा लागेल, हा संदेश त्यांच्या अभंगातून मिळतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीतेत पाण्याचे नियोजन आणि स्वच्छतेवर प्रचंड भर दिला आहे. ते म्हणतात, पाणी म्हणजे प्रत्यक्ष देव. त्याचा करावा सुबक उठाव, व्यर्थ न दवडावा एक थेंबही जाणाव, हाचि धर्म मुख्य. पाण्याचा एकही थेंब वाया घालवणे हा अधर्म आहे आणि पाणी वाचवणे हाच खरा धर्म आहे, हा विचार तुकडोजी महाराजांनी मांडला. संत गाडगेबाबांनी गावोगावी फिरून स्वच्छता आणि पाण्याचे शुद्धीकरण यावर भर दिला. आता पाण्याचे दुर्भिक्ष्य लक्षात घेऊन व्यक्तिगत पातळीवर पाण्याचा अपव्यय टाळायला हवा. शेतीक्षेत्रातही आता अमूलाग्र बदल करण्याची वेळ आली आहे.

आता पारंपारिक पद्धतीने शेतीला पाणी देण्याऐवजी ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर सक्तीचा करावा लागेल. त्यामुळे पन्नास ते साठ टक्के पाण्याची बचत होते. कमी पाण्यात येणारी आणि दुष्काळ सहन करणारी पिके, जसे की बाजरी, ज्वारी, कडधान्ये घेण्यावर बळीराजाने भर दिला पाहिजे. ऊसासारख्या अतीपाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र कमी करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. पावसाचे पाणी साठवण्यासाठी शेतात शेततळी निर्माण करावीत, जेणेकरून आपत्कालीन स्थितीत पिकांना पाणी देता येईल. उद्योगांनी वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून पुन्हा कारखान्यातच वापरणे बंधनकारक केले पाहिजे. उद्योगांद्वारे होणाऱ्या अमर्याद भूजल उपशावर कडक कायदेशीर निर्बंध आणणे गरजेचे आहे. दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी शासनाला दीर्घकालीन आणि अल्पकालीन अशा दोन्ही आघाड्यांवर काम करावे लागेल. जलयुक्त शिवार किंवा ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ यासारख्या योजना केवळ कागदावर न ठेवता लोकसहभागातून प्रभावीपणे राबवाव्या लागतील. गाळाने भरलेल्या नद्या, तलाव आणि विहिरींमधील गाळ काढून त्यांची पाणी साठवण क्षमता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. शहरी भागांमध्ये प्रत्येक इमारतीला ‘रेनवॉटर हार्वेस्टिंग’ सक्तीचे करून त्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. धरणांमधील पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यासाठी रासायनिक प्रयोगांचा किंवा सौर पॅनेल्स बसवण्याचा विचार करावा लागेल.

पावसाने पाठ फिरवली म्हणून हात जोडून बसण्यापेक्षा, निसर्गाने जे काही संकट आपल्यासमोर उभे केले आहे, त्याला तोंड देण्यासाठी आपल्याला जलसाक्षर व्हावेच लागेल. निसर्गाचा समतोल आपणच बिघडवला आहे. त्यामुळे तो सुधारण्याची जबाबदारीही आपलीच आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे, जंगलांचे जतन करणे हाच मॉन्सूनला पुन्हा आकर्षित करण्याचा एकमेव शाश्वत मार्ग आहे. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ आणि ‘थेंब थेंब पाण्याचा, जीव आम्हा माणसांचा’ या घोषणा केवळ भिंतींवर लिहिण्यासाठी नसून, आपल्या दैनंदिन जगण्याचा भाग बनल्या पाहिजेत. संतांनी दिलेला संयमाचा आणि निसर्गपूजेचा संदेश डोळ्यांसमोर ठेवून, आजपासून आणि आत्तापासूनच पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्याची शपथ आपण घेतली पाहिजे. तर आणि तरच आपण या भीषण दुष्काळाच्या संकटावर मात करू शकू आणि येणाऱ्या पिढीला एक सुजलाम, सुफलाम देश देऊ शकू. अन्यथा, पाण्यासाठी होणारी युद्धे फार लांब नाहीत, ही धोकेवजा घंटा आता तरी आपण ऐकली पाहिजे. भारतीय शेती ही आजही मोठ्या प्रमाणावर मॉन्सूनवर अवलंबून आहे. तंत्रज्ञान, सिंचन, सुधारित बियाणे आणि आधुनिक शेतीपद्धती यांचा प्रसार वाढत असला, तरी देशातील लाखो शेतकऱ्यांचे भविष्य अजूनही आकाशाकडे लागून असते. त्यामुळे मॉन्सूनमध्ये होणारा प्रत्येक बदल हा केवळ हवामानाचा विषय राहत नाही, तर अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था, ग्रामीण रोजगार आणि महागाईशी थेट जोडला जातो. यंदा मॉन्सूनची सुरुवात समाधानकारक झाली असली, तरी जूनच्या मध्यापर्यंत त्याची गती मंदावल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच ‘अल निनो’च्या संभाव्य प्रभावामुळे देशातील खरीप हंगामाबाबत चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार, हवामान विभाग आणि कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केलेली सावध भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ‘अल निनो’ ही प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठभागाचे तापमान वाढण्याशी संबंधित नैसर्गिक हवामान प्रक्रिया आहे. तिचा परिणाम जगभरातील पर्जन्यमानावर होत असतो. भारतात अनेक वेळा ‘अल निनो’च्या काळात मॉन्सून कमकुवत राहिल्याचे अनुभव आले आहेत. प्रत्येक ‘अल निनो’ वर्ष दुष्काळाचेच ठरते असे नाही; परंतु त्याचा मॉन्सूनवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे यंदाही ‘अल निनो’ची शक्यता व्यक्त होताच शेतकरी आणि धोरणकर्त्यांमध्ये चिंता वाढली आहे. **

## निवडक

### तनुश्रीची भारतीय संघात निवड



**यवतमाळ :** बारा वर्षांची तनुश्री कडू एकेकाळी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' मोहिमेचा चेहरा होती. शाळेत राहण्यासाठी प्रेरित करण्याचा ब्रँड अँबेसिडर म्हणून नियुक्त केले होते. आज वीस वर्षांची तनुश्री कडू लाडाने 'तनू' म्हणून ओळखली जाणारी भारतीय ज्युनिअर महिला हॉकी संघात स्थान मिळवण्यात यशस्वी झाली आहे. ५ ते १४ जुलैदरम्यान होणाऱ्या यु-२१ युनायटेड किंग्डम दौऱ्यासाठी तिची निवड झाली आहे.


### किकबॉक्सिंगमध्ये महाराष्ट्राची देदीप्यमान कामगिरी



**डोंबिवली :** इंदूर येथे आयोजित राष्ट्रीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये महाराष्ट्र संघाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध करत सलग १२ व्या वर्षी अपराजित राहण्याचा मानाचा विक्रम कायम ठेवला. महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डोंबिवली पलावा येथील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे. या ऐतिहासिक यशामागे ठाणे जिल्हाध्यक्ष डॉ. शुभम मिश्रा यांचे प्रभावी नेतृत्व आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी टीम महाराष्ट्रचे नेतृत्व करत खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवून दिले. या स्पर्धेत अविका जैन सुवर्णपदक, विराज सुभेदार रौप्यपदक, तरुषी सिजित रौप्यपदक, साश्वत मोदी कांस्यपदक, अभा दरेकर कांस्यपदक, अवनी केडिया कांस्यपदक, अद्विक माझिला कांस्यपदक मिळवत आपली नवीन ओळख निर्माण केली. या शानदार यशाबद्दल रवींद्र चव्हाण यांनी खेळाडू, प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंची जिद्द, मेहनत आणि शिस्त यामुळे महाराष्ट्र संघाने पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर आपला दबदबा कायम राखला आहे. या यशामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रातील गौरवशाली परंपरेत आणखी एक सुवर्ण अध्याय जोडला गेला आहे.

### भारताच्या वेटलिफ्टिंगचे नेतृत्व मीराबाईकडे

**नवी दिल्ली :** ग्लासगो येथे होणाऱ्या २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय वेटलिफ्टिंग संघाची घोषणा करण्यात आली असून, ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू या संघाचे नेतृत्व करेल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दोनदा सुवर्णपदक जिंकणारी मीराबाई महिलांच्या ४८ किलो वजनी गटात स्पर्धा करेल; या गटात तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर यापूर्वीही मोठे यश मिळवले आहे. भारताच्या सर्वात यशस्वी वेटलिफ्टर्सपैकी एक असलेल्या मीराबाई चानूने आतापर्यंत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत तीन पदके जिंकली आहेत. गोल्ड कोस्ट २०१८ मध्ये सुवर्ण (४८ किलो), बर्मिंगहॅम २०२२ मध्ये सुवर्ण (४९ किलो) आणि ग्लासगो २०१४ मध्ये रौप्य (४८ किलो). माजी विश्वविजेती आणि टोकियो २०२० ऑलिम्पिकमधील रौप्यपदक विजेती असलेल्या मीराबाईने यापूर्वी फेब्रुवारीमध्ये मोदीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतला होता आणि ४८ किलो वजनी गटात विजेतेपद पटकावले होते. मात्र, या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या खांद्याच्या दुखापतीतून सावरत असल्याने तिला मे महिन्यातील आशियाई वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपला मुकावे लागले होते. चानूच्या सोबतीला बर्मिंगहॅम २०२२ मधील पदक विजेत्या बिंद्याराणी देवी आणि हरजिंदर कौर असतील, ज्या अनुक्रमे महिलांच्या ५८ किलो आणि ६९ किलो वजनी गटात स्पर्धा करतील.



### पारुल चौधरीने मोडला राष्ट्रीय विक्रम

**पॅरिस :** भारताच्या पारुल चौधरीने फ्रान्समधील नाईस येथे झालेल्या महिलांच्या ५,००० मीटर शर्यतीत १५:०४.२६ अशी नवीन वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवून स्वतःचाच राष्ट्रीय विक्रम मोडला. या भारतीय खेळाडूने शर्यतीत इथिओपियाच्या बेरेका सेनिया मोहम्मदच्या मागे दुसरे स्थान पटकावले. बेरेकाने १५:०३.८५ असा स्पर्धेचा विक्रम नोंदवून पारुलला थोडक्यात मागे टाकत पहिले स्थान मिळवले. फ्रान्सची अलेसिया जारबो १५:१६.८३ या हंगामातील सर्वोत्तम वेळेसह तिसऱ्या स्थानी राहिली. पारुलची वेळ तिच्या मागील वैयक्तिक सर्वोत्तम वेळेपेक्षा आणि सध्याच्या १५:१०.३५ या राष्ट्रीय विक्रमापेक्षा चांगली होती, जो तिने तीन वर्षांपूर्वी लॉस एंजेलिस थलेटिक्स मीटमध्ये प्रस्थापित केला होता. लॉस एंजेलिस शर्यतीत पारुलने ५,००० मीटरचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला होता. तिने चीनमधील ग्वांगझू येथे २०१० च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत प्रीजा श्रीधरनने नोंदवलेला १५:१५.८९ चा १३ वर्षे जुना विक्रम मोडला. मीटिंग निकया, किंवा मीटिंग इंटरनॅशनल डी नीस, ही वर्ल्ड थलेटिक्स कॉन्टिनेंटल टूरमधील कांस्य-स्तरीय स्पर्धा आहे. ही नीसमधील स्टेड चार्ल्स-एहरमन येथे आयोजित केली जाणारी एक वार्षिक मैदानी ट्रॅक आणि फील्ड स्पर्धा आहे. ही पारुल चौधरीची २०२६ च्या थलेटिक्स हंगामातील दुसरी स्पर्धात्मक स्पर्धा होती, पण तिची पहिली ५००० मीटरची शर्यत होती. तिने चीनमधील शांघाय डायमंड लीगमध्ये ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सातव्या स्थानावर राहून आपल्या हंगामाची सुरुवात केली, आणि या स्पर्धेत स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडण्याची संधी थोडक्यात गमावली होती. पारुलच्या नावावर ३००० मीटर (८:५७.१९) आणि ३००० मीटर स्टीपलचेस (९:१२.४६) मधील भारतीय राष्ट्रीय विक्रम देखील आहेत. शनिवारी नाईस येथे झालेल्या स्पर्धेत पारुलने ५००० मीटर शर्यतीत भारतीय थलेटिक्स महासंघाचा आशियाई खेळ २०२६ साठीचा पात्रता निकष (१५:३६.५८ सेकंद) देखील ओलांडला. २०२३ मध्ये हांगझू येथे सुवर्णपदक जिंकल्यामुळे ती या प्रकारात आधीच आशियाई खेळांची विद्यमान विजेती आहे. माजी आशियाई चॅम्पियन असलेल्या पारुलने तीन वर्षांपूर्वी हांगझू येथे ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीत रौप्य पदकही जिंकले होते.



# भारताने पाकिस्तानचा उडवला धुव्वा

**॥ ७-१ ने ऐतिहासिक विजय ॥ हार्दिक सिंग ठरला सामनावीर**

| लंडन | वृत्तसंस्था |

एफआयएच प्रो लीग २०२५-२६ मध्ये कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ७-१ ने पराभूत करून शानदार कामगिरी केली. शुक्रवारी लंडन येथील ली व्हॅली हॉकी आणि टेनिस सेंटरमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात, सुरुवातीला एका गोलने मागे पडल्यानंतर, भारताने जोरदार पुनरागमन करत पाकिस्तानला सामन्यातून पूर्णपणे बाहेर काढले. दोन दिवसांपूर्वी ४-३ असा निसटता विजय मिळवल्यानंतर, भारतीय संघ या सामन्यात अधिक आक्रमक दिसला. भारताकडून सुखजीत सिंग, हरमनप्रीत सिंग, हार्दिक सिंग, जुगराज सिंग, अभिषेक, राजकुमार पाल आणि दिलप्रीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल हार्दिक सिंगला या सामनावीराचा किताब देऊन गौरविण्यात आले.



दोन्ही संघांनी सामन्याची सुरुवात आक्रमकपणे केली. भारताला पहिल्या दोन मिनिटांतच पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण त्यांना त्याचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही. त्यानंतर पाकिस्तानने प्रतिहल्ल्याचा फायदा उचलला आणि १३ व्या मिनिटाला कर्णधार अबू बकर महमूदने ड्रॅग फ्लिकद्वारे पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करून आपल्या संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पाकिस्तानने पहिल्या क्वार्टरमध्ये ही आघाडी कायम ठेवली.

सुखजीत सिंग (१९ व्या मिनिटाला), कर्णधार हरमनप्रीत सिंग (२६ व्या मिनिटाला), हार्दिक सिंग (३४ व्या मिनिटाला, पेनल्टी स्ट्रोक), जुगराज सिंग (३५ व्या मिनिटाला), अभिषेक (४१ व्या मिनिटाला), राजकुमार पाल (४३ व्या मिनिटाला) आणि दिलप्रीत सिंग (५३ व्या मिनिटाला) यांनी भारतासाठी प्रत्येकी एक गोल केला. दुसरीकडे, अबू महमूदने १३ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवरून पाकिस्तानसाठी एकमेव गोल केला.

भारतीय संघाने दुसऱ्या क्वार्टरमध्ये दमदार कमबॅक केले. २० व्या मिनिटाला सुखजीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर हरमनप्रीत सिंगच्या ड्रॅग-फ्लिकला उत्कृष्टपणे अडवून १-१ अशी बरोबरी साधली. त्यानंतर २६ व्या मिनिटाला हरमनप्रीत सिंगने दुसऱ्या पेनल्टी कॉर्नरवर आत्मघाती गोल करून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत भारतीय संघाने सामन्यावर पूर्णपणे वर्चस्व गाजवले होते. हार्दिकने ३४ व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर गोल केला, तर पुढच्याच मिनिटाला जुगराज सिंगने एक शानदार फील्ड गोल करून स्कोअर ४-१ असा केला. त्यानंतर अभिषेक, राजकुमार पाल आणि दिलप्रीत सिंग यांनी गोल करून भारताला ७-१ असा एकतर्फी विजय मिळवून दिला. शेवटच्या मिनिटांमध्ये पाकिस्तानला सलग दोन पेनल्टी कॉर्नर मिळाले, परंतु भारतीय डिफेन्सने ते रोखून सामना आपल्या नावावर केला.

### गुणतालिकेत भारताची आघाडी

भारताने १५ सामन्यांतून १७ गुणांसह गुणतालिकेत सातवे स्थान पटकावले आहे. भारताने स्पेनला (१६ गुण) मागे टाकले आहे. दुसरीकडे, पाकिस्तान १५ सामन्यांत सलग १५ व्या पराभवाला सामोरे जात गुणतालिकेत शेवटच्या स्थानी असून, त्यांना अद्याप एकही गुण मिळालेला नाही.

## भारत-ऑस्ट्रेलियात रंगणार महामुकाबला

**■ सेमीफायनलसाठी 'करो या मरो' सामना**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला क्रिकेट संघ महिला टी-२० विश्वचषकातील अंतिम साखळी सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. हा महामुकाबला रविवारी लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर खेळवला जाणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला सेमिफायनल गाठण्यासाठी हा सामना जिंकणे आवश्यक आहे. भारतीय संघाने या विश्वचषकात आतापर्यंत चार गट फेरीचे सामने खेळले असून, त्यापैकी तीन जिंकले आहेत आणि एक गमावला आहे.



आतापर्यंत भारतीय आणि ऑस्ट्रेलियन महिला संघांमध्ये ३८ टी २० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत, त्यापैकी भारतीय संघाने केवळ ९ सामने जिंकले आहेत. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाने २७ सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांमधील एक सामना ड्रॉ राहिला, तर एक सामना अनिर्णित राहिला. ही आकडेवारी दर्शवते की ऑस्ट्रेलियन संघाने भारतीय संघावर आपले वर्चस्व सातत्याने टिकवून ठेवले आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध विजय मिळवण्यासाठी भारताला आपल्या खेळाच्या प्रत्येक विभागात: फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण, सर्वोत्तम कामगिरी करावी लागेल.

भारताने तिसऱ्या सामन्यात बांगलादेशला पराभूत करून उपांत्य फेरी गाठण्याची आपली आशा जिवंत ठेवली आहे. भारत 'अ' गटात दुसऱ्या स्थानावर असून, त्याची दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्याशी चुरशीची स्पर्धा आहे. ४ सामन्यांनंतर भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोघांचे प्रत्येकी सहा गुण आहेत, तर ऑस्ट्रेलिया आठ गुणांसह आघाडीवर आहे.

## भारतीय 'अ' संघ मजबूत स्थितीत



| कोलंबो | वृत्तसंस्था |

श्रीलंका दौऱ्यावर असलेल्या भारत 'अ' संघाने गाले येथे सुरू असलेल्या पहिल्या अनधिकृत कसोटी सामन्यात दमदार फलंदाजी करत यजमान श्रीलंका 'अ' संघाच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले आहे. सलामीवीर साई सुदर्शनच्या शानदार शतकानंतर कर्णधार ध्रुव जुरेलनेही संयमी आणि तितकीच आक्रमक खेळी साकारत शतक पूर्ण केले. त्याच्या या खेळीमुळे भारत 'अ' संघाने सामन्यावर मजबूत पकड मिळवली असून दुसऱ्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रअखेर संघाने पाच गडी गमावून ४५२ धावांचा भक्कम डोंगर उभारला आहे. ध्रुव जुरेल २१५ चेंडूत १४१ धावांवर नाबाद असून त्याला हर्ष दुबे ५१ चेंडूत ३० धावांवर साथ देत आहे. देवदत्त आणि ऋतुराज झटपट बाद झाल्यानंतर त्याने डावाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. सुरुवातीला संयमाने फलंदाजी करत त्याने एकेक धाव जमा केली. १८१ चेंडूंमध्ये त्याने आपले शतक पूर्ण केले. या खेळीदरम्यान त्याने नऊ चौकार लगावले. शतक पूर्ण झाल्यानंतर मात्र त्याने आपल्या खेळीचा वेग वाढवत श्रीलंकेच्या गोलंदाजांवर आक्रमण चढवले. ध्रुव जुरेलच्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील हे सहावे शतक ठरले. आतापर्यंत ३४ प्रथम श्रेणी सामन्यांत त्याने ५२.९५ च्या सरासरीने २,३३० धावा केल्या आहेत.

चौथी विकेट २१७ धावांवर पडल्यानंतर या दोघांनी पाचव्या विकेटसाठी २३२ चेंडूंमध्ये १३६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. या भागीदारीमुळे श्रीलंका'अ' संघाच्या गोलंदाजांना विकेटसाठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली. शेख रशीदने ११३ चेंडूंचा सामना करत पाच चौकारांच्या मदतीने ६३ धावांची संयमी आणि उपयुक्त खेळी साकारत कर्णधाराला उत्तम साथ दिली. यापूर्वी डावाची भक्कम पायाभरणी सलामीवीर सुदर्शनने केली होती. त्याने अवघ्या १७५ चेंडूंमध्ये १३२ धावांची शानदार खेळी करत श्रीलंकेच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला.

### आशियाई स्पर्धेत नीरजचा सहभाग

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. भारतीय थलेटिक्स महासंघाच्या निवड समितीचे अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी याला दुजोरा दिला. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता २८ वर्षीय खेळाडू नुकताच दुखापतीतून परतला आहे. पाठीच्या दुखापतीमुळे वर्षाची सुरुवात लांबणीवर पडल्यानंतर नीरज आपल्या हंगामाची सुरुवात केली.

## मानधनाच्या उल्लेखनीय प्रगतीचे कौतुक

| मुंबई | प्रतिनिधी |

भारताची उपकर्णधार आणि महाराष्ट्राची लेक स्मृती मानधना हिने आपल्या अनेक यशांच्या यादीत आणखी एका महत्त्वपूर्ण सन्मानाची भर घातली आहे. २०२६ सालासाठी टाइम मासिकाने जाहीर केलेल्या क्रीडा विश्वातील १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत स्थान मिळवणारी ती एकमेव भारतीय खेळाडू ठरली आहे. आधुनिक क्रीडा क्षेत्राचे स्वरूप बदलणाऱ्या खेळाडूंचा, प्रशिक्षकांचा, गुंतवणूकदारांचा आणि समर्थकांचा या वार्षिक यादीद्वारे गौरव केला जातो. या वर्षीच्या यादीत बास्केटबॉलपटू लेब्रॉन जेम्स अव्वल स्थानावर आहे. तसेच, लिओनेल मेस्सी, ख्रिस्तियानो रोनाल्डो, कार्लोस अल्काराझ, रोरी मॅकइलरॉय, आयलीन गु, व्हिक्टर वेम्बान्यामा आणि फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांसारख्या जागतिक क्रीडा क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींचाही यात समावेश आहे.




मानधनाच्या उल्लेखनीय प्रगतीचे कौतुक करताना टाइम मासिकाने नमूद केले की, मुंबईत जन्मलेल्या या सलामीच्या फलंदाजाच्या नावावर सातत्याने नवनवीन विक्रम नोंदवले जात आहेत. तिला ख्रिस्तियानो रोनाल्डो, एर्लिंग हॅलंड आणि टेंबा बावुमा यांसारख्या स्टार खेळाडूंसोबत टायटन्स (दिग्गज) श्रेणीत स्थान देण्यात आले आहे.

## आयसीसी क्रमवारीत मोठी उलथापालथ

| दुबई | वृत्तसंस्था |

आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत यावेळी मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. विशेषतः गेल्या आठवड्यात कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमधील उत्कंठावर्धक सामन्यांनंतर या क्रमवारीतलक्षणीयबदलझालेआहेत. एकीकडे इंग्लंडचा स्टार फलंदाज जो रूट पुन्हा एकदा कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानी विराजमान झाला आहे, तर दुसरीकडे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने एकदिवसीय क्रमवारीत मोठी गरुडझेप घेत अव्वल स्थानाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. ब्रूकला मागे टाकत रूट पुन्हा अव्वल स्थानीआयसीसीच्या ताज्या कसोटी क्रमवारीचा विचार केला, तर इंग्लंडच्या जो रूटने पुन्हा एकदा अव्वल स्थानावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ताज्या क्रमवारीत दोन स्थानांची झेप घेत त्याने ८७१ रेटिंग गुणांसह पहिले स्थान पटकावले आहे. तर दुसरीकडे, गेल्याच आठवड्यात पहिल्या क्रमांकावर पोहोचलेल्या इंग्लंडच्याच हॅरी ब्रूकला एका स्थानाचा फटका बसला असून तो ८६६ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅव्हिस हेडला देखील एका स्थानाचे नुकसान सोसावे लागले असून, तो दुसऱ्या क्रमांकावरून तिसऱ्या स्थानावर फेकला गेला आहे; त्याच्या खात्यात ८५३ रेटिंग गुण आहेत. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रने मात्र, दोन स्थानांची प्रगती करत ७१५ रेटिंग गुणांसह पहिल्या दहा फलंदाजांमध्ये (१० व्या स्थानी) स्थान मिळवले आहे.



एकदिवसीय (वनडे) क्रिकेट क्रमवारीचा विचार केल्यास, न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल ८१५ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानी कायम आहे. मात्र, या क्रमवारीत भारताच्या शुभमन गिलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. शुभमनने थेट तीन स्थानांची मोठी झेप घेत दुसरे स्थान काबीज केले आहे. त्याची रेटिंग आता ७९१ झाली असून तो अव्वल स्थानाच्या अत्यंत जवळ पोहोचला आहे.

दुसरीकडे, एकदिवसीय मालिकेतून विश्रांती घेतल्यामुळे भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मा ७५४ रेटिंग गुणांसह चौथ्या स्थानावर स्थिर आहे. अफगाणिस्तानच्या इब्राहिम झद्रानला दोन स्थानांचे नुकसान झाले असून तो पाचव्या क्रमांकावर घसरला आहे. श्रीलंकेचा चरिथ असलंका एका स्थानाच्या फायद्यासह नवव्या, तर इंग्लंडचा हॅरी ब्रूक एका स्थानाच्या प्रगतीसह दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### बेल्जियमकडून न्यूझीलंडचा पराभव

**नवी दिल्ली :** फिफा विश्वचषकाच्या १६व्या दिवशी, फ्रान्स, सेनेगल आणि बेल्जियमने मोठे विजय मिळवले. या विजयामुळे फ्रान्सने आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले, तर सेनेगलने नॉकआऊट फेरी गाठण्याची आपली आशा जिवंत ठेवली. दरम्यान, केप व्हर्डेने सौदी अरेबियासोबत सामना बरोबरीत सोडवला, पण ते पुढील फेरीत पोहोचले. स्पेनने उरुग्वेचा पराभव केला. बेल्जियम आणि इजिप्त गट जी मधून नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरले.

**भारताविरुद्ध आंतरराष्ट्रीय विजयाचा प्रारंभ | पहिल्या सामन्यात ३४ धावांनी पराभव**

## आयपीएलच्या धुरंदरांचे आयरिशांसमोर सरेंडर

| बेलफास्ट | वृत्तसंस्था |

विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाला आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात ३४ धावांनी पराभव पत्करावा लागला. आयर्लंडचा हा भारताविरुद्ध पहिलाच आंतरराष्ट्रीय विजय होता. सिव्हिल सर्व्हिस क्रिकेट क्लब इथे खेळल्या गेलेल्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात आयर्लंडने प्रथम फलंदाजी करताना ९ गडी गमावून १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताची फलंदाजी १९ व्या षटकात १४८ धावांवर संपुष्टात आली. आयर्लंडने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडची सुरुवात खराब झाली. संघाने ७.१ षटकांत ५१ धावांत चार गडी गमावले. त्यानंतर कर्णधार लॉर्कन टकरने गॅरेथ डेलानीसोबत पाचव्या विकेटसाठी ६४ धावांची भागीदारी करुन मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. टकर ३६ चेंडूंमध्ये दोन षटकार आणि पाच चौकारांसह ५० धावा करून बाद झाला. डेलानीने जॉर्ज डॉकरेलसोबत सहाव्या विकेटसाठी ४९ धावा जोडल्या. डॉकरेल १० चेंडूंमध्ये १९ धावा करुन बाद झाला. त्यानंतर डेलानी ३२ चेंडूंमध्ये तीन षटकार आणि तीन चौकारांसह ४९ धावा करुन बाद झाला.

आयर्लंडला १८२ धावांपर्यंत पोहोचवण्यात डेलानीच्या खेळीनं महत्त्वाची भूमिका बजावली. लियाम मॅकार्थी सात धावांवर बाद झाला. आयर्लंडनं २० षटकांत नऊ गडी गमावून १८२ धावा केल्या.

१८३ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाला दुसऱ्या षटकात संजू सॅमसनच्या रुपाने पहिला धक्का बसला. एका टोकाकडून अभिषेक शर्मा वेगाने धावा करत होता, पण दुसऱ्या टोकाला इशान किशन (१) आणि श्रेयस अय्यर (३) यांना विशेष प्रभाव पाडण्यात अपयश आले. अभिषेकने १९ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले, उपकर्णधार तिलक वर्मा २१ चेंडूंमध्ये १९ धावा करुन पाचवा फलंदाज म्हणून बाद झाला. वॉशिंग्टन सुंदरनं १२ चेंडूंमध्ये केवळ ९ धावा केल्या. धावसंख्या १०० असताना १२व्या षटकात भारताला सहावा धक्का बसला.

अक्षर आणि शिवम यांनी २४ चेंडूंमध्ये सातव्या विकेटसाठी ३५ धावांची भागीदारी केली. १६ व्या षटकात दुबे (२५) आणि १७ व्या षटकात अक्षर (२५) बाद झाल्यानं भारताचा पराभव निश्चित झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)